
छात्र
प्रबोधन
दीपावली
विशेषांक
ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमार-कुमारींचे अभिनव मासिक !

ॐ

छात्र **प्रबोधन**

*वर्ष ४, अंक ४*

*सौर कार्तिक, शके १९१७*

*दीपावली विशेषांक*

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी ने ज्योतिर्जगतात

## संवाद

***प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,***

***सर्व प्रथम दीपावलीनिमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!***

*अत्यंत उत्सुकतेने तुम्ही या दीपावली विशेषांकाची वाट पाहात असाल याची आम्हाला खात्री आहे. या अंकात अनेक नामवंत लेखकांनी आपल्यासाठी लेखन केले आहे. कथा, कविता, ज्ञान-मनोरंजन, कृतिपर अन् ललित लेखांबरोबरच **'जीवन त्यांना कळले हो'** आणि **'माथा टेकवावा अशी पावले'** हे दोन विशेष लेख तुम्हाला **विकसित होण्याची** अन् असे विकसित व्यक्तिमत्व राष्ट्रासाठी झोकून देण्याची प्रेरणा देतील असा विश्वास वाटतो.*

*या दिवाळीत शक्य असेल त्यांनी खग्रास/उरलेल्यांनी खंडग्रास ग्रहण पाहण्याची दुर्मिळ संधी चुकवू नये. हे **सूर्यग्रहण सुरक्षितपणे पाहता यावे** आणि यापुढेही नेहमी वैज्ञानिक **दृष्टिकोन जागा राहावा** यासाठी या अंकासोबत 'सूर्यचष्मा' भेट देताना आनंद होत आहे.*

***सूर्याला लागणारे** ग्रहण हा तर **नैसर्गिक आविष्कार** आहे. **पण** आपल्या देशाला लागलेल्या असुरक्षिततेच्या, फुटीरतेच्या **ग्रहणाचे काय?** समाज निरक्षरता आणि कालबाह्य रूढींच्या ग्रहणात अडकून पडलाय; लोकशाहीला गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारी राजकारण्यांनी गिळंकृत करण्याचा घात घातलाय; येथील अर्थव्यवस्थेला विदेशी कंपन्या आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर विळखा घालू पाहतायत; तर विषमता, उदासीनता, स्वार्थांधता या सगळ्यांनी या समाजातील अंत:प्रकाश पार झाकोळून टाकलाय; या सर्वांचं काय?*

*एक गोष्ट लक्षात ठेवू या की **ग्रहण हे तात्पुरतं असतं.** त्या ग्रहणाच्या काळ्या सावलीतून बाहेर पडून सूर्य जगाला दिपवून टाकणारच असतो. भूगोलाच्या नियमांनुसार आपला सूर्य ग्रहणकाळातून आपोआप बाहेर पडेल, पण आपल्या **बुद्धीला, देशाला, समाजाला लागलेली ग्रहणं संपून, हिंदुस्थानच्या हजारो वर्षांच्या वैभवशाली संस्कृतीच्या प्रकाशाने विश्वाला उजळवायचे असेल तर** आपल्या अथक प्रयत्नांची, मनाच्या निर्धाराची, वैज्ञानिक दृष्टिकोनाची, शुद्ध चारित्र्याची आणि देशावरच्या नितांत प्रेमाची गरज आहे.*

***'ही एक माझी पणती, उजळील दिवे लाखोगणती'** हे लक्षात ठेवून यावर्षीची दीपावली आपण साजरी करूया.*

***तुम्हा सर्वांना** व तुमच्या कुटुंबियांना ही दीपावली व येणारे विक्रम संवत्चे नवीन वर्ष **उदंड उत्साह** देवो, **सामर्थ्य** देवो, **पुरुषार्थाची, पराक्रमाची प्रेरणा** देवो, **समाधान अन् आनंद मिळवून देवो** यासाठी आम्हा सर्वांतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा!*

सस्नेह तुमचा

**(महेन्द्र सेठिया)**

अंधार हा लोपवा, दावा प्रकाश नवा। चराचर उजळवा, चैतन्याची ज्योत चेतवा।

## या अंकात दडलंय काय ?



### कथा


- **उचलबांगडी** – व्यंकटेश माडगूळकर........................९
- **अंतरिचा देव जाणावा** – गिरिजा कीर...................३५
- **किरात** – शैलजा राजे...................................४५
- **आव्हान** – विवेक पोंक्षे..................................५९
- **पेटुकलीतील गुपित** – लीला दीक्षित....................७३
- **चित्रकथा** – हरिसिंह नलुआ, चित्रकार – मिलिंद मिसाळ,८३
- **डांबराच्या डोहातील प्राणसंकट** – विजय देवधर......१०९
- **मोडक सरांचे डोळे** – सुधाकर प्रभु.....................१२१
- **पोथी** – राजा मंगळवेढेकर..............................१३५


### कविता


- **प्रिय आभाळा** – सरिता पदकी..........................५१
- **सावली** – कल्याण इनामदार...........................१२८
- **वरदान** – सुहासिनी देशपांडे............................१२८
- **पंख पसरूनि बिहरे त्याला** – राम डिंबळे.............१७५


### ललित


- **पोरवय** – पु. ल. देशपांडे................................२९
- **गुंता** – मल्हार अरणकल्ले................................५३
- **पुस्तक परिचय** – चौघीजणी, पूर्णत्वाचे प्रवासी..........७९
- **चिमुकली गॅलरी** – शि. द. फडणीस...................१४५
- **श्री ज्ञानराजांचे पसायदान** – स्वर्णलता भिशीकर.......१६९


### स्फूट


- **झटपट गणित**
- **का व कसे?**
- **सुट्टी कशी वापराल?**
- **कोडी**



**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E. M.Ed.
अनघा लवळेकर M.A., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.


**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादन साहाय्य**
दत्ता टोळ
सुवर्णा जोशी
नीता ओसवाल

**चित्रकार**
**मुखपृष्ठ :** सतीश देशपांडे
**मुखपृष्ठाच्या आतील छायाचित्र :** डॉ. प्रकाश जोगळेकर
**फुलपाखरू व सूर्यचष्मा :** उर्मिला मुन्शी
**रेखाचित्रे :** योगेश भिडे, राजेंद्र बगाटे


झाडा हृदयातील काजळी, प्राणातून पाजळा दिवाळी.

## या अंकात दडलंय काय ?



### विशेष लेख


- **जीवन त्यांना कळले हो** - शैलजा देशमुख..............१५
  इंदुताई पटवर्धन, अनिता अवचट व जगदीश गोडबोले
  या ध्येयवेड्या व्यक्तींच्या प्रेरणादायी मुलाखती.
- **माथा टेकवावा अशी पावले**...........................८९
  ख्यातनाम व्यक्तींबद्दल ख्यातनाम सुपुत्र - सुकन्या (कंसातील नावे) यांनी लिहिलेली मनोगते गो.नी. दांडेकर (वीणा देव), **राजा गोसावी** (शमा देशपांडे) पद्मा गोळे (प्रकाश गोळे), **नवलमल फिरोदिया** (अभय फिरोदिया)
  **इंदिरा संत** (प्रकाश संत)                संकलन : सुवर्णा जोशी


### ज्ञान-विज्ञान


- **सूर्यग्रहण पाहणार ना !** - सुयश डाके.....................५
- **असे हे गणिती - रामानुजन** - जयंत नारळीकर.........१३
- **बाटलीतला अणुराक्षस** - दिलीप कुलकर्णी.............६५
- **महाराष्ट्रातील किल्ले** - प्र. के. घाणेकर...............१०३
- **एन्रॉनचा उदयास्त** - विक्रम वाळिंबे...................१२९
- **'संजीवन' एक ध्येयवादी प्रकल्प**.................... १५३
- **आधुनिक संपर्कसाधने - 'ई-मेल** - आनंद राव.....१६७


### करून तर पाहा


- **सदाबहार सोनचाफा** - मधुकर अभ्यंकर..................४
- **विज्ञान प्रयोग - हवेचा दाब** - डॉ. देसाई...............३९
- **झटपट बुद्धिबळ**........................................५८
- **हस्तकला - बाटिक** - रेखा जोशी....................११७
- **झुलणारा, डोलणारा आकाशदिवा** - मंजूषा मुंगी....१५१




| **संपर्क** | **मुद्रक** | **मासिकाची वर्गणी** |
|---|---|---|
| छात्र प्रबोधन | प्रबोधन संपदा | वार्षिक रु. ७५/- |
| ज्ञान प्रबोधिनी | पुणे - २ | द्वैवार्षिक रु. १५०/- |
| ५१० सदाशिव पेठ | **अक्षर जुळवणी** | त्रैवार्षिक रु. २२५/- |
| पुणे ४११०३० | अक्षय एंटरप्रायझेस ॲण्ड सर्व्हिसेस | **या अंकाची किंमत** |
| ☎ ४७७६९१ | ५१६ बी, नारायण पेठ, पुणे ३० | रु. ३०/- |


प्रकाशाचा कैवार घेऊन अंधाराशी वैर करा.

# सदाबहार सोनचाफा

**मधुकर शंकर अभ्यंकर**



सोनचाफा या सुवासिक फुलांचा गंध नेहमीच आपण अनुभवू शकत नाही. या ठराविक ऋतूमध्ये बहर येतो. साधारणत: वसंत ऋतू आणि गणपतीच्या दिवसांत सोनचाफ्याला फुले येतात.



या फुलाचे वैशिष्ट्य तुम्हाला माहीत आहे का? सोनचाफ्याला सुवास असतो. परंतु मध नसतो! आणि मध नसल्यामुळेच फूल टिकवणे शक्य असते. सोनचाफ्याची फुले आपण हवाबंद बाटलीत ठेवली तर बारा महिने ही फुले बहारदार राहतात. मात्र ही फुले टिकविण्याची एक पद्धत आहे.

सोनचाफ्याचे हे झाड पांगारा,शेवगा, हादगा, या जातीतील असून फारच ठिसूळ असते. फुले काढताना आकडीने अगर शिडीवर चढून काढावीत आणि ताबडतोब पाण्यात ठेवावीत.त्यामुळे देठ काळे पडत नाही.

ही फुले भरण्यासाठी पारदर्शक असणारी बाटली स्वच्छ धुवून घ्यावी.तीमध्ये पाणी भरावे.एकेका फुलांची कळी करावी. कळीमध्ये पाणी भरून ती काळजीपूर्वक बाटलीत सोडावी.कळी करणे म्हणजे उमललेल्या पाकळ्या जवळ आणणे. फुले लहानशा काठीने आत ढकलावीत. साधारणत: २५०मि. लि. च्या बाटलीमध्ये अंदाजे १५फुले बसतात.


फुलांनी बाटली भरली की दोन तास थांबावे. म्हणजे फुलातील हवा निघून जाते. यानंतर दोन चहाचे चमचे संपृक्त तुरटीचे पाणी बाटलीमध्ये घालावे.तुरटी पाण्यात पूर्ण विरघळू द्यावी.तुरटी पाण्यात राहिली तर त्यामुळे फुले कोमजतात. शेवटी बाटली पाण्याने भरून तिला प्लास्टिकचे बूच घट्ट लावावे. त्याला दोरा गुंडाळून अथवा मेणाच्या साहाय्याने बाटली 'सील'करावी. हवा आतमध्ये अजिबात जाणार नाही याची काळजी घ्यावी. बाटली आकर्षक बनण्यासाठी बुचाला रंगीत कागद गुंडाळता येईल.

सदाबहार राहणारी सोनचाफ्याच्या फुलांची बाटली तुम्ही कोणालाही वाढदिवसानिमित्त भेट देऊ शकता.

***

# सूर्यग्रहण पाहणार ना?

**सुयश डाके**



**खग्रास ग्रहणकाळ संपून ज्या क्षणाला सूर्याचा पहिला किरण सावलीतून बाहेर येतो ते दृश्य एखाद्या हिऱ्याच्या अंगठीप्रमाणे दिसते. भरदिवसा आकाशात ग्रह व तारे दिसू शकतात.**

**एकूणच सूर्यग्रहण हा एक दुर्मिळ खगोलीय आविष्कार आहे. ऐन दिवाळीत २४ ऑक्टोबर रोजी सूर्यग्रहण आहे. या निमित्त वैज्ञानिक 'दृष्टी' देणारा विशेष लेख.**

महाभारतातल्या कौरव-पांडव युद्धातला एक दिवस! आज थोडासा अवेळीच सूर्यास्त होत होता. आभाळ अंधारायला लागलं होतं. पक्षी घरट्याकडे परतत होते. वारा पडला होता, कौरवांच्या शिबिरात म्लान शांतता होती. अभिमन्यूच्या छातीवर लत्ताप्रहार करणारा जयद्रथ आज अर्जुनाला सापडला नव्हता आणि आज सूर्यास्तापर्यंत त्याचा वध न केल्यास अर्जुन अग्निकाष्ठ भक्षण करणार होता. सूर्यास्त झाला आणि प्रतिज्ञेप्रमाणे अर्जुनाने अग्निकाष्ठ भक्षणाची तयारी सुरू केली. निश्चिंत झालेला जयद्रथही लपलेल्या जागेतून बाहेर येऊन बघ्यांच्या गर्दीत मिसळला आणि...!

अचानक काळोख कमी झाला.



हिऱ्याच्या अंगठीतला हिरा चमकावा तसा तेजस्वी सूर्याचा किरण बाहेर पडला! कोणाला काही समजायच्या आत श्रीकृष्णाने गांडीव धनुष्य अर्जुनाच्या हातात दिले आणि सांगितले, 'अर्जुना हा सूर्य आणि हा बघ जयद्रथ! तुझी प्रतिज्ञा पूर्ण कर!' आणि क्षणार्धात अर्जुनाच्या धनुष्यातून सुटलेल्या बाणाने जयद्रथाचा वेध घेतला!

मित्रहो, फक्त श्रीकृष्ण जाणत होता, त्या दिवशी खग्रास सूर्यग्रहण होते. लोक समजत

राहिले, तो श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्राचा चमत्कार होता! अगदी अलीकडे त्या चमत्काराचा अर्थ खगोल गणितज्ञांनी शोधला.

पुरातन काळापासून अशाच कथा-दंतकथा ग्रहणांशी निगडीत आहेत. पूर्वापार चालत आलेल्या अनेक रूढी-परंपरांच्या मागे फार मोठी कारणमीमांसा आहे. त्यातल्या शास्त्रीयतेचा आत्मा मारून आपण फक्त धर्माचरणाची अवडंबरे माजवणार का हा प्रश्न आहे. पृथ्वी व सर्व ग्रह सूर्याभोवती फिरतात हे स्वच्छ समजलेलं असूनही कोपर्निकस अगदी मृत्यूशय्येवर असताना ते जाहीर करू शकला, ब्रूनोला तर धर्ममार्तंडांनी आणि समाजाने जिवंत जाळलं, खगोलशास्त्राचा पितामह मानावा असा दुर्बिणीचा संशोधक, गुरूचे चंद्र, शनीची कडी प्रथम पाहणारा गॅलिलिओ आयुष्यभर समाजाच्या हेटाळणीचा विषय राहिला. त्याच्यावरचे पाखंडीपणाचे आरोप आज साडेतीनशे वर्षांनी पोप पॉलनी मागे घेतले.

आतातरी २४ ऑक्टोबरला होणारे सूर्यग्रहण पाहून उद्याच्या विज्ञाननिष्ठ समाजाची आपण ग्वाही देणार आहोत ना?

यापूर्वी १६ फेब्रु १९८० ला लागलेले खग्रास सूर्यग्रहण अगदी सरकारी पातळीपासून सर्वांनी 'पाहू नका, डोळे जातील' अशा प्रकारचा प्रचार केल्याने वाया गेले. परदेशातून संशोधक भारतात आले. विमानातून ग्रहणाचा पाठलाग केला गेला पण ज्या भूमीच्या अवकाशात हा आविष्कार घडत होता, तिथले लोक मात्र कर्फ्यू असल्याप्रमाणे रस्ते रिकामे करून घरात टीव्ही पाहात बसले होते. ही सामूहिक चूक यावेळी मात्र आपण करता कामा नये. क्रिकेट कसोटी चालू असताना जसे गल्लीत क्रिकेटला उधाण येते तसेच ग्रहणाच्या निमित्ताने खगोलशास्त्राच्या आवडीचे बीज कुठेतरी रोवले गेले तर कदाचित भविष्यकाळात आणखी काही जयंत नारळीकर निर्माण होऊ शकतील.प्रश्न तशा प्रकारचे वातावरण निर्माण होण्याचाही असतो.

**सूर्यचष्मा :** शतकातून एखाद्याच वेळी येणारी संधी घालवायची नाही असं जेव्हा आम्ही ठरवलं तेव्हा सर्वच बाजूंनी ग्रहणाचा अभ्यास सुरू केला.पुराणमतवाद बाजूला ठेवला तरी 'ग्रहण पाहू नका' अशा प्रचारामागे काहीतरी शास्त्रीय कारण असणारच. त्या कारणांच्या शोधात बऱ्याच गोष्टी लक्षात आल्या.

सूर्याकडे एरवी थेट पाहणे शक्यच नसते.ग्रहण लागताना आपण सूर्याकडे पाहू शकतो. परंतु नजरेला न दिसणारी सूर्याची अतिनील व अतिरिक्त किरणे (Uitra Violet and Infra Red Rays) डोळ्यांत शिरून डोळ्याना अपाय करू शकतात. संपूर्ण खग्रास स्थितीतच फक्त नुसत्या डोळ्यांनी ग्रहण पाहता येते. परंतु उजेड कमी झाल्याने

बाहुल्या प्रसरण पावलेल्या असतात. पहिला किरण ज्यावेळी सूर्याकडून बाहेर येतो तो त्या प्रसरण पावलेल्या बाहुलीतून डोळ्यात शिरू शकतो. धुराने काळी केलेली काच किंवा क्षकिरण फिल्म, इतर फोटोग्राफिक फिल्मही अतिनील व अवरक्त किरणांबाबत पूर्ण सुरक्षित नसतात.

'वैज्ञानिक दृष्टिकोनातून ग्रहण पाहा' असा प्रचार करताना त्यासाठी अत्यंत सुरक्षित माध्यम लोकांच्या हातात देणे हे देखील आमचे कर्तव्य होते. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय पातळीवर काय केले जाते याचा अभ्यास केला. 'मायलर' फिल्म ही परदेशात ग्रहण पाहण्यासाठी किंवा एरवी सोलर फिल्टर म्हणून वापरली जाते. दोन पॉलीएस्टरच्या फिल्ममध्ये आतल्या बाजूने ठराविक जाडीचे ॲल्युमिनियमचे कोटिंग करून ही सँडविच फिल्म बनविली जाते. त्यातून अतिनील व अवरक्त किरणांची तीव्रता ५०,०००किंवा त्यापेक्षा जास्त पटींनी कमी होते. व सूर्य चंद्राइतका सौम्य होऊन आपण थेटपणे सूर्यग्रहण पाहू शकतो.

ही फिल्म मिळवायची असं आम्ही ठरवलं. पण परदेशातून फिल्म आयात केली

## 'सूर्यचष्मा' वापरण्याबाबत महत्वाच्या सूचना

मित्रांनो,या अंकासोबत दिवाळीची एक भेट म्हणून 'सूर्यचष्मा'तुम्हाला देण्यात येत आहे. सूर्यग्रहण पाहण्यासाठी अत्यंत सुरक्षित अशा मायलर फिल्मच्या साहाय्याने हा चष्मा बनवला आहे. तो वापरून तुम्ही ग्रहण पाहा,निरीक्षणे करा. परंतु वापरताना योग्य काळजी मात्र जरूर घ्या!

१. चष्माला कुठेही फट पडू नये.फट असेल तर सूर्यकिरण थेट डोळ्यांत शिरतील.
२. मायलर फिल्मला भोक अथवा ओरखडे पडणार नाहीत याची काळजी घ्या.
३. सोबत दिलेले इलॅस्टिक सूर्यचष्माला बांधून चष्मा डोळ्यांवर घट्ट बसवा.
४. प्रत्यक्ष सूर्यग्रहणापूर्वी(आधीच्या दिवसांमध्ये) या चष्मातून नेहमीच्या सूर्याकडे एकदा पाहा म्हणजे चष्मातून कसे पाहायचे याचा सराव होईल.
५. ग्रहणाच्या खंडग्रास स्थितीत सूर्याकडे नुसत्या डोळ्यांनी पाहू नये.हा चष्मा घालूनच सूर्याकडे पाहावे.
६. खंडग्रास स्थितीत सूर्याकडे या चष्मातूनही सलग एका मिनिटापेक्षा अधिक काळ पाहू नका.
७. टेलीस्कोप किंवा दुर्बिणीतून ग्रहण पाहात असताना सुरक्षित फिल्टर भिंगावर बसविणे आवश्यक आहे.
८. सूर्याची प्रतिमा घेऊन छायचित्र काढा.कॅमेरा सूर्याकडे रोखू नका.
९. चष्मा आकर्षक करण्यासाठी मायलर फिल्मचा भाग सोडून उर्वरित पुठ्ठ्यावर छानशी रंगीबेरंगी नक्षी काढा.

तर एका सूर्यचष्म्याची किंमत रू. १६०/- अर्थातच भारतवासियांनी विज्ञाननिष्ठ व्हायचं ठरवलं तरी ही किंमत त्यांना परवडणारी नव्हती. त्यामुळे भारतातच ही फिल्म बनवणे एवढाच उपाय होता. अशी फिल्म बनवण्यासाठी लागणारं तंत्रज्ञान भारतात फार थोड्या ठिकाणी उपलब्ध आहे. हा त्यातला मुख्य अडसर होता व ॲल्युमिनियमची 'विशिष्ट'घनता हा दुसरा अडसर. पहिले २-३प्रयत्न त्या 'विशिष्ट'घनतेसाठी वाया गेले. परंतु अखेरीस हुबेहूब अमेरिकन फिल्मइतकी चांगली फिल्म तयार झाली.

तुम्ही फक्त अमेरिकन फिल्मची कॉपी केली म्हणून तिची सुरक्षितता कधीच सिद्ध होत नाही. त्यासाठी बंगलोरच्या 'भारतीय अंतराळ संशोधन संस्थे'ने (ISRO) आम्हाला अत्यंत मोलाची मदत केली. प्रत्यक्ष Sunsimulater समोर फिल्म वापरून पाहून तिच्या सुरक्षिततेची खात्री दिली. पुण्यातील IUCAA या खगोलशास्त्रातील अग्रगण्य संस्थेतील ग्रहण विषयातील तज्ज्ञ डॉ. एन्. सी. राणा यांनी ही फिल्म अमेरिकन फिल्मइतकी चांगली होईपर्यंत निर्मितीच्या प्रत्येक पायरीवर मदत केली. त्या कसोटीला फिल्म उतरल्यानंतर त्यांनीही तसे प्रमाणपत्र दिले. याशिवाय बंगलोरच्या 'आगरवाल आय रिसर्च इन्स्टिट्यूट' या संस्थेने सशाच्या डोळ्यांवर प्रयोग करून फिल्मच्या सुरक्षिततेची ग्वाही दिली. इतक्या अल्पावधीत ही फिल्म भारतात तयार झाल्याचा अमेरिकन तज्ज्ञांनाही अचंबा वाटला.परिपूर्णतेचा एक प्रवास इथे संपला. नुसताच 'वैज्ञानिक दृष्टी मिळवा' असा अधांतरी प्रचार आता करणार नाही तर ग्रहणासंदर्भात ती दृष्टी शब्दश: देऊ शकलो आहोत. यातली पाश्चिमात्यांची मक्तेदारी संपवू शकलो आहोत याचा विशेष आनंद आहे.

**ग्रहणात काय पाहाल? कसे पाहाल**?

भारतातील भरतपूर, रांची, अल्वर, रतनगढ इ. ठिकाणांहून म्हणजे थोडक्यात राजस्थानातील बिकानेरच्या वरून ते कलकत्याच्या थोडे खालीपर्यंत हा खग्रास ग्रहण दिसणारा पट्टा आहे.इतर ठिकाणी कमीअधिक प्रमाणात खंडग्रास स्थितीत दिसेल.महाराष्ट्रात नागपूरला सर्वात जास्त म्हणजे ८५%व इतर ठिकाणी ७५%दिसणार आहे.

**स्पर्श,पूर्ण ग्रहण लागण्याची सुरूवात, खग्रासकाल संपलेला क्षण व मोक्ष हे चार क्षण** निरीक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात. पूर्ण ग्रहणकाळात सूर्याचे प्रभामंडल अतिशय सुंदर दिसते.

**बेलेच्या तेजोशलाका –** चंद्रपृष्ठ खडबडीत असल्याने त्या खाचखळग्यावरून परावर्तित झालेला प्रकाश सूर्याभोवताच्या मोत्यांच्या माळेप्रमाणे

*(पान क्रमांक १६१ वर पुढे चालू)*

**कथा**

# उचलबांगडी

**व्यंकटेश माडगूळकर**

> **सभेत बोलता बोलता पशुपक्षी हमरीतुमरीवर आले...**
>
> **अखेर ब्रह्मदेव म्हणाले, कोणीच मोठं नाही आणि कोणीच छोटं नाही. या पृथ्वीतलावर निरर्थक जन्माला कोणीच येत नाही...!**



ब्रह्मदेवानं सृष्टी निर्माण केली. आकाश, धरित्री, पाणी निर्माण केल्यावर झाडे, पशु, पक्षी निर्माण केले. पशूंना शिंगे दिली, दूध दिले, काहींना तीक्ष्ण दात, तीक्ष्ण नखे दिली, काहींना खूर दिले. पक्ष्यांना रंग, तुरे, गोड आवाज, पंख दिले. पशुपक्ष्यांच्या नाना जाती निर्माण केल्या. प्रत्येक जातीला वैशिष्ट्ये दिली.

काही काळ सगळे पशू आणि सगळे पक्षी गुण्यागोविंदानं एकत्र वागले. पण हळूहळू तू मोठा का मी मोठा असा वाद सुरू झाला. आधी एका पशूत आणि एका पक्ष्यात झाला. मग एक पक्ष्याची जात आणि एक पशूची जात ह्यांच्यात झाला. हळूहळू प्रसार होत गेला. एका बाजूला चार पाय असलेले सर्व पशू आणि एका बाजूला दोन पाय असलेले सर्व पक्षी ह्यांच्यात वाद सुरू झाला. पाण्यातले पक्षी आणि पाण्यातले पशू यांच्यापर्यंत तो पोचला.

काही पक्षी शहाणे, समजूतदार होते. त्यांना वाटले की, आपण एकत्र जमावं आणि तू मोठा की मी मोठा ह्याचा एकवार निकाल लावावा. पण सर्वांनी एकत्र येणं असंभव होतं. म्हणून पक्ष्यांचे प्रतिनिधी आणि पशूंचे प्रतिनिधी एकत्र आले. पशूंचा प्रतिनिधी हत्ती म्हणाला, ''आम्ही पशू शक्तिमान आहोत. आमच्यापैकी गेंडा बघा, म्हैस बघा, रानबैल बघा असा शक्तिमान कोणी पक्षी आहे का? मग आम्ही का नाही मोठे?''

पक्षी समुदायात वटवाघूळ होता. ह्याला तेव्हा इतर पक्ष्यांसारखे दोन पाय होते. आज आहे तसं त्याचं रूप नव्हतं. त्याची मनोवृत्ती जिकडं पालखी तिकडं खोबरं, जिकडं खोबरं तिकडं चांगभलं अशी होती. तो पक्ष्यांच्या घोळक्यातून बाहेर पडला. तुरुतुरु धावत पशूंत आला आणि त्यांची बाजू घेऊन बोलायला लागला. म्हणाला, ''हत्ती म्हणतो ते खरं आहे. पशू मोठे आहेत.

त्यांच्यापाशी मेंदू आहे. त्यांच्या उंटापाशी आहेत तेवढे उंच पाय, वाळूतनं मैलोन मैल चालण्याची शक्ती आपल्यापैकी कुणापाशी आहे? जिराफापाशी आहेत तेवढे लांब पाय, तेवढी लांब मान कुणा पक्ष्यापाशी आहे? काळविटापाशी आहे, चित्त्यापाशी आहे, घोड्यापाशी आहे एवढी वेगानं धावण्याची शक्ती आपल्यापाशी आहे का?''


वाघूळ पक्षी असून पशूंच्या मोठेपणाचे पोवाडे गाताना ऐकून सगळ्या पक्ष्यांना राग आला.

समुद्र किनाऱ्याच्या वृक्षावर राहणारा गरुड उंच स्वरात म्हणाला,

''ह्या पशूंपैकी कुणाला आमच्या एवढी तीक्ष्ण दृष्टी आहे? मी एक हजार फूट उंचीवर आकाशात असतो आणि खाली चालणारा गवतातला ससा किंवा तित्तीर पक्षी हेरून त्याच्यावर झडप घेऊ शकतो.

कोणा पशूला आकाशात उडता येतं? आणि कुणाला एवढी तीक्ष्ण दृष्टी असते?''

हे ऐकून वटवाघूळ पशूंची बाजू सोडून



सुख द्यावे वाटे तरी देई देवा.अंतरी नसावा गर्व माझ्या.

तुरुतुरु पळत पुन्हा पक्ष्यांच्या बाजूला आला आणि म्हणाला, ''आमचं घुबड झाडाच्या फांदीवर बसून दहा-पंधरा फूट खाली, जमिनीवर असलेला उंदीर अंधुक चंद्रप्रकाशातसुद्धा बघतं आणि झडप घेतं. अशी नजर आहे का पशूंपाशी?''

सोंडवाला हत्ती, डरकाळीप्रवीण सिंह, दोन पायांवर चालू शकणारा वानर, वाळवंटातून चालू शकणारा आणि चालता चालता रवंथ करणारा उंट हे पशूंचे प्रतिनिधी आणि गरुड, शहामृग, बोलका काकाकुवा, मोर, कोंबडा हे पक्ष्यांचे प्रतिनिधी यांनीच सभेत बोलावं असं आधी ठरलं होतं. पण, सभेला रंग चढला तसे कोणीही उठून कितीही बोलू लागले, टिचभर शिंगं असलेली शेळी शेपूट उडवीत म्हणाली, ''आमच्या सांबराची, रानम्हशींची, गव्याची शिंगं बघा, अशी बळकट, झोकदार शिंगं आहेत का तुम्हा पक्ष्यांना? बोला !''

ह्यावर डोक्यावर नखभर तुरा मिरवणारा चंडोल पुढे येऊन गाण्यात बोलला, ''मोराचा तुरा बघा, कोंबड्याचा तुरा बघा, तुमच्या सात जन्मी तरी मिळेल का?''

त्यासरशी वटवाघुळाची फार धांदल उडाली. पशूंची सरशी होते आहे म्हणताच तो धावत पशूत जाऊन पंख फडफडवू लागे. जरा वेळानं पक्ष्यांची सरशी होतेय म्हणताच धावत धावत पक्ष्यांत येऊन दोन पायांवर नाचू लागे.

केसाळ मेंढरू म्हणालं, ''आम्ही जनावरं फार महत्त्वाचं काम करतो. झाडांच्या, वेलांच्या बियांना पाय नसतात. त्यांना लांबवर जाऊन उगवता येत नाही. आमच्या पोटातून आमच्या अंगांना लटकून त्यांना प्रवास करता येतो. वृक्षांची, झुडुपांची, गवतांची आम्ही वाहनं आहोत.''

लगेच पोपट बोलला. ''हुर्यो, आमच्यातला कावळासुद्धा हे काम करतो. परागीकरणाचं काम तर एवढीशी फुळचुकी सुद्धा करते.''

सभेत बोलता बोलता पशुपक्षी एकमेकांशी हमरीतुमरीवर आले. एकच गोंधळ झाला. तेव्हा हत्ती आणि गरूड ह्या दोघांनी कामकाज बंदची घोषणा केली. निर्णयासाठी सात पशुपक्ष्यांची 'निर्णय समिती' नेमली.

दलबदलू वटवाघळावर पक्षी रागावले आणि पशूही रागावले. त्यांनी हत्तीला आणि गरुडाला ब्रह्मदेवाकडं पाठवलं. हत्ती म्हणाला,

''नमस्कार''

गरूड म्हणाला,

''राम राम''

ब्रह्मदेव म्हणाले,

''कल्याणमस्तु ! का आलात आपण?''

दोघांनी वटवाघळाची गद्दारी सांगितली. म्हणाले, ''देवा, हा धड पक्ष्यांत नाही, धड

पशूंत नाही. ह्याला धडा शिकवा.''

ब्रह्मदेवांनी लगेच वटवाघळाला बोलावून घेतले. म्हणाले, ''तू सरशी होईल त्यांच्याकडं धावतोस. कुणाशीच एकनिष्ठ नाहीस, आता तिसराच हो. पळणं विसर. आजपासून तू झाडाच्या फांदीला उलटं टांगून घेशील. लटकत राहशील.'' वाघळाला शिक्षेचं फार वाईट वाटलं. जाता जाता त्याने विचारलं, ''पण देवा, मोठ्ठं कोण पक्षी का पशू? समितीचा निर्णय काय होईल तो होईल. टांगून घेण्याआधी मला तो ऐकायचा आहे.''

ब्रह्मदेव म्हणाले, ''कोणीच मोठं नाही आणि कोणीच छोटं नाही. ह्या पृथ्वीतलावर निरर्थक जन्माला कोणीच येत नाही. सगळेच काही ना काही तसेच बरेच वेळा परस्परांच्या उपयोगाचे आहेत.''

पक्ष्यांतून आणि पशूतून वटवाघळाची उचलबांगडी झाली. तेव्हापासून ते झाडावर टांगून घेऊ लागलं.

भ भ भ



**व्यंकटेश माडगूळकर,** अक्षर, ११०/१०, एरंडवणा, प्रभात रस्ता, पुणे - ४

**क्षमस्व :** जागे अभावी खालील साहित्यिकांच्या व असंख्य मुलामुलींच्या कथा, लेख, कविता या अंकात आम्ही छापू शकलो नाही. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. पुढील अंकामध्ये त्याचा क्रमश: समावेश होईल. **निरंजन घाटे, शकुंतला फडणीस, द्वारकानाथ लेले, अजित कानिटकर, डॉ. एम. बी. साबणे, वि. म. कुलकर्णी, विजया जहागीरदार, पंढरीनाथ रेगे.**

या मासिकाच्या सौर आश्विनच्या अंकातील गांधी जयंतीच्या निमित्ताने लिहिलेला 'मंत्र स्वच्छतेचा......मंत्र समतेचा' हा लेख आदरणीय विचारवंत श्री. ग. प्र. प्रधान यांनी लिहिला असून अनावधानाने त्यांचे नाव छापायचे राहून गेले. त्याबद्दल क्षमस्व.

# संख्यांचा मित्र : श्रीनिवास रामानुजन्

डॉ. जयंत नारळीकर

**तामिळनाडूतील एरोडे या लहानशा गावी जन्मलेला रामानुजन् पुढे विश्वविख्यात गणिती बनला. रामानुजन्‌ला दीर्घायुष्य लाभले असते तर गणितात त्याने मोलाची भर घातली असती.**

आठ दशकांपूर्वीची गोष्ट. केंब्रिज विद्यापीठातील गणितज्ञ हार्डी यांना सकाळच्या डाकेतून एक पत्र मिळाले. लेखक भारतातला, पूर्वपरिचित नव्हता. त्याने पत्रातून काही गणिती नियम पाठवले होते, जे त्याला स्वत:च्या शोधातून सापडले होते. हार्डी यांनी त्यांवरून नजर फिरवली. त्यांना मधून मधून अशी, नवे गणिती निष्कर्ष काढल्याचे दावे असणारी पत्रे येत असत. पाठवणारे बहुतेक अर्धशिक्षित, चक्रम अशांपैकी असत. त्यांच्या प्रघाताप्रमाणे ह्या पत्रालाही केराची टोपली दाखवावी अशा विचारात असताना त्यांच्या लक्षात आले...

ह्या गणिती निष्कर्षातील काही त्यांना पूर्वपरिचयाचे होते पण काही नवीन होते ! ते तपासून बरोबर असल्याची खात्री केल्यावर मग त्यांच्या लक्षात आले की पत्र



पाठवणारा असामान्य आहे. पण नेहमीच्या मार्गाने गणिताचे उच्चशिक्षण घेतलेला नाही. आपले सहाध्यायी लिट्‌लवुड यांच्याशी चर्चा करून अखेर त्यांनी पत्रप्रेषकाशी संपर्क साधावयाचे ठरवले.

तो पत्रप्रेषक होता मद्रासमधला एक गरीब युवक श्रीनिवास रामानुजन् !

**बालपण**

मद्रास प्रेसिडेंसीत (सध्याचे तामिळनाडू राज्य) एरोडे नावाच्या लहानशा गावी जन्मलेला हा मुलगा पुढे विश्वविख्यात गणिती होईल असे कोणीही भाकीत केले नसते. कारण शाळा-कॉलेजातील शिक्षणात हा मुलगा चमकला नाही, एक अपवाद सोडून ! अपवाद होता गणिताचा. ह्या सामान्यपणे अवघड समजल्या जाणाऱ्या विषयात त्याला विलक्षण गती होती. शाळेत असताना कॉलेजातील विद्यार्थ्यांना न सुटणारी गणिते तो सोडवी.

एकदा शिक्षकांनी त्याला संपूर्ण शाळेचे वेळापत्रक तयार करायला सांगितले. वेगळे वर्ग, त्यांत वेगवेगळे विषय, ते शिकवणारे शिक्षक, सर्वांना वेळेची विभागणी करून

देणे सोपे नाही. आज अशी कामे संगणकांवर सोपवतात. पण रामानुजन्ने ते काम बिनचूक करून दिले.

मात्र शाळेतून कॉलेजात गेल्यावर इतर विषयांनी दगा दिला ! शरीर–शास्त्राच्या पेपरमध्ये पचनसंस्थेवर प्रश्न विचारला तेव्हा रामानुजन्ने शेरा मारला, ''विषयाचा हा भाग मला पचला नाही.'' अखेर पदवीधर न होता त्यान कशीबशी कारकुनाची नोकरी मिळवली. पण गणिताचा छंद, स्वत: पुस्तक वाचून त्यातले प्रश्न सोडवणे, स्वत:चे स्वतंत्र प्रश्न निर्माण करणे हे चालू होते. अशा स्थितीत त्याने प्रा. हार्डी यांना पत्र टाकले.

**हार्डी–रामानुजन् सुसंवाद**

हार्डी यांनी अखेर रामानुजन्ची बुद्धिमत्ता जाणून त्याला केंब्रिजला आणायची व्यवस्था केली. त्याकाळी कर्मठ कुटुंबात परदेशगमनावर बंदी असे. पण रामानुजन्च्या आईला स्वप्न पडले की, आपला मुलगा गोऱ्या साहेबांबरोबर बसून चर्चा करतोय. हा दैवी दृष्टांत मानून तिने रामानुजन्ला केंब्रिजला जायची परवानगी दिली.

हार्डी यांच्या देखरेखीखाली रामानुजन्च्या ज्ञानातली (औपचारिक शिक्षणाच्या अभावामुळे असलेली) पोकळी भरून निघाली, पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे रामानुजन्च्या डोक्यातून वेळोवेळी उमटणारी गणिती प्रमेये हार्डी यांच्या संख्याशास्त्राच्या ज्ञानात भर घालत होती. इथे संख्याशास्त्र म्हणजे अंकगणित १, २, ३... अशा पूर्णांकांच्या विविध मनोरंजक आणि वैचित्र्यपूर्ण गुणांचा अभ्यास. रामानुजन्ला सुचलेले प्रमेय सिद्ध करणे ही सोपी गोष्ट नव्हती.

आजही रामानुजन्ने स्वहस्तात खरडलेल्या वह्यांतून गणितज्ञांना पुष्कळ आव्हाने मिळत आहेत. त्याने मांडलेले निष्कर्ष त्याला सुचले कसे हे एक गूढच आहे.

**अल्पायुषी**

दुर्दैवाने रामानुजन्ची प्रतिभा आणखी काळ चमकू शकली नाही. क्षय रोगाने ऐन तिशीतच त्याला मरण आले. जर तो आणखी जगता तर गणितात त्याने अधिकच मोलाची भर घातली असती.

एकदा लंडनमधल्या इस्पितळात आजारी असलेल्या रामानुजन्ला भेटायला प्रा. हार्डी आले. बोलता बोलता हार्डी म्हणाले ''माझ्या टॅक्सीचा नंबर १७२९ होता... खास काही गुण त्यांत नसावा.''

''असे नाही'' रामानुजन् लगेच उत्तरला ''ह्या संख्येचे वैशिष्टच पाहा ! दोन संख्यांच्या घनांची बेरीज दोन वेगवेगळ्या प्रकारे १७२९ होते.

$१०^३+९^३=१^३+१२^३ = १७२९$


आणि अशा प्रकारची ही सर्वात लहान संख्या आहे.''

हार्डी यांनी लिटलवुड यांना हा किस्सा सांगितला तेव्हा ते उद्गारले ''मला वाटते सर्व संख्या रामानुजन्ला मित्राप्रमाणे आहेत.

***

**डॉ. जयंत नारळीकर,** आयुका, पुणे विद्यापीठ आवार, गणेशखिंड, पुणे ७

# जीवन त्यांना कळले हो !



**प्रा. शैलजा देशमुख**

**प्रस्तावना**

**''झोपले अजून माळ तापवीत काया**
**असंख्य या नद्या अजून वाहतात वाया**
**अजून हे अपार दु:ख वाट पाहताहे**
**अजून हा प्रचंड देश भीक मागताहे!''**

आपल्या देशात उभी असलेली वेगवेगळ्या क्षेत्रातील आव्हाने व्यक्त करणारी श्री.बाबा आमटे यांची ही कविता! भ्रष्टाचार, हिंसा, स्वार्थ यांनी भरलेल्या जगात माणसाच्या मनातील जाग्या असलेल्या अपार करुणेचे, सहानुभावाचे, डोळसतेचेही दर्शन घडत असते. एक उदंड आशावाद मनात बाळगून, शुद्र स्वार्थाच्या पलीकडे जाऊन काम करणाऱ्या अनेक व्यक्ती समाजात असतात. कधी सुदैवाने त्यांना समाजात मान मिळतो तर कधी अवहेलना वाट्याला येते.

देशाचा केवळ उत्तम नागरिकच नव्हे तर उत्तम माणूस बनण्याचं स्वप्नं पाहणाऱ्या 'छात्र प्रबोधनाच्या' वाचकांना अशा प्रकारचं काम करणाऱ्या व्यक्तींची ओळख करून द्यावी म्हणून ही लेखमाला आपल्यासमोर आणत आहोत.

शक्य होईल तिथे आम्ही त्यांच्याशी बोलून त्यांचे प्रचीतीचे बोल, त्यांचे कार्य, प्रेरणा आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.केवळ मनोरंजन म्हणून न वाचता त्याचा अर्थ आपल्या मनात कुठेतरी रुजावा.

ही लेखमाला देताना अनेक व्यक्तींची कार्ये डोळ्यासमोर आली. या लेखात फक्त तीन जणांची ओळख करून देणार आहोत.

वयाच्या७०व्या वर्षीही उत्साहाने कुष्ठरूग्णांसाठी काम करणाऱ्या **इंदूताई पटवर्धन**, पर्यावरणासारख्या वेगळ्याच विषयाचा सतत अभ्यास करून कामाच्या मस्तीत रमणारे **जगदीश गोडबोले**, स्वत:चा आजार विसरून व्यसनमुक्तीसाठी धडपडणाऱ्या **डॉ. अनिताताई अवचट**.

या सर्वांशी बोलत असताना एक गोष्ट जाणवली ती म्हणजे प्रत्येकाचा पिंड वेगळा, प्रेरणा वेगळी, कार्य वेगळे, पण माणसांवरचं प्रेम हा समान धागा सर्वांच्या कार्यात आहे.

संवेदना जागी आहे म्हणून वेदनेची जाणीव आहे.

स्वत:च्या मार्गावर अढळ विश्वास आहे.म्हणून पाऊल खंबीर आहे. ध्येयावर भक्ती आहे आणि मनात निष्ठेचं प्रचंड बळ आहे आणि त्यामुळेच की काय एक प्रचंड आशावाद प्रत्येकाच्या मनात आहे.

भविष्यकाळात आपले जीवितध्येय निश्चित करताना या सगळ्यांचं स्मरण आपल्याला होईल ही सदिच्छा.

## डॉ. इंदूताई पटवर्धन

एक होती राजकन्या-सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेली-साहित्य, संगीत,कला,वक्तृत्व इ.नाना कलांचं बाळकडू घेत मोठी होणारी-ती आणि तिचा भाऊ पब्लिक स्कूलमध्ये जायचे.गरीब मित्रांशी मोकळेपणी वावरणं याचीही त्यावेळी चोरी असायची-शाळेत शिकत असताना गांधीजींचे विचार कानी पडायचे-मनात नकळत रुजायचे-व्यक्तिमत्वात अफाट साहस होतं, पुरोगामित्व होतं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सदसद्‌विवेकबुद्धी जागी होती, करुणा जागी होती.

मित्रांनो,चक्रावलात ना? काय वाचतोय म्हणून? एखादी अद्‌भुत कथा-एखादी चित्रकथा!होय राजघराण्यात जन्मलेल्या इंदूताई पटवर्धन कुष्ठरोग्यांची वसाहत वसविण्यासाठी आळंदीजवळ डुडुळगावची वाट कशी चालू लागल्या याची हकिगत त्याच्या तोंडून ऐकणं हा एक चित्तथरारक अनुभव होता.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांचं वास्तव्य पुण्यातच होतं. कोरेगावभीमाला त्यांचा स्वत:चा दवाखाना होता.तोपर्यंत सामाजिक कार्य पूना वुईमेन्स कौन्सिलच्या कामात सहभागी होणं इथपर्यंत मर्यादित होतं.

कॅम्पमधील मेनस्ट्रीट वर गाडी घेऊन देवदर्शनार्थ जाण्याचा त्यांचा नित्यक्रम असायचा. रोज तांबड्या रंगाची त्याची गाडी तिथे थांबली की कुष्ठरोग्यांचा एक छोटा जथा नेहमी त्यांना भेटायचा. मनातली करुणा जागी व्हायची. नकळत त्यांना पैसे दिले जायचे.एक दिवस काय झालं? हे नेहमीचे परिचित लोक अचानक दिसेनासे झाले.

इंदूताईंचं मन अस्वस्थ झालं. कुठे बरं गेले असतील हे लोक? आणि अचानक त्यांचा म्होरक्या शंकर दिसला.त्यांनी विचारलं, ''शंकर, अरे बाकीची मंडळी कुठायत?''

''काय सांगू बाईसाहेब, आमची काहीही चूक नव्हती हो! त्यांना बेगर्स होम मध्ये टाकलंय. आम्हाला काही मदत करा ना!''



इंदूताई तडक डी.एस्.पी कडे पोहोचल्या. तिथं समजलं की हे काम डायरेक्टर ऑफ सोशल वर्कच्या कक्षेत येतं. म्हणून त्या ऑफिसमध्ये पाहतात तर समोर शरच्चंद्र गोखले!

त्यांनी इंदूताईंची कैफियत ऐकून घेतली आणि हसून उद्‌गारले, ''त्यामध्ये तुम्ही काय करणार? या लोकांची जबाबदारी घ्यायची तयारी आहे का तुमची?''

''पण.. अशा प्रकारचं काम कधी केलेलं नाही.''इति इंदूताई

''हे तुझ्यासारखीचं काम नाहीच,तुला करता येईल असंही वाटत नाही.''

इंदूताईचा अहं कुठेतरी दुखावला. मनामध्ये जिद्द होती. आपण कोणतेही काम करू शकू हा आत्मविश्वास होता. अडचण एकच होती–ज्या वाटेने जायचं तो रस्ता माहिती नव्हता. डॉ.गोखल्यांनी दिलेलं आव्हान पेलायचंच हा त्यांच्या मनाचा निग्रह झाला आणि 'आनंदग्राम'च्या कामाचं बीज रोवलं गेलं.



त्यावेळी हे कुष्ठरोगी राहात होते फुगेवाडीला. एका शेतकऱ्यानं दिलेल्या जागेत एका झोपडीची वाढ होता होता आता ८०झोपड्या तिथे उभ्या होत्या. त्यांची सोसायटी तयार करणे ही कामं समोर होती. होता होता सोसायटीच्या नावाचा फलक तिथे लागला आणि जमीनमालक श्री.काटे अतिशय चिडले. रातोरात तो बोर्ड उखडला.समाजाच्या विरोधांची ही अगदी सौम्यशी झलक होती. पुण्यातील भाऊसाहेब नातू,श्री पटवर्धन, श्री.जोशी यांच्या सारखी मान्यवर मंडळी बरोबर होती.पण प्रश्न होता पूर्ण वेळ काम करण्याचा! जागेचा प्रश्न सुटत नव्हता. काही क्षण असे आले की 'कुठून हे काम करायला सुरूवात केली असं वाटावं.' पण इंदूताई निराश झाल्या नाहीत. पैसे जमवायचे. फुगेवाडीत त्या वसाहतीतील मंडळींना रेशन दयायचं, एवढंच काही काळ चालू राहिलं. पुनर्वसन बाजूला राहिलं आणि ६८–६९ साली पुन: आशेचा किरण दिसला. ऑक्सफॅमकडून त्यांच्या या कार्याला १,१११पौंडाची मदत मिळाली. मनाने पुन: उभारी धरली. जागेचा शोध सुरू झाला. इंदूरी गावात एका जागेसाठी ५००० रू. 'इसार'ही दिला. पण कुठेतरी

बिनसलं.गावकऱ्यांचा विरोध म्हणून ती जागा मिळाली नाही आणि पैसेही गेले. स्वत: ते पैसे परत करण्याची वेळ आली. पुन: समोर अंधार!

काही दिवसांनंतर पैशांचा विनियोग कसा झालाय हे पाहण्यासाठी फादर जॉन मॅक्लॉन येणार होते. त्यावेळी आळंदीजवळ खडकाळ डोंगरांच्या मध्ये एक जागा मिळाली, ती नाईजाने घेतली. या डोंगरात वसाहत कशी राहणार–हे प्रश्नचिन्ह ज्याच्या त्याच्या मनात होतं; पण परिस्थितीला शरण जातील त्या इंदूताई कसल्या! त्या तडक जनरल बेबूर यांच्यापर्यंत पोहोचल्या. त्यांच्याकडून बुलडोझर मिळविला आणि डुडुळगावाच्या त्या डोंगरावर हालचाल दिसू लागली.

घरं बांधायची तर पत्रे हवेत.कुष्ठरोग्यांपैकी कुणीतरी सुचवलं ''ताई जुनी पिपं आणून दिलीत तर त्याचे पत्रे तयार करता येतील'' इंदूताईंचा मोर्चा पोलीस कमिशनर मराठेसाहेब यांच्याकडे वळला. ''साहेब कसंही करून जुनी पिंपं घरपोच द्या,त्यातून आमच्या वसाहतीतील घरांना सावली मिळेल.'' इंदूताईंच्या क्वीन्स गार्डन या श्रीमंत वसाहतीत बंगल्याच्या आवारात ह्या पिपांना ठोकून पत्र्याचं रूप मिळालं.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न होताच. खडकाळ जमीन त्यामुळे पाणी लागणं अवघड. शेवटी एक मैल अंतरावरून नदीचं पाणी घेण्याची परवानगी मिळवली. पाईप लाईन घातली गेली अन् एक दिवस रातोरात आळंदीच्या ग्रामस्थांनी ती तोडून टाकली. आणीबाणीचा काळ होता तो. इंदूताईंनी थेट दिल्लीचे दरवाजे ठोठावले. शंकरराव चव्हाणांना भेटल्या आणि पुन: पाण्याची व्यवस्था करून घेण्यात त्या यशस्वी झाल्या.

एकीकडे कुष्ठरोग्यांच्या सहकार्यानेच 'आनंदग्राम'उभं राहात होतं. एकीकडे संकटांची मालिका चालूच होती. आमच्या गावाजवळ ही घाण कशाला आणली म्हणून आळंदीकर चिडले होते. एक दिवस त्यांना मारण्यासाठी प्रयत्न झाला.एक क्षण काळजाचं पाणी झालं. पण इंदूताई डगमगल्या नाहीत.त्यानंतर त्या बरोबर बंदूक घेऊन जाऊ लागल्या.

हळूहळू आनंदग्राम उभं राहिलं. कुष्ठरोग्यांचं पुनर्वसन करणं हा वसा घेतलेल्या इंदूताईंनी त्यांचे विवाह करून दिले. आज एकूण ४००जण तिथे आनंदानं राहातात. त्यांच्या मुलांसाठी शाळा आहे. इंदूताई सर्वांच्या आई बनल्यात. इंदूताईंनी दत्तक घेतलेल्या पुत्राचे दुर्दैवाने निधन झाले.पण त्याचं सर्व कुटुंब आता त्यांच्याकडे आहे. 'आनंदग्राम'ला त्या मोठ्ठं घर'म्हणतात त्यामुळे घरातील सर्वही तसंच मानून काम करतात.

कुठल्या एका क्षणी वैयक्तिक आव्हान म्हणून स्वीकारलेलं काम आज त्यांचं अवघं व्यक्तिगत जीवन व्यापून राहिलय.मनातील करुणेचा अंश आज त्यांच्या चेहऱ्यावर पसरून राहिलाय.आज वयाच्या ७०व्या वर्षीही त्या तितक्याच जोमानं हे काम करतायत.मनात जिद्द असेल, आत्मविश्वास असेल, सहानुभाव जागा असेल तर कुठलंही काम आपण करू शकू. हेच जणू काही त्यांच्या बोलण्यातून जाणवत होतं.


**डॉ.इंदूताई पटवर्धन, आनंदग्राम.**
मु.डुडुळगाव,पो.आळंदी जि.पुणे

## जगदीश गोडबोले

''समाजकार्यात पडण्याची उर्मी हा मी घेतलेला भावनात्मक निर्णय नव्हता. वयाच्या तिसाव्या वर्षी (जेव्हा थोडीफार परिपक्वता आलेली असावी असे आपण मानतो.) विचारपूर्वक सुरूवात कोठून करायची हे मनात ठरवलं आणि एका बड्या कंपनीत असलेली सेल्स एक्झिक्युटिवची नोकरी सोडून दिली.''

हे उद्‌गार आहेत पर्यावरणविकास क्षेत्रात सक्रिय काम करणाऱ्या श्री.जगदीश गोडबोले यांचे! आज पवनेच्या खोऱ्यात पाणी-आरोग्य-पर्यावरण इ.प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर उत्तर शोधण्याची धडपड करणारी 'जीवन' ही संस्था आहे. श्री. बाबा आमटे यांच्या 'लोकबिरादरी'त भ्रमरागडला जाऊन प्रत्यक्ष अनुभव घेणं इथेपासून ते पवनेच्या खोऱ्यात सक्रिय कामाची चळवळ उभी करणं इथपर्यंचा आपला प्रवास जगदीश गोडबोले यांनी शब्दांतून मोठ्या चित्रमय भाषेत उभा केला.

त्यांच्या प्रत्येक निर्णयामागे काही निश्चित कार्यकारण भाव होता.सुरूवातीला भ्रमरगडाला का जावं वाटलं, तर आदिवासींच्या जीवनाविषयी कुतुहल, जंगलाविषयी एक ममत्व मनात होतं. ४६ मैल आत चालत जावं लागायचं सुधारित जगाची ओळख नसलेल्या आदिवासींना संघटित करणं अवघड असायचं. शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचणं कठीण. शाळा म्हणजे काय हे माहीत नाही.



स्वच्छ कपडे घालून जवळीक साधू पाहणारी माणसं ही त्रास देणारे सरकारी अधिकारी तर नाहीत हा संशय मनात असायचा.

मग मुलांना आकर्षित करण्यासाठी फुटबॉलचा खेळ आपापसात मांडून त्यांना नकळत आपल्यात ओढून घ्यायचं... अशा नाना युक्त्या योजायला लागायच्या. अशिक्षित आदिवासींना बचत सर्टिफिकेट्स घ्यायला लावायची. या व्यवहारात पैसे वापरायचे-व्याज द्यायचं नाही असे अनेक गैरव्यवहार व्हायचे. हे थांबवण्यासाठी श्री.गोडबोले आणि त्यांचे मित्र त्यांच्या बरोबर पोस्टात जायचे. पोस्टमन, पोस्टमास्तर यांना जाणीव द्यायचे.

एका योजनेद्वारे तेथील लोकांना पंप वाटले.एकदा पंपाचे उद्घाटन झाले पण पंप कसे चालवायचे हेच मंडळीना माहीत नाही आणि विजेचे बिल मात्र येऊ लागले.या प्रकाराबद्दल वीजमंडळाकडे दाद लावण्यासाठीही खूप प्रयत्न करावे लागले.

जंगल-जमिनीचा प्रश्न फार महत्त्वाचा होता. ७५सालापर्यंत केलेले आक्रमण असेल तर जमीन आदिवासींच्या नावावर व्हावी अशी तरतूद होती. पण त्यासाठी आवश्यक असा कोणताही कागदी पुरावा त्यांच्याकडे नसायचा.शेवटी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे जाऊन या प्रश्नाची तड लागली. असे एक ना अनेक अनुभव गाठीशी येत होते. तरीही भ्रमरगडला बाबांच्या योजनेत काम करणं म्हणजे एक प्रकारच्या सुरक्षित वातावरणात काम करणं होतं.

त्यातून बाहेर पडण्यासाठी श्री.गोडबोले त्यानंतर स्वतंत्रपणे नागेपल्ली गावात काम करू लागले.स्वत:च्या हक्कांची जाणीव नसणं, औपचारिक शिक्षणाची सवय नसणं हे सर्व तिथेही होतंच.आपल्या कामाची दिशा आपणच शोधावी लागते. हे सुचविणारा एक छोटा अनुभव खूप बोलका आहे-अक्षर ओळख तर करून द्यायची पण सामाजिक जाणीवही वाढवायची अशा हेतूने अ-अननसातील सांगण्याऐवजी ‘अ’अहिरे गावातील असं सांगायचं.मग अन्याय्यपूर्ण वागणुकीचं एखादं उदाहरण देऊन अ-अन्यायातील असं सांगायचं. नागेपल्लीत काम करताना त्यांची पत्नी व छोटी मुलगीही तिथे येऊन राहिल्या होत्या. आपण संस्कार हा शब्द अनेकदा ऐकलाय. त्याचं नकळत संस्करण कसं होतं हे सांगणारा एक प्रसंग.

एक दिवस गोडबोले यांची ५-६वर्षांची मुलगी डोक्यावर मोळी घेऊन घरी आली. आल्यावर आई-बाबांनी विचारलं,“हे गं काय?” त्यावर ती छोटी मुलगी म्हणाली, “बाबा,माझ्या सगळ्या मैत्रिणी काम करतात. मी एकटीच रिकामी असते म्हणून मीही काम करायचं ठरवलं.”

नागेपल्ली येथील कामानंतर ‘इंद्रावतीची मोहीम’हा अभ्यासदौरा खूप

शिकवणारा होता.त्या महाराष्ट्रातील अनेक तरूण सहभागी झाले होते. या दौऱ्यात धरणाच्या प्रश्नांकडे त्यांचं मन वळलं.इंचमपल्ली व भोपालपट्टनम येथील धरणाच्या पाण्याखाली कितीतरी आदिवासी गावं गेली होती.ती पाहात असतानाच कुणीतरी सुचवलं, 'अरे,आपल्या पवनेच्या खोऱ्यात जाऊन पाहा परिस्थिती काय असते ते.'

आता गोडबोल्यांचे पाय पवना खोऱ्याकडे वळले. तिथलं प्रथम दर्शन खूपच लोभस होतं. पावसाचे दिवस होते– हिरवीगार वनश्री,मन प्रसन्न करणारे धबधबे! पण हळूहळू दिवस जाऊ लागले. होळी जवळ आली–उन्हं तापू लागली. आणि सर्वत्र पाण्याची बोंब दिसू लागली. समोर धरणाचं क्षितिजापर्यंत पसरलेलं पाणी दिसतंय. पण प्यायचं पाणी मात्र कुठेतरी.. २–२ मैल खाली उतरून, झरा खोदून, हंडा भरून आणायचं. स्त्रियांचे होणारे हाल बघून मन कळवळलं आणि शिळीम गावात 'पाणीपरिषद' बोलावली. या परिषदेला स्त्रियांची उपस्थिती आश्चर्यजनक होती. ३–४ हजारांच्या समुदायात या स्त्रिया आपलं दु:ख मांडत होत्या. दाद मागत होत्या. सारंच आश्चर्यकारक होतं. कागदोपत्री धरणबांधणीच्या वेळी विस्थापित झालेल्यांसाठी पाणी–शाळा–रस्ते–दवाखाना सर्वांची सोय होती–प्रत्यक्षात मात्र सगळयाचाच अभाव. अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष परिस्थिती दाखवून जागं करण्याची धडपड श्री गोडबोले यांनी आपल्या संस्थेद्वारे केली. त्याचा परिणाम होऊन हजारो रुपये खर्चून टँकरने पाणी पुरवणे इ. तात्पुरते उपाय योजले गेले.पण त्यातही असणारा भ्रष्टाचार मन व्यथित करून गेला. त्यासाठी वनीकरण, मृद्संधारण यासारखे कायम उपाय योजायला हवेत. हे जाणवलं,पाझर तलाव, गुरुत्वबलाच्या उपयोगानं धरणातील पाणी उचलून हौदात साठवून पुरवणे इत्यादी उपाय सुचले. त्यासाठी सरकारच्या मागे लावावे लागले. पाण्याच्या प्रश्नांतून आरोग्य प्रश्नांकडे नजर वळली. त्यासाठी सेवाभावी डॉक्टर हवे होते ते मिळवले.

अज्ञानाचा प्रचंड पगडा येथील अशिक्षितांच्या मनावर होता. उदा. प्रसूतीच्या वेळी नाळ कापण्यासाठी गवत कापायचा विळा वापरणे, अतिसाराचा आजार झाला तर पाणी न पाजणे इत्यादी. शाळांमधील गळतीचं प्रमाण तर प्रचंड होतं त्यावर उपाय म्हणून वसतिगृहाची योजना केली.

या सर्व कामांसाठी गोडबोले यांनी स्थानिक ग्रामीण कार्यकर्त्यांवर भर दिला. स्त्रीशक्ती जागी झाली तर विस्मयकारक कार्य घडू शकते हा अनुभव चिपको आंदोलनाच्या अभ्यासदौऱ्यात आला होता. म्हणून स्त्री कार्यकर्त्यांवर लक्ष केंद्रित केले. 'पश्चिमघाट बचाओ' मोहिमेतही





पर्यावरणाविषयी अभ्यास करण्याची जागृती न कळत झाली. आज सामाजिक वनीकरणाच्या कामात त्यापासून प्रेरणा घेऊन अनेकजण काम करतायत ही गोष्ट श्री. गोडबोले यांना समाधानाची वाटते. 'सुपे'हा तसा दुष्काळी भाग.तेथील एका अध्यापकांनी उन्हाळी सुट्टीत अभ्यासवर्ग घेतले.त्याची फी मोठी होती– रोज एक बाटली पाणी. यातून झाडं जगविली.

जगदीश गोडबोले यांचे पवना खोऱ्यातील काम आज नेटाने चालू आहे. कामाचा मार्ग स्वत: डोळसपणे निवडल्याने त्यात अडखळणे जाणवले नाही. सुरूवातीला 'आपल्याला रुचणारे, झेपणारे काम करावे' ही धारणा होती. अभ्यास करण्याची प्रचंड उमेद निसर्गाबरोबरच माणसं, त्यांच्या समस्या जाणून घेणं हे त्यांना खूपच महत्त्वाचं वाटतं. शिबिरासाठी शहरातून विद्यार्थी येऊन राहून जातात. पण कामाकडे वळत नाहीत हा त्यांचा अनुभव आहे. घरातील संस्कार, डॉ. श्वाईट्झर, फादर डेमियम यांच्या चरित्रांतून मिळालेली प्रेरणा, पत्नीचं सहकार्य यामुळे जगदीश गोडबोले आपल्या कामाच्या मस्तीत वावरताना दिसतात. क्षेत्र कुठलंही असो. अभ्यासातून, अनुभवातून त्याच्या गाभ्यापर्यंत जायला हवं. स्वत:ला काय हवं हे ओळखता आलं तर कामाचे जे समाधान असतं ते त्यांच्या व्यक्तिमत्वात पदोपदी जाणवते.

**जगदीश गोडबोले,** श्री अपार्टमेंट
शिवाजीनगर, फर्ग्युसन रोड पुणे ४.

## डॉ. अनितताई अवचट

**'जेव्हा वेदनांचे गाणे जुळते तेव्हा कार्य उभे राहते.'**

पुण्यातील गणेशोत्सवाचा काळ! उत्साह,चैतन्याने भारलेले वातावरण! पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवात वेगवेगळ्या समस्यांचा विषय घेऊन देखावे मांडले जातात. यावर्षी असाच एक आगळावेगळा देखावा भोसरीच्या श्रीराम मित्र मंडळाने उभा केला होता. व्यसनमुक्तीच्या संदर्भांत काम करणाऱ्या पुण्यातील 'मुक्तांगण' या संस्थेच्या कामाचा परिचय अतिशय गंभीर मसुद्याच्या साहाय्याने पुतळ्यांच्या नाट्यातून सादर केला जात होता. डॉ अनिता अवचट त्या संस्थेच्या प्रमुख यांचाही पुतळा त्यात समाविष्ट होता. एकूण ४-५ठिकाणी व्यसनमुक्तीच्या संदर्भातले देखावे सादर केले गेले. आज समाजात व्यसनमुक्ती संबधात जी जागृती होत आहे त्याविषयीचं समाधान या विषयावर बोलताना डॉ अनितताई अवचट यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

घरातील गांधीवादी विचारसरणीच्या वातावरणाचा एक नकळत परिणाम आपल्या व्यक्तिमत्व विकसनात झाला. याविषयी एक कृतज्ञ भाव त्यांनी सुरूवातीला व्यक्त केला.लहानपणापासून बुद्धिमान असणारी एक छोटी मुलगी सुसंकृत वातावरणात मोठी होत होती. पुण्याला वैद्यकीय शिक्षण घेत असताना सामाजिक चळवळीत रस असणाऱ्या सक्रिय भाग घेणाऱ्या एका तरुणाची भेट झाली आणि समाजासाठी काहीतरी करण्याऱ्या मनातील उर्मीला जोड मिळाली. डॉ.अनिल अवचट आणि डॉ. अनिता अवचट यांची धडपड एकमेकाच्या साथीने सुरू झाली. एम्.बी.बी.एस.च्या परीक्षेत उत्तम यश मिळल्यावर सुरूवातीला



ठाण्याच्या मनोरुग्णालयात नोकरीला सुरूवात केली. पैसा मिळवणं हे कधीच ध्येय नव्हतं. वैद्यकीय क्षेत्रातील मानसोपचार हे क्षेत्र आव्हानात्मक वाटत होतं आणि मुलगी लहान असतानाच विशेष संशोधनासाठी 'अंगात येणे' हा थेट समाजातील अज्ञानाशी निगडित वेगळाच विषय अनितताईंनी निवडला.त्याच काळात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी गावोगाव व्याख्याने देणे, शिबिरे भरवणे, उपचार करणे असे धडाकेबाज काम सुरू केले.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात भानामती हा प्रकार मोठ्या प्रमाणावर होता. तेथे लोकांचा विश्वास संपादन करून अशा रुग्णांवर उपचार केले.

पुण्यामध्ये आल्यानंतर मतिमंद मुलांसाठी असलेल्या 'जीवनज्योत' या संस्थेत कार्यकारिणीवर सल्लागार म्हणून विनावेतन काम चालू होते. निवारा-या वृद्धांसाठी असलेल्या तसेच 'महिला सेवाग्राम'या सारख्या संस्थांमध्ये मानसोपचारतज्ञ म्हणून आठवड्यातून एकदा जाण्याचा परिपाठ चालूच होता.

१९७० ते १९९० या काळात अर्धवेळ हमाल लोकांसाठी दवाखाना चालवणे चालू होते. त्यावेळी असे आढळले की हमालांच्या मृत्यूची दोन कारणे प्रमुख होती. एक तर मद्यपान किंवा धनुर्वात! त्यावर इलाज करताना त्या त्यांच्या कुटुंबाच्या डॉक्टर बनून गेल्या होत्या. गरीब कुटुंबात अज्ञान व दारिद्र्याने येणारे खरूज व जंत हे रोग कसे हटवावेत यासाठी तर आपल्या सहकाऱ्यांसह अनिताताई प्रात्यक्षिकांसह व्याख्याने देत.

'येरवडा येथील मनोरुग्णालयाची अनवस्था'याविषयीच्या बातम्या नुकत्याच तुम्ही वृत्तपत्रात वाचल्या असतील. अनिताताईंशी बोलताना या सगळ्या पद्धतींकडे पाहाण्याचा एक विधायक दृष्टिकोन जाणवत होता. ''काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीला सरकारी नोकरीत खूप काही करता येतं आणि इच्छा नसेल तर काहीही न करता नोकरी चालू राहते.'' हे त्यांचं वाक्य खूप बोलकं होतं. येरवडा येथील मनोरुग्णालयात अनिताताईंनी एकाच वॉर्डात सतत तीन वर्षे काम केले. तेथील रुग्णांच्या व्यथा त्यांनी जाणून घेतल्या. त्यांचा विश्वास संपादन करून घेतला. आणि पंधरा-पंधरा वर्षे रुग्णालयात काढलेल्या ८० रुग्णांना बरे केले. त्यांना घर नातेवाईक मिळवून दिले.

ज्या कक्षातील रुग्ण हे कधीही हल्ला करू शकतील अशा ठिकाणी निर्भयपणे जाऊन उपचार करणाऱ्या अनिताताई या पहिल्या महिला डॉक्टर होत्या.

येरवडा येथील मनोरुग्णालयात काम चालू असताना अशी एक घटना घडली की त्यांच्या कार्याची दिशाच बदलून गेली. लहानपणापासून अंगाखांद्यावर खेळवलेला, मैत्रिणीच्या कॉलेजात जाणारा तरूण मुलगा 'व्यसनाधीन आहे' हे त्यांच्या वैद्यकीय नजरेने जाणले. मुलाच्या आईला मुलाचा आजार समजत नव्हता. त्या काळात अवचट पतिपत्नींनी या मुलाला आपल्या घरी आणून त्याच्यावर उपचार केले.पण त्याच्याशी गप्पा मारताना असे अनेक तरूण 'गर्द'च्या विळख्यात सापडले आहेत हे समजले. अनिल अवचट यांच्या मनातील सामाजिक बांधिलकी त्यांना स्वस्थ बसू देईना. महाराष्ट्र टाईम्समध्ये त्यांनी लिहिलेली लेखमाला समाजात

खळबळ माजवून गेली.अवघ्या चार महिन्यांच्या आत त्यांचे 'गर्द'हे पुस्तक प्रकाशित झाले आणि एक दिवस प्रख्यात लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांचा त्यांना दुरभाष आला.त्यानंतर अवचट पति-पत्नी त्यांना जाऊन भेटले.यासंबधी जे काम करता येणं शक्य असेल ते तुम्ही सुरू करा.आम्ही आर्थिक मदत करतो अशी कळकळीची विनंती त्यांनी केली.

नेमकी त्याच काळात येरवडा मनोरुग्णालयाची अधीक्षक पदाची धुरा अनिताताई तात्पुरती सांभाळत होत्या. आपल्या या अधिकाराचा वापर करून त्यांनी व्यसनाधीन अशा १० रूग्णासाठी स्वतंत्र कक्ष सुरू केला. सुदैव असे की त्यांच्या या कार्याला राज्यसरकारकडून सहज मान्यता मिळाली. डॉ. श्रीरंग उमराणी या आपल्या उत्साही तरूण सहकाऱ्यासह अनिताताई जोमाने कामाला लागल्या. १९८९ साली 'मुक्तांगण मित्र' ही संस्था स्थापन झाली. रुग्णांना व्यसनापासून परावृत्त करणं यात त्यांची मानसिकता बदलणं हे मोठं आव्हानात्मक काम होतं. सहकाऱ्यांशी चर्चा, रूग्णांच्या अपेक्षा, गरजा, पालकांचे अनुभव यातून शिकत शिकत अतिशय परिणामकारक उपाययोजना तयार केली गेली.वेगवेगळे कार्यक्रम आखले गेले. ठाण्याचे प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांचे सहकार्य लाभले.

'मुक्तांगण'च्या कुठल्याही कामासाठी परदेशी मदत घ्यायची नाही. सरकारची व समाजाची मदत घ्यायची असे तत्वत: ठरले. त्यांच्या कामाचे मूल्य जाणून सरकारने मदत केली, करत आहे. बरे होऊन जाणारे रुग्णही कृतज्ञता म्हणून आर्थिक मदत करतात. समाजातही या कार्याचे मोल जाणणारे दाते आहेत.

'मुक्तांगण'मध्ये राहून व्यसनमुक्त झालेले रुग्णच तेथे कार्यकर्ते म्हणूनच उत्साहाने काम करतात. स्वत: व्यसनाच्या दुष्परिणामांच्या अनुभवातून गेलेले असल्यामुळे ते रुग्णांशी जवळीक साधू शकतात. व्यसनापासून दूर राहण्यासाठी रूग्णांचे मनोबल वाढवणे;वेगवेगळ्या माध्यमातून व्यसनाचे दुष्परिणाम मनावर ठसवणे; अशा प्रकारचे 'व्यायामापासून ते



संगीतापर्यंतचे' अनेक उपाय विचारपूर्वक ठरवलेले दिसतात. अनितातांईबद्दल रूग्णांच्या मनात अतीव आदराची भावना दिसून येते. आजपर्यंत असे हजारो रुग्ण बरे होऊन घरी गेलेत. बऱ्या झालेल्या रुग्णांशीही अनिताताई संपर्क साधून सतत मार्गदर्शन करत असतात. ना ठरावीक वेळेचे बंधन ना अधिकाराच्या धाकाचे!

आतापर्यंत अनेक पारितोषिके अवचट दांपत्याला मिळाली आहेत. कर्करोगासारख्या आजाराला तोंड देत उत्साहाने काम करणाऱ्या अनितातांईकडे पाहिले की त्यांचं स्वीकृत कामावरचं प्रेम, निष्ठा, उदंड आशावाद चकित करून जातो.

मुक्तांगणच्या आज १० ठिकाणी शाखा आहेत. रुग्ण बरे होऊन गेल्यावर आवश्यक त्या मार्गदर्शनाचे कार्य तिथे चालते. महानगरपलिकेने दिलेल्या नवीन जागेत आपल्या सर्व गरजा भागवू शकेल. अशी 'मुक्तांगण'ची आदर्श इमारत लवकरच उभी राहील असा विश्वास त्यांच्या मनात आहे.

**''जे टाळणे अशक्य, दे शक्ती दे सहाय**
**जे शक्य साध्य आहे, निर्धार दे कराया**
**मज काय शक्य आहे, आहे अशक्य काय**
**माझे मला कळाया, दे बुद्धी देवराया!**

'मुक्तांगण सभागृहात अनितातांईच्या मार्गदर्शनाखाली स्वत:चे मनोबल वाढावं म्हणून परमेश्वराची प्रार्थना करणारे रूग्ण पाहिले की मन भरून येतं. चुकणाऱ्या मुलावर न रागवता सहनशीलतेने प्रसंगी कठोरतेने आणि वात्सल्याने मार्गदर्शन करणारं मातृत्वच त्यांच्या डॉक्टर म्हणून असलेल्या व्यक्तिमत्वातून प्रतीत होत राहतं.

**डॉ. अनिताअवचट**, मुक्तांगण, व्यसनमुक्ती केंद्र,
आळंदी रोड, येरवडा, पुणे ६

## समारोप

समाजाचे ऋण मनोमन मानणाऱ्या यातील व्यक्तींच्या कार्याच्या प्रेरणांचा मागोवा घेताना अंतर्मुख झाला असाल. या पुढील अंकातून महात्मा गांधींच्या विचारातून प्रेरणा घेऊन आरोग्यासाठी काम करणारे डॉ. अभय बंग व राणी बंग. शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुयोग्य मेळ घालून एका सुंदर विश्वाचं स्वप्न पाहणारे अंकोलीचे संशोधक अरूण देशपांडे, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांवर 'स्व'रूप वर्धिनीच्या माध्यामातून अनमोल संस्कार रूजवणारे कृष्णराव पटवर्धन, तर 'निहार'च्या संचालिका विजयाताई लवाटे अशा अनेक व्यक्तींची भेट आम्ही यापुढील अंकातून घडवून आणणार आहोत. तुम्ही सुद्धा आपल्या आसपास अशा प्रकारच्या कार्यरत असलेल्या मोठ्या माणसांची ओळख करून घ्या. छात्र प्रबोधनच्या माध्यमातून मित्रांपर्यंत त्यांचा परिचय पोहोचावा. ***

**गणितातील गमती-जमती**

## गुणाकाराची रशियन पद्धत

जर तुम्हाला कोणत्याही संख्येची निमपट व दुप्पट झटकन करता येत असेल तर ही पद्धत तुम्हाला सोपी वाटेल.

१. डाव्या स्तंभातील संख्या निम्मी करा (बाकी सोडून द्या)व उजव्या स्तंभातील संख्या दुप्पट करा.

२. डावीकडे '१' ही संख्या मिळेपर्यंत ही क्रिया चालू ठेवा.

३. आता डाव्या स्तंभातील सर्व सम संख्या खोडून टाका व त्यांच्या जोडीच्या उजव्या स्तंभातील संख्या खोडा.

४. आता उजव्या स्तंभातील उर्वरित संख्यांची बेरीज करा.तेच आहे गुणाकाराचे उत्तर

उदा. 97 × 39 करून पाहू

| पायरी 1 व 2 | 3 | 4 |
|---|---|---|
| 97 × 39 | 97 × 39 | 39 |
| 48 × 78 | 48 × 78 | - |
| 24 × 156 | 24 × 156 | - |
| 12 × 312 | 12 × 312 | - |
| 6 × 624 | 6 × 624 | - |
| 3 × 1248 | 3 × 1248 | 1248 |
| 1 × 2496 | 1 × 2496 | 2496 |
| | | 3783 |

97-39 = 3783

## जरा डोके चालवा

सोबत दिलेल्या आकृतीत एकूण ९ सोंगट्या आहेत.त्याची रचना अशा प्रकारे करावयाची आहे.की प्रत्येक वर्तुळावर तिन्ही प्रकारच्या

(A, B व C) सोंगट्या असतील; तसेच एकाच प्रकारच्या सोंगट्या


(उदा. तीनही ) एकाच रेषेत असतील.

**नियम:**

१. एका वेळी एकच सोंगटी हलवायची आहे.


२. सोंगटी हलवताना ती एका मुक्कामापासून दुसऱ्या मुक्कामापर्यंत न्यावी.

एकूण किती खेळी खेळाव्या लागल्या तुम्हाला? मीत कमी खेळ्यांमध्ये जमतंय का पाहा.



ललित

# पोरवय



पु. ल. देशपांडे

**एक छोटासा मुलगा– घरभर माणसं असलेल्या घरात वाढत होता. तरी स्वत:च्या कल्पनाविश्वात अगदी एकटा जगत होता. घरातल्या वैभवाची साक्ष देणाऱ्या पालखीशी त्यांचं नातं होतं.त्यासाठी ती बनायची कधी समुद्रातलं एकाकी बेट,तर कधी मोरपंखी होडी–त्या बेटावर हा बेटा विहार करायचा–कधीतरी ऐकलेली गोष्ट त्याच्या कल्पनाविश्वात नवं रूप धारण करायची तर कधी पालखीचे दांडे विद्यार्थी बनायचे.शाळा–शाळा खेळ सुरू व्हायचा.खेळता खेळता नवे शब्द सुचायचे–कविता जन्माला यायची.फुलांच्या रसांची शाई करून कविता लिहावी असं वेडं, रम्य स्वप्न साकार करायला तो धडपडला–फसला आणि पुन: कधी म्हणून 'इंजिनिअरिंग'च्या वाटेला गेला नाही.**

**वयाच्या सतराव्या वर्षी–विदेशी जाणारा हा संवेदनाशील युवक कधीच 'शहाणा विद्यार्थी, नव्हता.पण देश–विदेशातील अक्षर–वाङ्मयाचा अभ्यासक होता.माणसामाणसांशी जडलेल्या संबंधातून शिकण्याचा प्रगल्भपणा त्याच्याजवळ होता.**

**रस, रूप,गंध,स्पर्श या सर्व संवेदना जागवणाऱ्या आपल्या पोरवयाचं चित्रण रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या 'छेलेबेला' या आत्मकथनात केलंय आणि ख्यातनाम साहित्यिक पु.ल.देशपांडे यांनी ते तितक्याच समर्थपणे मराठीत भावानुवाद करून 'पोरवय'मधून आपल्यापर्यंत पोहोचवलंय.**

**छात्र प्रबोधनच्या कुमार वयोगटातील वाचकांसाठी 'पोरवय'मधील काही निवडक उतारे येथे देत आहोत.ते पुस्तकातल्या वेगवेगळ्या भागातील असले तरी एक सलग अनुभव आपल्याला देतील आणि आपल्याला संपूर्ण पुस्तक मुळातून वाचावंस वाटेल असा विश्वास आहे.**

आमच्या घरी एक पालखी होती.पालखी आजीच्या काळातली. खूप मोठा आकार होता तिचा. नबाबी थाटाची. दोन दांडे आठ–आठ भोयांच्या खांद्याच्या मापाचे. हातांत सोन्याची कडी, कानांत मोठ्या बाळ्या, अंगात बिनबाह्यांची तांबडी बंडी घातलेलं भोयांचं टोळकं सूर्य बुडायच्या वेळच्या रंगीबेरंगी ढगांसारखं, जुन्या धनदौलतीबरोबर आता अस्ताला गेलंय. त्या पालखीच्या अंगावर होती रंगीत रेघांनी काढलेली वेलबुट्टी. त्यातली बरीचशी गेली आहे उडून. डाग पडले आहेत जिथंतिथं. नारळाचा काथ्या बाहेर पडलाय आतल्या गादीतून.जणू काय आताच्या काळात

कोऱ्या कोऱ्या कागदावर असलं जरी छापलं। ओठावर आल्याखेरीज गाणं नसतं आपलं

पटावरून नाव काढून टाकलेली गोष्ट.पडून राहिलीय कचेरीलगतच्या गॅलरीतल्या एका कोपऱ्यात.मी त्यावेळी सात आठ वर्षांचा.चालू प्रपंचाल्या कुठल्याही गरजेच्या कामात हात नसायचा आणि ह्या जुन्यापुराण्या पालखीलाही साऱ्या आवश्यक कामांतून बडतर्फ केलेलं होतं त्यामुळे तिचा माझ्या मनाला एवढा ओढा होता. ती पालखी म्हणजे जणू काय समुद्रातलं एक बेट आणि मी सुटीच्या दिवसांतला रॉबिन्सन क्रूसो.बंद दरवाजामागं बेपत्ता होऊन चारी दिशांच्या पहारेकऱ्यांना गुंगारा देऊन बसलेला.

तेव्हा आमच्या घरभर माणसं.आपली किती,परकी किती याचा काही हिशोब नाही.जिकडेतिकडे गड्या–मोलकरणीचा नुसता गजबजाट.सुटीच्या दिवशी दुपारी ज्यांच्या ताबेदारीत असायचो ते सगळे जेवणखाण आटोपून डाराडूर झोपलेले.एकटाच बसून आहे.मनातल्या मनात माझी अचल पालखी चाललीय.हवेचेच घडवलेले ते भोई माझ्या मनातल्या मिठावर पसरलेले.कुठल्या वाटेनं जायचं ते माझ्या मनानं ठरवलेलं.त्याच वाटेनं पालखी चाललीय दूरदूरच्या देशांत. त्या सगळ्या देशांना पुस्तकात वाचलेली नावंही मीच चिकटवलेली.

कधी पालखीची वाट निघायची घनदाट जंगलातून.वाघाचे डोळे लखलखतायत. अंग थरथरतंय सोबत आहे विश्वनाथ शिकारी.बंदूक उडाली धुडुम.बस, सगळं चिडीचूप.मग कधी पालखीचं रूप बदलून ती मोरपंखी होडी होऊन जाते.निघाली वाहात समुद्रातून.जमीन दिसेना. वल्ही मारली जातायत छप छप छप छप. लाटा उसळतायत डोलत डोलत.फुलत फुलत होडीवाले ओरडतायत, ''सांभाळा सांभाळा..वादळ येतंय.''सुकाणूपाशी अब्दुल नाखवा.त्याची दाढी टोकदार,मिश्या काढलेल्या,डोकं गुळगुळीत.तो ओळखीचाच. दादाला(रवींन्द्रनाथांचे थोरले बंधू ज्योतिदादा) पद्मा नदीतले इंलिश मासे आणि कासवाची अंडी आणून द्यायचा.

त्यानं मला गोष्ट सांगितली होती.एकदा म्हणे चैतर महिना सरत आला होता, तेव्हा तो मासे धरायला गेला होता.एकदम आला. कालवैशाखीचा पाऊस. भयंकर तुफान. होडी बुडणार.. बुडणार.. अब्दुलनं दातात रश्शी गच्च पकडून पाण्यात उडी घेतली. पोहत पोहत आला नदीतल्या बेटावर आणि खेचून आणली होडी.

गोष्ट इतकी चटकन संपावी हे मला पसंत पडली नाही. होडी बुडाली नाही, काही नाही. असाच आपला वाचला. ह्याला काय गोष्ट म्हणायचं? पुन्हा पुन्हा विचारायला लागलो, ''पुढे काय?''

तो म्हणाला, ''पुढं आणखी एक

भानगड. बघतो तर एक भयंकर वाघ.त्याच्या दोन्ही बाजूला ह्या अशा मिश्या.पावसाची झड सुरू झाली त्या वेळी तो चढला होता पलीकडल्या तीरावरच्या बाजारघाटावर उंबराच्या झाडावर. वादळवाऱ्याच्या दणक्यानं झाड मोडून पडलं पद्मा नदीत. वाघभाऊ लागले धारेला. गटांगळ्या खात येऊन पडले बेटावर. त्याला पाहिल्याबरोबर माझ्या रस्सीचा फास तयार केला.हे एवढे मोठ्ठे मोठ्ठे डोळे करून जनावर उभं राहिलं माझ्यापुढं.पोहून पोहून त्याला लागली होती भूक. मला पाहून त्याच्या लाल जिभेतून गळायला लागली लाळ. बाहेरची,आतली मिळून बरीचशी माणसं त्याच्या ओळखीची होऊन गेली होती, पण अब्दुल म्हणजे काय हे त्यानं ओळखलं नव्हतं. मी हाक दिली, ‘आओ बच्चा!’त्यानं पुढील दोन पाय उचल्याबरोबर दिला फास त्याच्या गळ्यात अडकवून.सुटायची जितकी धडपड करायला लागला तितका तो फास आवळत जाऊन त्याची जीभ बाहेर यायला लागली.’’

इतकं ऐकल्यावर मी अधीर होऊन



विचारलं,“मग तो मेला की काय?”

अब्दुल म्हणाला, “मरण त्याच्या बापाच्यानं झालं असतं काय? नदीला पूर येतोय. बहादूरगंजला परत जायला हवं होतं ना? होडीला जुंपून त्या वाघाच्या बच्चाकडून खेचत नेली. गेला बाजार वीस कोसांच्या पल्ल्यापर्यंत. कण्हाबिण्हायला लागला की मी वल्ह्याची दांडकं खोचायची त्याच्या पोटात. दहा पंधरा तासांची वाट. दीड तासात पोहोचवून दिलंन.त्यानंतर काय झालं तो सवाल मात्र विचारू नकोस– जबाब मिळणार नाही!”

मी म्हणतो,“अच्छा ठीक. वाघ झाला.आता सुसर?”

अब्दुल म्हणाला, “पाऱ्यावर तिच्या नाकाचा शेंडा खूप वेळा पाह्यलाय. नदीच्या पात्राच्या उतारावर ताणून आडवी होऊन ऊन खात असते.असं वाटतं की भारी पाजीपणानं हसतेय. बंदूक असती तर मुकाबला करता आला असता. लायसनची मुदत टळून गेलीय. पण गंमत झाली एके दिवशी कांची वैदूबाई नदीकाठी कोयतीनं बांबू ताशीत बसली होती. जवळच तिचं कोकरू बांधलेलं. कधी नदीतून सुसर आली आणि कोकराचं तंगडं धरून पाण्यात चालली ते कळलंच नाही.वैदूबाई चक्क उडी मारून बसली की तिच्या पाठीवर.हातातल्या कोयतीनं त्या राक्षसी पालीच्या गळ्यावर घावावर घाव घातले, कोकरू दिलं सोडून आणि मारली उडी पाण्यात.”

मी गडबडून विचारलं, “मग?”

अब्दुल म्हणाला, “मग काय झालं, ती कथा बुडून गेलीय पाण्याच्या तळाशी. वर काढून आणायला वेळ लागेल पुढल्या खेपेला येताना हेर पाठवून खबर काढून आणीन.” पण परत तर तो आलाच नाही. बहुधा खबर काढायला गेला असेल

ही अशी असायची पालखीमधली सफर. पालखीबाहेर कधी कधी माझी मास्तरकी चालायची. कठड्याचे दांडे हे माझे विद्यार्थी. घाबरून चूप राहायचे. त्यातला एखादा फार व्रात्य असायचा. अभ्यासात जरासुद्धा लक्ष नसलेला. मोठा झाल्यावर हमाली करावी लागेल असा धाक घालत होतो त्याला. मार खाऊन खाऊन सबंध अंगावर वळ उठले होते.पण व्रात्यपणा काही थांबायला तयार नव्हता. अर्थात तो थांबून चाललं नसतंच. खेळच खलास झाला असता..

माझा आणखीही एक आवडता खेळ होता. तो माझ्या लाकडी सिंगी माशाबरोबर चालायचा. पूजेच्या वेळी बळी द्यायच्या गोष्टी ऐकून मी ठरवून ठेवलं होतं की ह्या सिंगी माशाला बळी दिलं की बरीच धमाल उडेल. त्याच्या पाठीवर काठीनं बरेच घाव घातले होते.मंत्र बनवायला लागला होता. त्याच्याशिवाय पूजा होत नाही.

सिंगीमामा काटुम्
आन्दिबोशेर बाटुम्
उलूकुट ढूलूकुट ढयं कुड्कुड्
आक्रोड बिक्रोड खटखट खटास्
पटपट पटास्..

ह्यातले जवळजवळ सगळेच शब्द उसने आणलेले. फक्त 'आक्रोड' शब्द तेवढा माझा स्वत:चा. मला आक्रोड आवडायचे. माझं खडग होतं लाकडी 'खटास'शब्दावरून समजेल आणि ते फारसं मजबूत नव्हतं हे पटास शब्द सांगेल.

दिवस असेच चाललेयत एकामागून एक. शाळा दिवसाच्या मधल्या भागाचे लचके तोडून नेतेय. सकाळी आणि संध्याकाळीदेखील त्याचाच आणखी काही भाग हिसकावला जातो. आत शिरल्याबरोबर वर्गातली ती टेबलं,बाकं मनाला जणू काय आपल्या त्या खरबरीत कोपरांनी ढोसण्या देतायात.रोज त्यांचा एक मख्ख चेहरा.

संध्याळकाळी घरी परतायचो. घरातल्या शाळेत दिव्याच्या वातीनं उद्याच्या अभ्यासाच्या रस्त्यावरचा सिग्नल उचलून धरलेला.एखाद दिवशी अंगणात अस्वल नाचवणारा यायचा. गारुडी साप खेळवायला यायचा. आमच्या चितपूर रस्त्यावर आता त्यांचे डमरू वाजत नाहीत. सिनेमाला दुरूनच सलाम करून ते देश सोडून निघून गेले आहेत.वाळलेल्या पानांबरोबर आपला रंग बेमालूम मिसळून जसे एक प्रकारचे टोळ राहतात. तसा माझा जीवदेखील वाळक्या दिवसांबरोबर फिकट अवस्थेत मिसळून राहत होता.


त्याच काळाची आणखी एक गोष्ट.ऐकायला मजा वाटेल शिलाईदहला माळी फुलं आणून फुलदाणी सजवायचा.माझ्या डोक्यात एक सणक आली.फुलांच्या रंगीत रसांनी कविता लिहायची. दाबून दाबून जितका रस मिळायचा, तो लेखणीच्या तोंडावरदेखील येईना.मग विचार करायला लागलो.एक यंत्र तयार करायला हवं. फट असलेला एक लाकडी वाडगा. त्याच्यात गोलगोल घोटायला एक वरवंटा. दोरीनं बांधलेल्या एका चाकानं तो फिरवता येईल.ज्योतीदादांपुढं अर्ज पेश केला. कदाचित मनातल्या मनात ते हसले असतील. पण ते बाहेर लक्षात आलं नाही हुकूम झाला. सुतार आला. लाकडंबिकडं घेऊन. यंत्र तयार झालं.फुलांनी भरलेल्या त्या लाकडी वाडग्यात दोरीनं बांधलेला वरवंटा जितका फिरवत राहायचो, तितकी फुलं वाटली जाऊन चिखल होऊन जायचा. रस निघायचा नाही. ज्योतिदादांनी पाहिलं की फुलांचा रस आणि यंत्राचा दाब यांचं यमक जुळलं नाही तरीदेखील माझ्या तोंडावर हसले नाहीत.

*(पान क्र. १६३ वर पुढे चालू)*

कथा

# अंतरिचा देव जाणावा

**गिरिजा कौर**



गणू माझ्याकडे शेजारच्या चंद्रशेखरबरोबर आला. शेखरला पंधरा ऑगस्टची माहिती हवी होती.शेखर म्हणाला,'मावशी, हळूहळू बोला, मी लिहून घेतो.' मी म्हटलं, 'शेखर हे बरोबर नाही. मी तुला सगळा इतिहास समजावून सांगते. तू नीट ऐक. मग तुझ्या शब्दात लिहून काढ. लिहिलेलं मला दाखव. मी दुरुस्त करून देईन. वाचलं पाहिजे. ऐकलं पाहिजे. त्यातून शिक्षण होतं. नुसती बांधलेली शिदोरी काय कामाची?' शेखर बरोबर गणूही माझं बोलणं मन लावून ऐकत होता.

दुसरे दिवशी सकाळीच बेल वाजली.मी दार उघडलं. दारात गणू. गणू हात जोडून म्हणला, 'मॅडम मी आत येऊ? तुमचं कालचं बोलणं मला फार गोड वाटलं बघा. मी तुमच्याकडे रोज येत जाऊ?,

'रोज? रोज येऊन काय करशील?'

'तुम्हाला मदत करीन.' मी गणूकडं पाहिलं. हडकुळा, काळा गणू. अंगावर जुनेपाने कपडे. पण स्वच्छ धुतलेले. केस नीट विंचरलेले.१७-१८वर्षाचा असेल तो.

'काय करतोस तू?' तो खाली मान घालून म्हणाला, 'एस्. एस्. सी. ला बसलो होतो. इंग्रजीत गेलो. आमच्या घरी कुणी शिकलेलं नाही. मला कोण सांगणार चुकलेलं?''

**मोत्यासारख्या सुंदर अक्षरात गणाधीश लिहायचा आणि म्हणायचा, ''तुम्ही मला शिकवा, मी तुमचं लिहायचं काम करीन.'' बोलताना उपकार, आभार हे शब्द तो वापरत नव्हता. पण त्याच्या आवाजात कृतज्ञता होती.**

'मराठी तर शुद्ध बोलतोस.इंग्रजी शिकवेन मी तुला.'

'माझं अक्षर पण चांगलं आहे मॅडम!'

'होय? लिहून दाखव बघू.'

मग त्यानं आपल्या मोत्यासारख्या अक्षरात थोडा मजकूर लिहून दाखवला. त्याचं अक्षर सुरेख होतंच, शिवाय त्याला छान वळणं होतं, लिहिण्यात विश्वास होता.

'इतकं चांगलं कसं लिहितोस?'

'माझ्या एका शिक्षकांनी शिकवलं.फार चांगले होते गुरूजी.' अक्षर घोटून घ्यायचे.

रोज लिहायला सांगायचे. खूप माहिती सांगायचे. म्हणायचे, ‘‘तुम्ही शहाणी मुलं व्हा. चांगले नागरिक व्हा.’’तुम्ही बोलताना मला सारखी गुरुजींचीच आठवण होत होती बघा.’’

‘मग आता कुठे आहेत तुझे गुरुजी?’

‘गुंडांनी त्यांना घालवून दिलं. म्हणाले, ‘आमच्या झोपडपट्टीत यायचं काम नाही मास्तर. आमची मुलं काय ऑफिसर, प्रोफेसर होणार नाहीत.’ गुरुजींना दम भरून घालवून दिलं.मग त्यांनी बदली करून घेतली. आमचा आधार गेला... ’बोलताना त्याचा आवाज दाटून आला.मी म्हटलं,‘मी शिकवेन तुला.येत जा माझ्याकडं आणि लिहायचं कामही देईन.त्याचे पैसे देईन.

‘पैसे नकोत मला.तुम्ही शिकवा.मी तुमचं लिहायचं काम करीन. चालेल?’ मी हसले. कुणाकडून फुकट काही घ्यायचं नाही हे त्याच्या गुरूजींनीच त्याला शिकवलं असावं.

‘नाव काय म्हणालास तुझं?’

‘गणू.’

‘असं कसं असेल?’



'तसंच आहे.'

'अरे गणाधीशचं गणू झालं असेल हो! आपण तुला''गणाधीश''म्हणूनच हाक मारणार.'गणू तोंडभर हसला. मी त्याला गणाधीश म्हणून हाक मारली की तो हातातलं काम टाकून चटकन समोर यायचा मोठ्या ऐटीत.नावाचा आब राखला पाहिजे ना!

गणाधीश मोठा हुशार मुलगा होता.माझ्या लेखनाची सुरेख प्रत तयार करून द्यायचा.फायली तयार करायचा. पुस्तकं लावायचा.पुस्तकांची त्यानं सूची तयार केली होती.

एखादी कथा किंवा लेख लिहून झाला की तो त्याला साजेसं सुरेख चित्र काढायचा. गणाधीश हा खरा कलावंत होता. माझ्या हरकामात मला त्याची मदत लागायची.

एकदा मला पाठदुखीचं मोठं दुखणं झालं. हॉस्पिटलमध्ये राहणं भाग पडलं. उपाय सुरू होते. मी अंथरूणावर पडून होते. गणाधीश पत्ता शोधत आला. हातात फुलं.'अरे तू आलास?'

'होय मॅडम.तुम्हाला ॲडमिट केल्याचं कळलं म्हणून इकडे धाव घेतली.'त्यानं केलेल्या कामाचा आढावा घेतला.आलेली पत्रं तो घेऊन आला होता.ती त्यानं वाचून दाखविली.

मग तो रोजच यायचा. सकाळी माझ्या घरून चहा घेऊन यायचा. माझी खोली नीट लावायचा.खिडकीत फुलदाणीत फुलं ठेवायचा.हवं-नको विचारून शाळेला पळायचा.संध्याकाळी पुन्हा घरी जाऊन पत्रं घेऊन यायचा. मला विचारून उत्तरं पाठवायचा. शनिवारी-रविवारी पुस्तकं घेऊन यायचा. त्यातलं काही काही वाचून दाखवायचा. गणाधीशाच्या सेवेला तोड नव्हती. मी म्हणायची,'किती करतोस माझं!'तो लगेच म्हणायचा,'तुम्ही माझ्या गुरू आहात. तुमच्या आशिर्वादानं मी शिकेन. आणि...'

'कायरे?बोल की?'

'तुम्ही माझ्या थोरल्या मैत्रीण पण आहात.मी माझ्या घरचं- बाहेरचं सगळं सांगतो.तुम्ही किती आपुलकीनं वागता माझ्याशी.आजपर्यंत मला एवढं कुणीच वागवलं नव्हतं.'उपकार, आभार हे शब्द तो वापरत नव्हता.पण त्याच्या आवाजात कृतज्ञता होती.

मी घरी आले त्या दिवशी गणाधीशाच्या हातात एक पाकीट दिलं आणि पुस्तक.'हे काय?' त्यानं आश्चर्यानं विचारलं.

'गणाधीश तू रोज एवढ्या लांब येत होतास.एवढा वेळ घालवत होतास.तुझ्या पुस्तक-वह्यांसाठी, पेनासाठी हे पैसे.'

'मॅडम,तुम्ही ही परतफेड करताय?'

'नाही रे बेटा.हे ठेव तुझ्याजवळ.तुझ्या

बससाठी तर खर्च झाला असेल?‘नाही मॅडम मी रोज चालत येत होतो आणि चालत जात होतो.’

‘चालत? म्हणजे तुझ्या घरापासून हे दोन ते अडीच किलोमीटर अंतर तू सकाळ–संध्याकाळ चालत यायचास आणि चालत जायचास? मग सकाळी जेवायचास केव्हा? गणाधीशनं मान खाली घातली.माझ्या पोटात तुटलं. स्वामिभक्तीचं याहीपेक्षा सुंदर उदाहरण कुठं पाहायला मिळेल?मलाच अपराध्यासारखं वाटलं. काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हटल ‘‘निदान पुस्तक तरी घे. माझं पुस्तक आहे हे.’

‘आज मला काहीच देऊ नका.तुम्ही मला नुसतं इंग्रजी तर शिकवत नाहीच,जगायचं कसं, वागायचं कसं हेही शिकवता.तुमच्या घरी येऊन मी माणसासारखा वागायला शिकलो.आपल्यापेक्षा लहानाशी आपुलकीनं वागायला शिकलो. चांगली भाषा शिकलो.तुम्ही मला प्रेम द्यायला शिकवलंत.गुरूला दक्षिणा द्यायची असते मी काय देऊ?मी झोपडीत राहणारा मुलगा. तुमची सेवा करायला मिळाली हीच माझी गुरूदक्षिणा.’

गणाधीशनं माझ्या पायावर डोकं टेकलं. त्याच्या चांगुलपणानं मला मोठं केलं होतं.



प्रत्येक माणसात कुठेतरी परमेश्वरी अंश असतो.तो त्याला मोठं करतोच. पण त्याच्या सहवासात येणाऱ्यांना थोरपण देऊन जातो.

***

**गिरीजा कीर,** ए, झपूर्झा,
साहित्य सहवास, बांद्रे, (पूर्व)
मुंबई – ५१.

If I cannot understand my friend's silence, I will never understand his words.


# हवेचा दाब

डॉ. देसाई

**हवेच्या दाबाचे व्यवहारात आपण अनेक उपयोग करत असतो. रोजच्या वापरातल्या उपकरणांमागे कोणते ना कोणते वैज्ञानिक तत्त्व असते. तत्त्व कोणते हे आपण शोधले पाहिजे.**

जीवसृष्टीच्या अस्तिवासाठी हवा हा म्हत्त्वाचा घटक आहे. ''झळूक''आल्यावर आपल्याला तिचे अस्तिव जाणवते. तर वादळ, चक्रीवादळ आणि तुफानाच्या रूपाने तिच्या रौद्रत्वाची कल्पना येते. पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वातावरण तयार झाले. सृष्टीतील उलाढालींमुळे, सजीवांच्या दैनंदिन व्यवहारामुळे वातावरणात बदल होत गेला. या बदलांतून आजच्या वातावरणाची संरचना तयार झालेली आहे. यात पुढेही बदल होत राहतील. हवेविषयी विशेषत: हवेच्या दाबाविषयी आपण थोडीफार माहिती समजून घेऊ या.

पृथ्वीच्या भोवती वातावरणाचे जे घनदाट आवरण आहे, त्यातील जवळजवळ ९०ते ९५% वातावरण पृष्ठभागापासून पहिल्या १०कि.मी मध्येच




आहे. हवेवर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचे बल सतत कार्य करीत असल्याने हे आवरण पृथ्वीला लपेटून राहते.समुद्रसपाटीला एक चौ.से.मी.इतक्या क्षेत्रफळावर सुमारे एक कि.ग्रॅ इतके हवेचे वस्तुमान असते व एक चौ.से.मी.वर १०न्युटन बल इतके बल कार्य करीत असते.याचा अर्थ सामान्य मानवाच्या डोक्यावर आणि खांद्यावर मिळून सुमारे चारशे किलो हवेचे वस्तुमान असते किंवा चार हजार न्युटन इतके बल असते.

हवेच्या वस्तूमानाचे आणि त्यामुळे येणाऱ्या वजनाचे अस्तित्व अगदी साध्या साधनांपासून आपणाला समजू शकते.३०ते ३५से.मी.लांब, ५-६ सें.मी. रुंद व दीड ते दोन मि.मी जाड लाकडाची फळी अथवा प्लायवुडचा तुकडा वर्तमानपत्राचे चार-पाच कागद इतके कमी साहित्य यासाठी पुरते.टेबलाच्या सुमारे तीन ते चार से.मी बाहेर येईल अशाप्रकारे ही लाकडाची पट्टी ठेवा.लाकडाच्या फळीवर वर्तमानपत्राचा दुहेरी कागद टेबलाच्या कडेला समांतर ठेवा. हा कागद टेबलाच्या पृष्ठभागाला चिकटेल अशा रीतीने दोन्ही हातांनी अलगद सपाट करा.या कागदावर वर्तमानपत्राचे

अजून दोन-चार कागद ठेवा व तेही अशा प्रकारे सपाट करा.आता फळीच्या बरोबर समोर बसा अथवा उभे राहा.मुठीने अथवा लाकडी हातोडीने या फळीवर फट्कन् फटका मारा. कागद उडून अथवा फाटून जाण्याएवेजी फळीच तुटून गेलेली अढळेल.जणू काही ही फळी टेबलाला घट्ट ठोकली होती.

वर्तमानपत्राचे क्षेत्रफळ सुमारे चार हजार चारशे सें.मी इतके असते.दर चौ.सें.मीवर १कि.ग्रॅ इतके वस्तुमान धरले तरी वर्तमानपत्रावर म्हणजेच पर्यायाने पट्टीवर चार हजार चारशे कि.ग्रॅ इतके वस्तुमान ठेवले असा त्याचा अर्थ होतो.चव्वेचाळीस हजार न्यूटन इतक्या बलाने पट्टी दाबून धरलेली असल्याने फटका बसताच ती तुटते. पट्टी वर्तमानपत्राच्या वजनाने निश्चित सुटत नाही.वर्तमानपत्राची घडी पट्टीवर ठेवली आणि लाकडी पट्टीला फटका मारला तर वर्तमानपत्राची घडी वर उंच उडून जाते.




म्हणजेच पट्टी हवेच्या वजनाने,हवेच्या दाबाने तुटते. यावरून हवेला वस्तूमान व वजन असते व त्यामुळे वातावरणात हवेचा दाब असतो हे अनुभवास येते.

**हवेच्या दाबाचे मापन**

रबरी फुग्यात तोंडाने हवा भरून आपण फुगा फुगवतो. रबरी फुग्याच्या आतील हवेचा दाब किती जास्त आहे याचे मापन करणे शक्य आहे.एक रबरी फुगा एक इंग्रजी ''यू''आकाराची व एक ''टी आकारची नळी व त्याला जोडणाऱ्या रबरी नळ्या यांच्या साहाय्याने हे मापन करणे शक्य आहे.वरील साहित्यापासून आकृतीत दाखविल्याप्रमाणे जोडणी करू. सर्व जोड हवाबंद करणे आवश्यक आहे. त्यासाठी एम्.सील अथवा ॲडल्डाईड सारख्या बाजारात मिळणाऱ्या रसायनाचा वापर करावा.यू नळीत पाणी भरा. वातावरणातील हवेचा दाब आणि फुग्यातील हवेचा दाब सारखा असल्याने सुरूवातीला म्हणजेच फुगा फुगवलेला नसताना यू नळीच्या दोन्ही स्तंभातील पाण्याची पातळी सारखी असलेली आढळेल.

आता रबरी फुगा फुगवा.नळीचे टोक अंगठ्याने बंद करून ठेवा आणि यू नळीच्या दोन्ही स्तंभातील पाण्याच्या पातळीचे निरीक्षण करा.फुग्यात हवा भरून आपण आतील हवेचा दाब वाढविला. हवेचा दाब


फुग्याच्या आतील पृष्ठभागावर कार्य करतो म्हणून फुगा फुगतो.त्याचप्रमाणे यू नळीतील एका स्तंभातील पाण्यावर कार्य करतो. यामुळे या स्तंभातील पाणी खाली दाबले जाते.साहजिक दुसऱ्या स्तंभातील पाणी वर येते.फुग्यातील हवेचा दाब आणि वातावरणातील हवेचा दाब यातील फरक दोन स्तंभातील पाण्याच्या फरकाने दाखविला जातो.फुग्यातील हवेचा दाब वाढवून फुग्याचा व्यास वाढवल्यास दोन स्तंभातील पाण्याच्या पातळ्यांमधील फरक वाढतो व फुग्याचा व्यास कमी केल्यास दोन स्तंभातील पाण्याच्या पातळ्यांमधील फरक कमी होतो.आणि म्हणून वातावरणापेक्षा



फुग्यातील हवेचा दाब दोन स्तंभातील पाण्याच्या फरकाशी समप्रमाणात असतो,हे सिद्ध होते.


शोष कपांच्या साहाय्याने हवेच्या दाबाचे मापन करणे शक्य आहे.शोष कप एका बाजूने खोलगट असून दुसऱ्या बाजूने त्याला आकडा किंवा हूक असतो.त्याचे कार्य हवेच्या दाबावर चालते.खोलगट बाजू भिंतीवर किंवा गुळगुळीत पृष्ठभागावर ठेवून दाबली असता आतील हवा बाहेर निघून जाते.त्यामुळे आतील हवेचा दाब बाहेरील हवेच्या दाबापेक्षा कमी होतो. बाहेरील हवेचा दाब या कपाला सारखा बाहेरून आत दाबत असतो.जोपर्यंत बाजूने किंवा अन्य काही मार्गाने हवा आत घुसत नाही तोपर्यंत हा कप भिंतीला चिकटून राहतो.या कपाचा वापर करून हवेचा दाब (जवळजवळ) मोजता येणे शक्य आहे.

दोन शोष कप घ्या.खोलगट भाग एकमेकांवर ठेऊन दाबा.ते एकमेकांना जोडले जातील.हे कप वेगळे करण्याचा प्रयत्न केल्यास ते सहजासहजी वेगळे होत नाहीत. आता कपांच्या दोन्ही बाजूला दोऱ्या बांधा. दोन्ही दोऱ्या खेचून हे कप अलग करण्याचा प्रयत्न करा. हे कप वेगळे करण्यास खूपच बल लागते असे लक्षात येईल.या दोन दोऱ्या दोन कप्प्यांवरून खाली सोडा.प्रत्येक दोरीच्या टोकाला तराजूची एकेक तागडी लावा.दोन्ही बाजूला सारखे वजन टाका.व हळूहळू वजन वाढवत जा.एका विशिष्ट बलाला हे दोन्ही कप एकमेकांपासून अलग होतील. आता एका कपाची त्रिज्या मोजून त्याचे क्षेत्रफळ काढा.कप वेगळे करण्यासाठी लागणाऱ्या बलास कपाच्या क्षेत्रफळाने भागले असता



येणारा दाब जवळ जवळ हवेच्या दाबाइतका येईल.

वक्रनलिकेचे कार्यही हवेच्या दाबावरच चालते याचे तत्त्व साध्या प्रयोगातून समजावून घेता येते. दोन काचेचे पेले घ्या ते अध्यापर्यंत पाण्याने भरा.पाण्याने भरलेल्या रबरी नळीने दोन्ही पेले एकमेकांना जोडा. आता एक पेला दुसऱ्यापेक्षा वर



उचला. वर उचललेल्या पेल्यातील पाणी वर नळीतून खाली असलेल्या पेल्यात वाहू लागते.खालचा पेला वर वरचा पेला खाली केल्यास पाणी विरूद्ध दिशेने वाहू लागते.दोन्ही पेल्यांतील पातळी समान होईपर्यंत पाणी वहात राहते.

दोन्ही पेल्यांमधील पाण्याची पातळी जेव्हा सारखी असते तेव्हा नळीतील पाण्याचा स्तंभ तोलला जातो. जेव्हा एक पेला खाली जातो तेव्हा त्या पेल्यातील रबरी नळी दुसऱ्या पेल्यातील रबरी नळीपेक्षा उंच होते. या पेल्यातील हवा पाण्याचा जादा स्तंभ तोलून धरते. उंच पेल्यातील हवेला पाण्याचा कमी स्तंभ तोलून धरावा लागतो. त्यामुळे खालच्या पेल्यातील नळीच्या आत कमी दाब निर्माण होतो. पाणी जास्त दाबाकडून कमी दाबाकडे वाहते म्हणून प्रवाह सुरू होतो.दोन्ही पेल्यांतील पाण्याची पातळी एक होताच दोन्ही नळ्यांच्या आत दाब एकसमान होतो व प्रवाह थांबतो.

हवेच्या दाबाचे व्यवहारात आपण अनेक उपयोग करत असतो.इंजेक्शन देण्याच्या सिरींजने डॉक्टर बाटलीतील औषध वर ओढतात किंवा प्लॉस्टिकच्या नळीने- स्ट्रॉने आपण बाटलीतील शीतपेय वर ओढून पीत असतो.वास्तविकत: आपण शीतपेय वर ओढत नाही.नळीमध्ये असलेली हवा आपण तोंडाने वर

ओढतो.यामुळे नळीतील हवेचा दाब कमी होतो.म्हणजेच बाटलीतील पाण्यावर वातावरणाच्या दाबाइतका दाब निर्माण होतो.पाणी अथवा कोणताही द्रव पदार्थ जास्त दाबाकडून कमी दाबाकडे वाहू लागतो.म्हणजेच बाटलीतील द्रव हवेच्या दाबामुळे वर ढकलला जातो अथवा वरच्या दिशेने वाहू लागतो.म्हणजेच बाहेरची हवा शीतपेय तोंडात ढकलत असते व आपण ते पीत राहतो.तसेच इंजेक्शनच्या सिरींजमध्ये औषधे घेण्यापूर्वी प्रथम दट्टया पूर्णपणे आत दाबलेला असतो. नंतर सुई औषधाच्या बाटलीत खुपसतात.आता दट्या वर खेचला असता सिरींजमध्ये हवेचा दाब कमी होतो व वर विवरण केल्याप्रमाणे औषध वर ढकलले जाते.

डब्यातून रॉकेल काढण्याचा पंप, याच तत्वावर काम करतो.शेतीचा पंपही याच तत्वावर काम करत असल्याने पाण्याच्या पातळीपासून पंप जास्तीत जास्त ३३फूट उंच असेल तरच तो कार्य करतो. अन्यथा इंजिन कितीही शक्तीशाली असले तरी पाणी वर येणार नाही.

आपल्या दैनंदिन व्यवहारातील सर्व उपकरणांमागे कोणते ना कोणते वैज्ञानिक तत्व असते.या तत्वाचा शोध घेण्याची वृत्ती आपण जोपासायला हवी. यातून होणारा बोधच आपणाला मार्गदर्शक ठरेल.

भ भ भ

**डॉ.देसाई,** द्वारा विज्ञान शोधिका, भारतीय विद्याभवन, सेनापती बापट रस्ता पुणे-१६.

**<u>प्रयोग करून तर पाहा!</u>**

**आवश्यक साहित्य :** काचेचा पेला, हातरुमाल, पाण्याने भरलेली बादली अथवा टब.

सर्वप्रथम हातरुमाल गोळा करा व पेल्याच्या तळाशी घट्ट बसवा.पेला उलटा केल्यावर देखील रुमाल पडणार नाही याची खात्री करून घ्या.आता हा पेला पाण्याच्या पृष्ठभागावर उपडा धरा व सरळ खाली ढकला. तुमचा हात पेल्याच्या बुडावर ठेवा म्हणजे तो उलटणार नाही.

आता पेला पाण्याबाहेर काढा व हातरुमाल त्यातून बाहेर काढा. तो संपूर्णपणे कोरडा दिसेल! एवढ्या पाण्यात जाऊनही तो कोरडा कसा काय राहू शकला? याचं कारण म्हणजे पेल्यात कोडली गेलेली हवा. ही हवाच त्या पाण्याला पेल्यात शिरण्यास मज्जाव करते व रुमाल पाण्यापासून सुरक्षित राहू शकतो !

**कथा**

# किरात

**शैलजा राजे**



श्रीमंत माधवराव पेशवे आणि रमाबाईसाहेब यांचे सारे श्राध्दोपचार आटोपले न् पेशवे कुटुंब थेऊरहून पुण्याला यायला निघालं. राघोबादादा सहआनंदीबाई पुढे निघून गेल्या होत्या. जाताना राघोबांनी नारायणरावाला जवळ घेतलं न् म्हणाले, ''नारायणा अजून लहान आहेस तू! सांभाळून राहा.आम्ही पुढे होतो,तुमची तिथली व्यवस्था करून घेतो.'' ''पण काका– मला एकट्याला टाकून जाऊ नका. मला फार भीती वाटते काका!''

''भ्यायचं रे कशाला? एकटा तरी कुठं आहेस.रास्तेमामा आहेत तुझे!''

नारायणरावाला कमीजास्त बोलू न देताच राघोबांनी घोड्याला टाच दिली, मागोमाग आनंदीबाईंचा मेणाही हालला. मागे राहिलेली मंडळी मोठ्या दु:खी मनानं एकेक गोष्ट आवरत होती. शेवटचे चारसहा महिने माधवराव पेशव्यांनी इथंच थेऊरमध्ये श्री गजाननाच्या पायाशी काढले होते. वैद्य, हकीम, जडीबुटीवाले, फार काय टोपीव्यांची औषधं लावली होती.पण उतार पडला नाही तो नाहीच, आणि अखेर श्रीमंतांनी गजाननाच्या चरणी आपला देह ठेवला आणि नको ते अघटित घडलं. रमाबाईसाहेब कुणाचं न ऐकता निग्रहानं सती गेल्या.अवघं थेऊर डोळे गाळत, हुंदके देत निरोप द्यायला आलं होतं न् आता गाड्यावरून,खेचरांवरून सामान चाललं होतं.

**सारा लवाजमा पुण्याला आला. पहिले दोनचार महिने नीट गेले ... आणि घडू नये ते घडले. ''मावशी मी ... मी हरलो, रमामाँ रागवतील.'' – किरात अडखळत म्हणाला.**

बाराचौदा वर्षाचा किरातसिंग आपल्या परीनं जे जमेल ते काम करीत होता.कुणीतरी त्याला हाक मारीत होतं.तो धावत होता. त्याच्याकडे कुणाचंही लक्ष नव्हतं. काम करता करता तो आपल्या सदऱ्यांच्या बाहीनं डोळे पुसीत होता,फुटणारं रडू आवरत होता.

जवळ जवळ सगळं सामान गाड्यांत भरलं गेलं. काही खेचरांच्या पाठीवर लादलं गेलं. आता नेमकेच महत्त्वाचे डाग उरले होते. कारभारीबुवा आतल्या दालनात गेले. इथंच रमाबाईसाहेबांचा मुक्काम असायचा.

इथंच एका कोपऱ्यात त्यांचं छोटसं देवघर होतं. या देवांना फुलं आणून देण्याचं काम किरातसिंगचं होतं. पहाटे उठल्या की रमाबाई बाहेर येऊन त्याला साद घालायच्या 'किरात'.

''अभी आया रमामाँ''असं म्हणत किरात धडपडत उठायचा.

खरं त्याचं नाव कर्तारसिंग होतं. त्याला आपण इथं कधी,कसे आलो हेही नीटसं त्याला आठवत नव्हतं.चाचा सुमेरसिंगनं आपल्याला एक दिवस इथं आणलं एवढंच त्याला आठवत होतं.त्याला पाहून गोपिकाबाई म्हणाल्या होत्या. ''अरे सुमेरसिंग किती लहान लेकरू हे! काय काम करणार तो! आईविना राहील का तो?''

''आईसाहेब आईच नाही त्याला. गावाला कोण बघणार त्याच्याकडे म्हणून आपल्या सावलीला आणलाय!'

त्यादिवशीच गोपिकाबाईंनी त्याला रमाबाईच्या स्वाधीन केलं न् ''रमा हा आपल्या सुमेरसिंगचा पुतण्या.राहू दे तुझ्याजवळ.आईविना पोर आहे!''



आणि त्यावेळीच रमाबाईनी त्याला जवळ केलं,ते आतपर्यंत! माधवरावांच्या त्या भयंकर आजारपणात तहानभूक विसरून रमाबाई सेवा करीत होत्या न् हा त्यांचा किरात मधूनच कुठूनतरी दुधाचा पेला घेऊन जात होता न् विनवीत होता, ''माँ हे दूध घ्या!मेरी कसम आपको!''

मग जवळपास असलेली दासी बोलायची,''बाईसाहेब आपण दूध घेतल्याशिवाय मी जेवणार नाही असं म्हणून हा सकाळपासून उपाशी आहे बघा!''

रमाबाई पेला घ्यायच्या, अर्धामुर्धा कसातरी प्यायच्या न् म्हणायच्या ''जा रे बाबा आता जेव जा! कुणीतरी याला ताट वाढून द्या गं!

त्यावेळी रमाबाईंनी त्याला आपल्या महालात आणलं न् त्या माधवरावांना म्हणाल्या, ''ऐकलं का, सासूबाईंनी मला एक खेळणं दिलं आज! कर्तार नाव आहे याचं! आपल्या सुमेरसिंगचा पुतण्या!''

''व्वा! आता याच्याकडून काय काम करून घेणार?

''कामाचं राहू दे! पण मी आधी याचं नाव बदलणार आहे!''

''मग बारशाचा थाट जोरात होणार तर! पण या एवढ्या सातआठ वर्षाच्या बाळाला पाळणा कुठून आणायचा?''

रमाबाईंनी त्यावेळी क्षणभर आपले ओठ आवळून घेतले. मग दुसऱ्याच क्षणी हसूनत्या म्हणाल्या, ''मला पाळणा नको न् बारशाचा थाटमाट नको, मी आपली याला किरात म्हणणार! शंकराचं नाव आहे!''

आणि त्या दिवसापासून अवघ्या घरादाराचा तो किरात झाला न् रमाबाई त्याच्या रमामाँ झाल्या! एखाद्या सावलीसारखा तो रमामाँच्या मागेमागे असायचा. म्हणूनच रमाबाईंच्या बरोबर तो थेऊरला आला होता. आणि रमामाँला इथंच सोडून तो एकटाच पुण्याला निघाला होता, रमामाँनी त्याला दोन दिवस आधीच जवळ घेऊन सांगितलं होतं,''किरात'' मी आता परत येणार नाही, तू परत जा आणि तुझ्या गंगादीदीला सोबत कर! जाशील ना?''

''नाही! मी इथंच आपल्याबरोबर राहणार!''

''माझा शब्द मोडणार तू? ऐकणार नाही माझं?''

''ऐकणार माँ! पण.. ''त्याला रडू आवरत नव्हतं.

रामाबाईंनी त्याला जवळ घेतलं. त्याच्या तोंडावरून हात फिरवीत बोलल्या, ''किरात आता तू मोठा झालास.बघ तुला किती दाढीमिशी यायला लागलीय. अशा वेळी तू काय करायचं माहीत आहे?

''काय?

''तू आता सगळीकडे बारीक लक्ष ठेवायचं. नारायणदादा पेशवे यांचा तू बहिर्जी व्हायचं.'' गंगादीदीला सोबत करायची.''

''आणि आपण?रमामाँ इथंच राहू दे ना तुमच्यापाशी!''

''नाही! किरात,तुला पुण्यालाच जायला हवं! ऐकणार ना?''

किरातनं अंगठी काढून रमाबाईंच्या हातात दिली. घोगऱ्या आवाजात तो म्हणाला, ''रमामाँ, तुमची आठवण राहायला अंगठी कशाला? पण माझं एक मागणं आहे. मी आता पुण्याला गेलो तरीपण तुमच्याच जवळ येणार मग मात्र मला कुठे दुसरीकडे पाठवू नका!''

दोनच दिवसांनी श्रीमंत माधवराव पेशवे गजानन चरणी विलीन झाले न् थेऊरच्या वाड्यात एकच हाहा:कार उसळला. किरातलाही आपले अश्रू आवरत नव्हते. सभोवती खूपच गर्दी होती,पण त्या गर्दीतूनही तो आपल्या रमामाँकडे पाहात होता. त्या आक्रोश करीत नव्हत्या,पण त्यांचा चेहरा वेगळाच वाटत होता. आणि मग सारी तयारी झाली. पेशव्यांची पालखी निघाली न् मागून रमामाँ चालल्या होत्या.किती छान एखाद्या लक्ष्मीसारख्या त्या दिसत होत्या. किरात दुरूनच आपल्या रमामाँकडे पाहात होता.पालखी नदीकाठी आली,चंदनाची चिता रचली होती.पेशव्यांना त्या चितेवर निजवलं न् बघता बघता रमामाँ वर चढल्या.चहूबांजूनी ज्वाळा भडकल्या,आणि दूर उभ्या असणाऱ्या किरातनं 'माँ माँ' करीत चितेकडे धाव घेतली.गर्दीतल्या दोनचार माणसांनी त्याला धरून दूर नेलं,सखूनं त्याला धरून आत नेलं आणि त्याला पोटाशी धरून ती रडत म्हणाली, ''किरात असा आक्रंदू नकोस रे! तुझी माँ सती गेली. देवांनी तिला आपल्यात घेतली.''

ते दहापंधरा दिवस हे असेच शोकाकुल अवस्थेतच गेले. मग हळूहळू एकेक गोष्टी होत होत्या. सामानाची आवराआवर सूरू होती. एक दिवस किरातचा चाचा सुमेरसिंग कारभाऱ्यांना म्हणाला, ''मी आता याला घेऊन जातो. आता कुठं राहणार तो? चल कर्तार!''

''नही, मै नही आऊंगा! मी गंगादीदींच्या जवळ राहणार आहे. माँनी मला तसं सांगितलंय! त्याची आज्ञा आहे ती!

''होय सरदार! बाईसाहेबांनी माझीही तिथंच नेमणूक केलीय. आम्ही दोघं तिथंच एकत्र राहू.पहिल्यासारखेच! ''सखू म्हणाली.

कारभाऱ्यांनी अनुज्ञा दिली.सुमेरसिंग



परत गेला.जाताना किरातला म्हणाला, ''बेटा,पण या चाचाकडे येत जा मधूनमधून.''

कधीकधी तो खेळत खेळत किंवा काही कामासाठी म्हणूनसुद्धा राघोबादादांच्या महाली जात होता. तिथं त्याला चाचाही भेटायचा.


चाचामुळे तो बऱ्याच वेळा तिथं जायचा.अलीकडे त्याला काहीतरी वेगळं वाटायचं.काकासाहेब पेशवे आणि आपला चाचा यांच्या काही गुप्त मसलती चाललेल्या असाव्यात एवढं कळण्याइतपत तो नेणता झाला होता.

एक दिवस तो सखूला म्हणाला,''मावशी काय ते नीटसं समजत नाही, पण हल्ली त्या महालात चाचाची सतत उठबस असते.हळूहळू बराच वेळ काहीतरी बोलत असतात दोघं!''

''होय रे! मलाही काहीतरी कट शिजल्याचा संशय येतोय? एक कर, सतत तुझ्या चाचापाशीच राहा दोनचार दिवसांनी मला येऊन भेट!काय ते कळव!आपण दरबारातील वडील माणसांच्या कानी घालू! देव कसा निष्ठूर बघ! पराक्रमी पेशवे गेले न् या एवढ्याशा पोरावर ही जबाबदारी आलीय! बरं श्रीमंतांच्यात तेवढी तडफ

(पान क्र. १५५ वर पुढे चालू)

# प्रिय आभाळा !



आभाळा रे, तुझे नवोनव रूप लोचनी साठवतो
पतंगावरी लिहुनी माझे पत्र तुला मी पाठवितो.

तुझ्यात उगवे भास्कर, लाभे तेजाचा वर तुझ्यामुळे
फुलुनी येते जन-वन- मानस, रूपगंधरसरंग मिळे

लखलख करिता लाख चांदण्या वस्त्र निशेचे सळसळते
पांघरूनी रेशमी चांदणे झोप सुखाची जग घेते

शुभ्र अभ्र पसरिते पंख कधी कधी वाऱ्याच्या लहरीवरती
शुभ्र शिडांच्या नौका कुठल्या साहससहलीवर जाती

बिजली करी सोनेरी तांडव मृदुंग घुमतो मेघांचा
समृद्धीच्या पूर आणतो सुर रूपेरी रेघांचा

तुझ्याच छत्राखाली मित्रा सुखे राहतो सर्व जरी
पत्र पाठवुनी एक विनंती करितो तुजला वाच तरी

वेळेवरती व्हावा पाऊस वेळेवरती ऊन पडो
याहुनि दुसरे विनाशकारी तुझ्या हातुनी कधी न घडो!

आभाळा रे! पतंग माझा ओढुनी हृदयी धरशिल ना
पत्र वाचुनी इंद्रधनूतुनि उत्तर त्याचे देशील ना ?

प्रिय आभाळा मैत्री आपुली युगायुगांची दाट असे
लौकर पाठव उत्तर मित्रा, वाट किती मी पाहतसे?

**सरिता पदकी,**
दशभुजा गणपतीजवळ,
कर्वे रोड, पुणे-४

निसर्गाचे सारे विलास, निर्गुण संगीताचा प्रहार, मी सुकून गेलो तरी यांचा सुकणार नाही बहर

# गुंता

**मल्हार अरणकल्ले**

**ज्या टोकाला पकडून गुंता सोडवू पाहात होतो त्या बाजूनं गुंता सुटण्याच्या आशा मधेच आलेल्या एका भक्कम अनेक पदरी गाठीनं मावळल्या... माणसाच्या मनाला आव्हान स्वीकारण्याची जणू तहानच असते, नाही !**


माणसाचं मन रिकामं असलं म्हणजे ते जसं काहीबाही विचार करत राहतं, तसेच हात रिकामटेकडे असले म्हणजे तेही काही कमी उद्योग करीत नाहीत.

आता हेच पाहा ना, जमिनीवर पडलेला दोऱ्याचा तो गुंता उचलून हाती घेण्याचं टाळलं असतं तर तो गुंता सोडवण्यात

गुंतून जाण्याचं काहीच कारण नव्हतं; पण तेव्हा पुढ्यात नेमकं कोणतंही काम नव्हतं; म्हणून दोऱ्याचा गुंता सोडवू

लागलो.दोरा असून असून असा काहीसा लांब असणार आणि त्याचा गुंता सोडवायला वेळ लागणार, असा विचार करून,या गुंत्यातून किंचितसं बाहेर डोकावणारं दोऱ्याचं टोक पकडून ते सोडवू लागलो.

नेमकं कसं ते ठाऊक नाही; पण सुरुवातीला हे टोक हळूहळू मोकळं होत




चाललं. ते असं मोकळं होत असतानाच

मधे मधे गुंत्यातल्या धाग्यांत कुठं कुठं वेडीवाकडी वळणं घेऊन गुंतलेलं होतं. अगदी हलक्या हातांनी, सावकाशीनं

या वाटा- वळणांचा शोध घेत टोकं सुटं करण्याचा प्रयत्न निकरानं सुरू केला. एक दोन प्रयत्नांत यश आलंही; पुढं

मात्र गुंता एकमेकांत अधिकच गुंतत जाऊ लागला.

माणसाचा मनाला आव्हान स्वीकारण्याची जणू जबर तहान असते. आव्हान म्हणजे काही केवळ



समरांगणांवरच झेलण्याची गोष्ट नाही; तर इतर अनेक गोष्टींची लहान मोठी आव्हानं दैनंदिन व्यवहारात आपल्याला प्रत्यही स्वीकारावी लागतात. आपपला वकूब ओळखून जो तो माणूस आयुष्यात या आव्हानांना सामोरा जातो. कधी त्यावर मात केल्याच्या बेहोशीनं धुंद होतो; तर कधी पराभवाच्या निराशेनं कोलमडून पडतो. हातातल्या दोऱ्याचा गुंता सोडवण्याचं आव्हान नकळत कधी स्वीकारलं गेलं ते लक्षात आलं नाही आणि जो जो गुंता वाढू लागला, तो तो त्याचं आव्हानही तेवढ्याच तीव्रपणानं सोडवण्याचा चाळा लागून राहिला.


ज्या टोकाला पकडून गुंता सोडवू पाहात होतो, त्या बाजूनं गुंता सुटण्याच्या आशा मधेच आलेल्या एका भक्कम, अनेकपदरी गाठीनं मावळल्या, म्हणून मग दुसऱ्या बाजूचं टोक हातात घेऊन तिकडून गुंता उलगडू लागलो.त्या बाजूनंही आधीपेक्षा फार वेगळं काही झालं नाही. या टोकापासूनच्या थोड्या भागात किरकोळ गाठी होत्या आणि त्या तेवढ्या सहजी सुटू शकल्या. पुढं पुन्हा पहिल्यासारखाच अनुभव आला. गुंता सुटत आला आहे असं वाटत असतानाच, तो पूर्वीपेक्षा अधिक वाढतो आहे, असंही जाणवू लागलं. गाठी, सुरगाठी, निरगाठी कधी सुटत गेल्या; तर कधी काही गाठी सुटल्यामुळे, मुळातल्या सहजसोप्या गाठी अधिक गहन होऊन बसल्या.

दोऱ्याच्या गाठी एरवी कोण कशाला पाहायला जाणार? पण बारकाईनं पाहिलं म्हणजे या गाठींचंही वेगळेपण लक्षात येऊ लागतं. काही गाठी इतक्या हळुवार असतात की, तशाच हलक्या हाताळणीनं त्या सुटू शकतात. काही गाठी परस्परावलंबी असतात. म्हरजे दुसरी काही टोकं किंवा गाठी रिकाम्या झाल्या म्हणजेच त्या सुटतात. काही गाठी फसव्या असतात. त्या सुटल्यासारख्या वाटतात खऱ्या; पण काही वेळातच तो भ्रम ठरतो. उगाचच इकडून तिकडं दोरा वळवण्याखेरीज फार काहीच न होता गाठी कायमच राहतात. काही गाठी हट्टी असतात. काही कमालीच्या हेकेखोर, एकारलेल्या, स्वत:च्याच मस्तीत चूर झालेल्या असतात. कितीही प्रयत्न केला, तरी त्या सुटत नाहीत; एवढंच नव्हे, तर थोड्याशा देखील सैल होत नाहीत. असल्या हेकेखोर गाठींची उकल करणं हेच खरं आव्हान असतं आणि प्रत्येक प्रयत्नाच्या अखेरीस अपयश देऊन ते आपल्याला पुन:पुन्हा खिजवत राहतं.

एवढी यातायात केल्यानंतर पाहिलं तर, दोऱ्याचा गुंता जवळजवळ पहिल्यासारखाच कायम होता. इतका वेळ जे काही सोडवलं त्यानं गुंत्यात फरक पडलेलाच नव्हता, म्हणून तो नाद अखेर सोडून दिला. याच दोऱ्याच्या गुंत्यानं फार भेदक सत्य मात्र पुढं ठेवलं.

मनात म्हटलं, संसार, मायापाश, जन्मजन्मांतरीच्या गाठी, तुझं-माझं हे सारं

त्या दोऱ्याच्या गुंत्यासारखं तर आहे ! संसार हाही एक भलामोठा गुंताच आहे. कुटुंबातली माणसं या गुंत्याची टोकं आहेत. दोऱ्याच्या गुंत्याला निदान दोनच हुकमी टोकं असतात; आणि शिवाय ती निर्जीव असतात. मन नावाचा विलक्षण चंचल प्राण त्यांच्यांत नसतो. तसं असतं तेच एका दृष्टीनं बरं असतं; नाही तर दोऱ्याच्या निरगाठी व्यवहारात आपल्याला कधीच सोडवता आल्या नसत्या. संसारातल्या गुंत्यात ही टोकं सजीव असतात आणि त्यांना मनही असतं. भावना असतात. पोट असतं. एवढं सारं असतं म्हणूनच ही टोकं गुंता अधिक वाढवतात. गुंता मुळातच निर्माण न करणं किंवा शक्य तेवढ्या हलक्या निरगाठींचा बनवणं हे केवळ त्यांच्याच हाती असतं; पण बहुधा कुठल्याच संसारात अशी समजूतदार टोकं आढळत नाहीत. अशा टोकांमुळेच तर आज संसारातली, समाजातली शांतता, स्थैर्य, सहिष्णुवृत्ती नाहीशी झाली आहे. ही टोकं सतत एकमेकांना गुंतवून ठेवण्यात चूर झाली आहेत आणि म्हणूनच गुंता वाढतो आहे. दोऱ्याचा गुंता सोडवता सोडवता कधी संयम सुटतो आणि आपण तो गुंता सरळ भिरकावून देतो. हे चित्र आज अनेक घरांत दिसतं आहे. आई-वडिलांसारखी मायाळू टोकं मुला-बाळांनी दूर भिरकावून दिली आहेत. तो दोरा आयुष्यभर खस्ता खाऊन दुबळा झाला आहे, कधीही तुटू शकेल अशी त्याची



जराजर्जर अवस्था झाली आहे; तरीही घराघरांतून ही टोकं रस्त्यावर येऊ लागली आहेत. मानवी मनाला जडलेल्या विकारांनी ही टोकं अगदी बरबटून गेली आहेत. स्वार्थापायी ती एकमेकांच्या गळ्याला वेढे घालून आवळत आहेत. किरकोळ मतभेदांपायी माणसं एकमेकांविषयी मनात अढी धरून बसत आहेत. या गाठी कधी सैल असतात; तर कधी त्या कायमस्वरूपी घट्ट होऊन जातात. समाज आणि संसार अशा गाठींनी गुंतत चालला आहे.

दोरा वेळीच नीट गुंडाळून ठेवला म्हणजे गुंता होण्याची शक्यता खूपच कमी असते. संसारातही हे नेटकेपणाचं भान नीट ठेवलं तर कदाचित आपण एवढे गुंतून पडणार नाही ! भ भ भ

**मल्हार अरणकल्ले,** १०/२, गुरुजन सोसा., कोथरूड, पुणे २९.

## सुट्टी कशी वापराल?

प्रत्यक्ष सुट्टी लागण्यापूर्वी– म्हणजे शाळा– परीक्षा वगैरे चालू असताना नेहमीच आपण सारे 'सुट्टी'च्यारम्य कल्पना आपण रंगवत असतो.पण सुट्टी लागली,दिवाळीचे चार दिवस फराळ–मिष्टान्ने या नवलाईत संपले की मग मात्र कंटाळा येतो. जर तुम्हाला तुमची सुट्टी आनंदात सामाधानाने वापरायची असेल (आणि घालवायची नसेल) तर यांपैकी काही कल्पना उपयोगी पडतील!

१) नवीन कौशल्ये शिकणे: उदा.पोहणे, संगणक वापरणे, नवी भाषा, झाडाची कलमे करणे, स्वयंपाक करणे, फोटोग्राफी, उपकरणे दुरूस्ती, ज्युडो, कराटे, बॉक्सिंग, वाद्यवादन, इ.

२) संग्रह करणे: नाणी, शंख शिंपले, दगड ,कात्रणे, सुविचार, म्हणी, कोडी, विनोद, कविता नेते खेळाडू लेखक यांच्या स्वाक्षऱ्या त्यांची छायाचित्रे.

३) भटकंती: गड किल्ले, समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे; पाणी सायकलस्वार/बस वा रेल्वेने.

४) नवनिर्मिती: कागदी वस्तू बनविणे कविता कथा लिहिणे, नव्या चाली लावणे. विविध शास्त्रीय खेळणी/उपकरणे बनवणे, इ.

५) गटकार्ये: मित्रांनी एकत्र जमून काय करता येईल? वृक्षारोपण, परिसर स्वच्छता मोहीम, समू हगीते/नाटके बसविणे. प्रदर्शने भरविणे आपल्या गावांतील जवळचे कारखाने, प्रयोगशाळा किंवा अन्य महत्त्वाच्या संस्थाना भेटी, महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती,

६) स्वकष्टार्जित कमाई : अनेक प्रकारच्या वस्तू उदा. फाटके, पाणत्या आकाशदिवे इ. विकणे, याच्याच जोडीला पूरक वाचन खेळ, अभ्यासातील कच्च्या विषयांची तयारी इ. गोष्टीही आवर्जून करव्यात सुट्टीत उत्साह वाढला पाहिजे महत्त्वाचे.

# झटपट बुद्धिबळ

आनंद राव

बैठ्या खेळांमध्ये 'बुद्धिबळ' या खेळाचे आपले स्वत:चे असे वेगळेच स्थान आहे. एकदा का दोन तुल्यबळ खेळाडू पट मांडून बसले, की मग काळ-वेळेचं भानच उरत नाही - ''शतरंज के खिलाडी'' या हिंदी चित्रपटात असेच दोघे 'वेडे' बुद्धिबळपटू कदाचित तुम्ही बघितले असतील. पण आजच्या धावत्या जगात मनोरंजनासाठीदेखील एवढा वेळ आहे कुणाकडे? म्हणूनच या खेळाचं स्वरूप पालटून आम्ही तुमच्यासाठी नवा खेळ सादर करीत आहोत. ज्यात तुम्हाला ''झटपट'' मजादेखील येईल व तुमच्या बुद्धीलाही धार येईल !

**खेळाची पूर्वतयारी :**

तुम्हाला बुद्धिबळाचा पट व सोंगट्या यांची प्राथमिक माहिती असेलच.

१. आपल्या नवीन खेळात देखील प्रत्येक सोंगटीची चाल कायम राहील.

२. एखादे प्यादे शेवटच्या घरापर्यंत गेले तर त्याच्या जागी 'वजीर' पुनर्जन्म घेईल.

**नवीन खेळाचे नियम :**

१. ज्या खेळाडूचे पूर्ण सैन्य प्रथम मारले जाईल तो विजयी ठरेल. म्हणून आपले अधिकाधिक सैन्य मारले जाईल अशा उलट्या चालीने खेळ खेळावा.

२. जर विरुद्ध पक्षातील एखादी सोंगटी मारणे शक्य असेल तर ती मारलीच पाहिजे, तिला जीवदान देता येणार नाही. मात्र एकाच वेळी असे दोन-तीन पर्याय उपलब्ध असतील तर कोणताही एक पर्याय स्वीकारण्याची मुभा आहे.

३. या खेळात जरी राजा मारला गेला तरी खेळ चालूच राहील - एका पक्षातील सर्व सोंगट्या मारल्या गेल्या की खेळ संपला.

मग आता सज्ज व्हा - हे 'झटपट' युद्ध खेळण्यास ! तुम्ही किती वेळात आपली बाजू साफ करीत आहात हे नोंदवून ठेवा व ती कमी करण्याचा प्रयत्न करा. आपल्या अधिकाधिक मित्रांना हा नवा खेळ शिकवून त्यांनाही या खेळाचा 'झटपट' आनंद मिळवून द्या.


**प्रत्यक्ष खेळताना कसा विचार कराल?**

१. अशी खेळी खेळण्याचा प्रयत्न करा की, तुम्हाला प्रतिस्पर्ध्यांच्या सोंगट्या मारण्याचा प्रसंग येऊ नये (अहिंसा परमो धर्म:) आणि तुमच्या मात्र अधिकाधिक सोंगट्या मारल्या जातील.

२. कोणत्या सोंगट्या अधिक त्रासदायक/मारक ठरतील हे लक्षात घेऊन त्यांचा आधीच बंदोबस्त करा - काही वेळा खेळ खेळल्यावर अनुभवातूनच तुम्ही हे ठरवू शकाल ! भ भ भ

# आव्हान

प्रा. विवेक पोंक्षे




रा (11) च्या डोलकाठीपाशी उभ्या असलेल्या थोरने भरभरून श्वास घेतला. गेले छप्पन्न दिवस तो समुद्राचा खारा वास घेत होता.आज मात्र दूरवरून आलेल्या वाऱ्याच्या मंद झुळकांबरोबर येणारा वास वेगळाच होता. हिरव्यागार गवताचा गंध नाकात शिरताच त्याचं मन शेकडो कोस मागे राहिलेल्या आफ्रिकेत हरवून गेले. क्षितिजावर आकाशात विमानांचे चार ठिपके उमटले आणि त्या पाठोपाठच सागराच्या रूपेरी कडेवर होता पन्नास एक होड्यांचा एक काफिला! रा (11) चं जंगी स्वागत करण्याचा लोकांचा बेत उघडच दिसत होता.बार्बाडोस बेटावरून आलेल्या लोकांच्या उत्साहाला उधाण आले होते. त्या उत्साहाचे प्रतिबिंबच जणू 'रा'च्या छोट्याशा डेकवर उमटले होते. डोलकाठीवर उभे राहून कार्लो आणि सँटियागो लोकांना अभिवादन करत होते. 'नॉर्मन' आपल्या लॉगबुकात शेवटच्या नोंदी करत होता तर 'जॉर्ज'आणि 'मदानी'मचव्याची दिशा स्थिर करण्याची धडपड करीत होते. 'युरी'आणि 'की' यांची आपल्या कॅमेऱ्यानिशी धावपळ चालली होती.आणि या धावपळीवर मस्त फोडणी घालायचं काम करीत होते ते सफी हे मचव्यावरचं माकड. बार्बाडोसची भूमी जवळ येते आहे याची चाहूल त्याला लागली होती.या साऱ्या धावपळीत असून नसल्यासारखा होता तो **'थोर हेअरडल'**. डोलकाठीला टेकून तो उभा होता. समाधानाने त्याचा चेहरा फुलून गेला होता. नाना देशांतून आलेल्या आपल्या सहकारी खलाशांच्या मेळ्याकडे बघता बघता त्याच्या नजरेसमोरची दृश्ये धूसर

**सूर्यदेवतेची प्रार्थना करून थोरने आपला मचवा समुद्रात लोटला. मानवी संस्कृतीचे अभिसरण सिद्ध करण्यासाठी देशोदेशींचे साहसवीर एकत्र आले. दर्यातल्या वादळी संकटांचे जबरदस्त आव्हान त्यांनी कसे पेलले याची ही कथा !**

होत गेली. हा दिवस दिसावा यासाठी सारा खटाटोप, कष्ट याचा थोर जणू पुन:प्रत्यय घेत होता.

पन्नाशी उलटून गेलेल्या थोरचा ध्यास होता तो मानवी संस्कृतीचा मागोवा घेण्याचा.पॅसिफिक महासागरातल्या पॉलिनेशिअन बेटांवर मानवी जीवन कसे उत्क्रांत झाले असेल या प्रश्नाचा छडा लावता लावता जन्म झाला होता त्याच्या कॉन टिकी या सागरी प्रवासाचा. दक्षिण अमेरिकन लोकांनी बालसा लाकडाच्या तराफ्यांसरून आपली संस्कृती पॉलिनेशिअन बेटांवर नेली हे सिद्ध करण्यासाठी थोरने त्यांच्याच साधनांनी, त्यांच्याच मार्गाने मोठा धाडसी प्रवास केला होता. पण त्यावेळी तो तरूण होता. तारुण्याची मस्ती अंगात फुरफुरत होती. अशा एखाद्या वेडच्या साहसाच्या खडकावर आपले तारू धडकू देण्याइतका बेदरकारपणा त्याच्यात होता पण आज वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीही तसलेच वेडे साहस करायला तो पुन्हा उभा ठाकला होता.

मुळात नॉर्वेजिअन असणाऱ्या थोरसाठी सारे विश्व घर होते. अशाच एका भटकंतीत त्याला एक आश्चर्यकारक साम्य लक्षात आले. उत्तर आफ्रिकेतील मानवी संस्कृतीच्या अनेक खुणा त्याने दक्षिण अमेरिकेत पाहिल्या. मनात प्रश्न निर्माण झाला तो हा की अमेरिकेतली प्राचीन संस्कृती आफ्रिकेतून सागरी वाऱ्याबरोबर वाहात वाहात तर आली नसेल ना? हे कसे घडले असेल या संबंधीचे त्याचे अनुमान निश्चित केले ते आफ्रिकेतील चाड सरोवरात व दक्षिण अमेरिकेतील टिटिकाका सरोवरात आढळणाऱ्या होड्यांनी! ‘पॅपिरस रीड’या गवतापासून बांधलेल्या या मच्छीमारी




होड्यांमध्ये विलक्षण साम्य होते. आपली निरीक्षणे सिद्ध करण्यासाठी थोरने तशाच प्रकारच्या एका नौकेतून अटलांटिक महासागर ओलांडण्याचा बेत केला.प्रत्यक्ष स्वानुभवातून तो पुन्हा एकदा संस्कृतीचे अभिसरण सिद्ध करणार होता.

झाले! थोरने आपला मुक्काम नॉर्वेतून हलवला.तो मोरोक्कोतल्या पोर्ट सैद या गावी डेरेदाखल झाला. उत्तर आफ्रिकेतल्या किनाऱ्यावर भटकंती करत त्यानं 'पॅपिरस रीड' उगवण्याच्या जागा हेरून ठेवल्या. खेड्यापाड्यांत भटकत पिढ्या न् पिढ्या झिरपत आलेले नौका बांधणीचे तंत्रज्ञान शिकवून घेण्याचा प्रयत्न केला.स्थानिक आफ्रिकन लोकांच्या मदतीने त्याने एक नौका बांधली. तिचे नाव ठेवले 'रा'. इजिप्शिअन भाषेत 'रा चा अर्थ होतो'सूर्यदेवता'.सूर्यदेवतेला साक्षी ठेवून थोर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी अमेरिकेच्या दिशेने प्रवास सुरू केला.पण १८जुलै १९६९ ला ५५ दिवसानंतर 'रा' प्रवासाच्या योग्यतेची राहिली नाही. लाटांच्या माऱ्याने आणि अंगावर वादळांमागून वादळे झेलल्याने 'रा' ची अगदी दशा होऊन गेली होती.शेवटी थोरने बार्बाडोसचा किनारा १२००कि.मी वर राहिलाअसताना दु:खद मनाने 'रा'चा निरोप घेतला.खलाशांविना त्या अथांग दर्यात 'रा' भटकत नाहिशी झाली. पण थोर निराश झाला नाही. स्वस्थ न बसता त्याने दुसरी नौका बांधण्याचा निश्चय केला. काही दिवस थोर द. अमेरिकेतल्या बोलिव्हिया देशात जाऊन राहिला. तेथे 'आयमार'इंडियन्स नावाची एक जमात राहते. हजारो वर्षे लोटली पण त्यांच्या जीवनशैलीत फारसा फरक झालेला नाही.त्यांतल्या चार कुशल कारागिरांना घेऊन तो आफ्रिकेत आला. पोर्ट सफीमध्ये त्याने त्यांच्या मदतीने नौका बांधायला सुरूवात केली. पॅपिरस रीडचे भारे बांधायचे. बांधण्यासाठी काथ्या वापरायचा.त्या भाऱ्यांना बळकटी यावी म्हणून त्यांच्यामध्ये मातीची छान भाजलेली मडकी घालायची. हळूहळू मचव्याने आकार घ्यायला सुरूवात केली. निमुळते होत गेलेले पुढचे टोक तर पसरट झालेला पार्श्वभाग. त्यावर सुकाणू!टोकाजवळ उंच डोलकाठी उभी राहिली. त्यावर दोन शिडे. एक चौकोनी जांभळ्या रंगाचे तर दुसरे पांढरे त्रिकोणी. मचव्यावर जेमतेम सातआठ जण वावरू शकतील एवढीच जागा होती.एक छोटीशी

केबिन व पुढे छोटसे डेक. हे सारे इटलीचा गिर्यारोहक कार्लो, रशियन डॉक्टर युरी, जपानी छायाचित्रकार की ओहारा आणि मोरोक्कोतला व्यापारी मदानी यांचा नौकानयनाचा अनुभव जवळजवळ शून्यच.


सूर्यदेवतेची प्रार्थना करून थोरने आपला मचवा समुद्रात लोटला. पहिले दोन तीन दिवस तर होडीवर निव्वळ गडबड गोंधळ होता. आठवणीने ठेवलेल्या अनेक वस्तू शोधून पुन्हा पुन्हा व्यवस्थित लावणे मोठे कर्मकठीणच. बरे सारा प्रवास प्राचीन काळातल्यासारखा करायचा असल्याने बरोबरच्या वस्तू चामड्याच्या पिशव्यांमधून भरलेल्या. काही वस्तू मातीच्या रांजणात घेतलेल्या. अन्नपदार्थ टिकविण्यासाठीही रेफ्रिजरेशनसारखी आधुनिक तंत्रे वापरायची नाहीत. बरोबर भरपूर सुकवलेलं आणि खारवलेलं मांस घेतलेलं. त्याच्या जोडीने अंडी, मध आणि खजूर. पाण्याचे रांजण भरलेले. सामानाच्या या गदारोळातच पायापायात घोटाळणारं सिंदबाद हे बदक आणि अंगाखांद्यावर झट्या घेणारं सफी हे माकड. अगदी खास अरेबियन नाईट्समध्ये शोभेल अशी सागरी सफर सुरू झाली होती. प्रवासाला सुरूवात झाली तेव्हाची गडबड आता कमी झाली होती. दोघा जणांना



होणारा उलटयांचा त्रासही कमी झाला होता. दिवसातून दोन तीन वेळा थोर किंवा त्याचा एखादा सहकारी पाण्यात उतरायचे. पाण्याखाली बुड्या मारून नौकेचा तळभाग तपासून पाहयचे. पाण्याखाली अनेक जातींचे मासे पोहत असायचे.अनेक रंगी चमकणाऱ्या माशांचे थवे पाहता पाहता भान हरपून जायचे.माशांच्या जोडीने छोटे छोटे प्रवाळ कीटक दिसायचे.त्या प्रवाळ कीटकांची एखादी वसाहतच लागायची. कधी कधी तर त्यांची वाढ माणसांनी समुद्रात फेकून दिलेल्या प्लास्टिक बाटल्यांवर घट्ट झालेल्या तेलाच्या गोळ्यांवर झालेली असायची. असेच एकदा

पंखांना क्षितिज नसते; त्यांना फक्त झेपेच्या कवेत मावळणारे आकाश असते.

थोर पाण्याखाली उतरला. समुद्रसृष्टीचे निरीक्षण करता करता किती वेळ गेला याची जाणीवच राहिली नाही. लक्षात आले तेव्हा 'रा' दूर जाताना दिसत होते. खरे तर समुद्रात उतरत असताना सगळ्यांनीच स्वत:वर दंडक घालून घेतला होता. कोणीही कंबरेला दोरी बांधल्याशिवाय पाण्यात उतरायचे नाही पण दुर्दैवाने थोरच्या कंबरेला बांधलेली दोरी त्याच्या नकळत सुटली होती.नौकेशी असणारा आपला आधार सुटला हे लक्षात येताच थोरला आपण अथांग महासागरात एकटे असल्याची जाणीव झाली. दैव बलवत्तर म्हणून त्यावेळी वारा पडलेला होता. थोरने झपाट्याने हात मारायला सुरूवात केली आणि जहाज गाठले.



प्रवास कॅनरी बेटांच्या जवळून सुरू असताना होडीवर दोन अनपेक्षित पाहुण्यांचे आगमन झाले. चमकदार हिरव्या केशरी रंगाचा रोलर पक्षी आणि पांढऱ्या रंगाचे कबुतर.दोन दिवसासाठी आलेले पाहुणे घरचेच बनून गेले. त्यातले कबुतर पार स्पेनहून स्थलांतर करून आले होते. कबुतर बरेच दिवस 'रा'वर राहिले. रोलर मात्र खंगत गेला. त्याला खायला देण्यासाठी आवश्यक असणारे कीटक 'रा' वर नव्हते आणि एक दिवस रोलरचा मृत्यू झाला. औट घटकेच्या या सोबत्याचा वियोग सगळ्यांनाच चटका लावून गेला. या पाहुण्यांच्या जोडीबरोबरच 'रा'वर सिंदबाद बदक आणि सफी माकड होतेच! काही वेळा दिवसचे दिवस कंटाळवाणे जात वारा पडलेला असे. जहाजाचा प्रवास मंद गतीने चाललेला असे. अशा वेळी सिंदबाद आणि सफीच्या गमतींनी नौकेवर धमाल येई. कधी त्यांना समुद्रात सफर करण्याची हुक्की येई. मग नॉर्मन त्याच्या पायांना दोरी बांधून स्वत:बरोबर त्याला पोहायला नेई, तर सफी थोरच्या खांद्यावर बसून पाण्यात उतरे. दिवसभर सफीच्या माकडचेष्टांना ऊत येई. पण

(पान क्र. १४२ वर पुढे चालू)

# बाटलीतला अणुराक्षस

दिलीप कुलकर्णी



**उघड स्वरूपातील अणुराक्षस जाळून, फाडून, सोलून ठार मारतो. पण या मायावी रूपातला अणु-राक्षस कर्करोग आणि अन्य किरणोत्सर्गजन्य व्याधींनी माणसाला संपवतो...हिरोशिमा-नागासाकीवर अणुबॉम्ब टाकण्याच्या घटनेला यंदा ५०वर्षे झाली. त्यानिमित्त निर्माण होत असलेल्या संकटाची चाहूल देणारा लेख.**

नाही मित्रांनो! ही एखादी परीकथा नाही! किती छान झालं असतं ही परीकथा असती तर! एका बाटलीतनं एक राक्षस बाहेर आला असता. त्यानं आपल्याला खाऊन टाकण्यासाठी पकडलं असतं- अन् आपण काहीतरी युक्ती करून त्या राक्षसाला पुन्हा बाटलीत भरलं असतं नि बाटलीचं बूच पक्कं बंद करून त्या राक्षसापासून मुक्ती मिळवली असती!

पण बाटलीतल्या ह्या राक्षसाची गोष्ट परीकथेसारखी सुखान्त नाही. कारण तो आहे अणु-राक्षस! तुम्ही आम्ही त्याला बाटलीतनं बाहेर काढला आहे. चुकून किंवा अज्ञानानं नव्हे, तर जाणीवपूर्वक. आणि त्या राक्षसानं आजवर लक्षावधींचे बळी घेतले आहेत. हिरोशिमा नागासाकीला या राक्षसाचं एक रूप जगानं पाहिलं, तर चेर्नोबिलला दुसरं. तारापूर, रावतभाटा अशा ठिकाणी तिसऱ्याच रूपात हा राक्षस सामोरा येतो; तर हॅनफोर्ड किंवा जपानचा समुद्र या ठिकाणी चौथ्या रूपात. पहिल्या रूपात तो भयानक असल्याचं निश्चितपणे दिसतं. कारण तो सर्वांच्या देखत माणसांना जाळून टाकतो, त्यांच्या चिंधड्या उडवतो, त्याची कातडी सोलून काढतो! पण इतर रूपांत मात्र भयानकता आपल्याला जाणवत नाही. कारण तो कर्करोगांच्या रूपानं शांतपणे माणसांचे बळी घेत राहतो!

बरोबर ५०वर्षापूर्वी, १६जुलै १९४५ ला आपण या राक्षसाला बाहेर काढलं. अब्जावधी डॉलर्सचा खर्च करून हा राक्षस आपण बंधमुक्त केला! अन् त्यानंतरची गेली ५०वर्षं आपण त्याची भयानकता अनुभवत आहोत. वयाचं अर्धशतक पुरं केल्यानिमित्तानं आपण या अणु-राक्षसाच्या खऱ्या आणि मायावी अशा सर्व प्रकारच्या रूपाचं थोडक्यात दर्शन घेऊया.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा नेता होता

हिटलर. त्या वेळपावेतो अणूमध्ये प्रचंड शक्ती असल्याचं ठाऊक होतं आणि ही शक्ती एखाद्या ध्वमाच्या (बॉबच्या ) रूपात मुक्त करता आली तर ती अभूतपूर्व संहार घडवून आणेल हे हिटलरनं जाणलं. जर्मनीतले ख्यातनाम पदार्थवैज्ञानिक त्यानं या कामाला जुंपले. पण हे महाभयंकर अणु-अस्त्र हिटलरच्या हाती पडलं तर जगाचा सर्वनाश होईल हे जाणून अमेरिकेनं त्याआधी हाती पाडण्यासाठी धडपड सुरू केली.'मॅनहॅटन प्रकल्प' या नावाचा एक गुप्त प्रकल्प तिनं चालवला आणि २अब्ज डॉलर खर्चून अणुध्वम् तयार केला. १६जुलै १९४५ ला पहिल्या ध्वमाचा यशस्वी स्फोट झाला. तीन सप्ताहांनी, ६ऑगस्ट १९४५ला अमेरिकेनं हिरोशिमा या जपानी शहरावर अणुध्वम् फेकला. एका क्षणात त्या सुंदर, स्वर्गवत शहराचं भेसूर,भयानक नरकात रूपांतर झालं. स्फोट होताक्षणीच ७०,००० माणसांची वाफ झाली!




त्यानंतरची पळापळ,आगी आणि घातक किरणोत्सर्ग यामुळे आणखी २५,०००लोक मेले. तीन दिवसांनी नागासाकी या दुसऱ्या जपानी शहरावर अणुहल्ला झाला त्यात सुमारे ८०,०००लोक मेले.

आजवर प्रत्यक्षात वापरले गेलेले अणुध्वम् असे हे फक्त दोनच.त्यांनी एवढी प्रचंड हानी केली. पण अणुराक्षसाच्या या रूपानं जनसामान्य भयकंपित झालेले असूनही देशोदेशीच्या राजकारण्यांना मात्र तो हवाहवासा वाटला. कारण त्यांच्या मनात दडलेली क्रूरता आणि सत्तापिपासा यांचं समाधान करणारं हे एक महत्त्वाचं साधन होतं. अमेरिकेपाठोपाठ रशियानं अणुध्वम् बनवला. मग अणुध्वम् हा ज्याचा केवळ खटका आहे असा अतिशक्तिशाली हायड्रोजन-ध्वम् अमेरिकनं बनवला. लगेच रशियानंही तो बनवून सत्तासमतोल साधला. राक्षसाला बाटलीतून बाहेर काढण्याचा हा उद्योग मग ब्रिटन, फ्रान्स आणि चीन यांनीही केला. ती क्षमता असणारे आणखी तीन देश आहेत: इस्रायल, भारत आणि पाकिस्तान. पण या तीन 'अघोषित' अणु-सत्ता आहेत.

गेल्या ५०वर्षाच्या काळात अण्वस्त्रधारी देशांनी सुमारे सव्वा-लाख अण्वस्त्र उत्पादित केली. आजमितीस या पृथ्वीतळावर सुमारे २१,००० अण्णस्त्र हल्ला-सज्ज अवस्थेत उभी आहेत.त्यांची

एकूण शक्ती आहे ४०००मेगॅटन. म्हणजे हिरोशिमावर टाकलेल्या ध्वमाच्या सुमारे ३ लक्ष पट! काही बटणं दाबली जाण्याचा अवकाश –पृथ्वीचा एखादा नव्हे तर दहादा सर्वनाश होईल!


कोणत्याही अणुध्वमाच्या स्फोटात प्रघाती तरंग, झंझावात, प्रचंड उष्णता आणि किरणोत्सर्गी द्रव्यांचा वर्षाव या चार प्रकारांनी लोक मरतात. पहिल्या तिघांमुळे होणारी घरांची वा विजेच्या खाबांची पडझड आणि लागणाऱ्या आगी यामुळेही बरेच लोक मरतात. या तिन्ही प्रकारांमुळे होणारे मृत्यू तात्काळ होतात. किरणोत्सर्गामुळे मात्र दीर्घकाळपर्यंत मृत्यू होत राहतात. अल्फा, बीटा, गॅमा आणि न्यूट्रॉन या चारांचा होणारा उत्सर्ग म्हणजे किरणोत्सर्ग.हे सर्व किरण (किंवा कण) पेशींमध्ये शिरून त्यांच्यात विकृती निर्माण करतात. त्यामुळे विविध अवयवांचा कर्करोग होतो. असे कर्करोग प्रकट होण्यास दहापासून कितीही अधिक वर्षे लागू शकतात.हिरोशिमावरच्या हल्लाच्या वेळी मिळालेल्या किरणोत्सर्गाच्या सूक्ष्म मात्रेमुळे आजही तिथे कित्येकांना कर्करोग होत आहे! अणुराक्षसाचं हे उघड रूप. कोणताही बुरखा न पांघरलेलं. माणसांना थेट जाळणारं, त्यांच्या चिंधड्या उडवणारं, त्यांना चिरडून टाकणारं, त्यांना सोलून काढणारं!

**शांततेसाठी अणुशक्ती**

राजकारणी आणि लष्करशहांना हा राक्षस उपयोगी वाटत असला, तरी त्याला बाटलीतून बाहेर काढणाऱ्या शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांना मात्र या त्याच्या करामतीनं अपराधी वाटलं होतं. त्याचीच मनं त्यांना खात होती. काही राजकारण्यांनाही लोकांच्या डोळ्यांत धुळफेक करण्यासाठी या राक्षसाचं सौम्य रूप आवश्यक वाटत होतं. यातून पुढे आला नारा : 'शांततेसाठी अणुशक्ती.'

मग शास्त्रज्ञांनी त्या राक्षसाला पोलादी भांड्यात नि काँक्रीटच्या तीन फूट जाड भिंतीच्या आत बंदिस्त केलं. अणुस्फोटात अनियंत्रित रूपात होणारी अणु–भंजनाची विक्रिया नियंत्रित करण्यात आली. मिळणारी उष्णता पाणी उकळवण्यासाठी आणि नंतर त्याची वाफ करून तीवर वाफचक्की आणि जनित्र चालविण्यासाठी वापरण्यात आली. हीच ती सुप्रसिद्ध अणुवीज. आज जगात ४०० हून अधिक अणुवीजकेंद्रे कार्यरत आहेत. फ्रान्स आपल्या एकूण विजेपैकी ७३ प्रतिशत वीज या पद्धतीनं मिळवतो. भारतातला अणुविजेचा वाटा मात्र अवघा ३प्रतिशत आहे.

अशी ही अणुवीज स्वस्त, स्वच्छ आणि सुरक्षित असेल अशी तिच्या प्रारंभकाळी जाहिरात केली गेली. स्वस्त



म्हणजे किती तर 'फुकट वाटण्याइतकी स्वस्त!' पण हा भ्रम होता. अवघ्या १०-१५ वर्षात 'स्वस्त' 'स्वच्छ' आणि 'सुरक्षित' हे तिन्ही भ्रमाचे भोपळे फुटले. अणुवीज प्रारंभीच्या काळात (साधारण१९६०ते ७०या काळात) 'स्वस्त वाटली कारण ती 'सुरक्षित' नव्हती! जसजसे अपघात वाढू लागले, तसतसा सुरक्षिततेवर होणारा खर्च प्रचंड प्रमाणात वाढू लागला आणि स्वस्त असलेली अणुवीज महाग बनत चालली. आज तर कोळशाच्या खाणीपासून लांब असेल तर अणुवीजक्रेंद्र परवडते; अन्यथा कोळशावर चालणारं औष्णिक वीज क्रेंद्र स्वस्त वीज पुरवतं

औष्णिक विजेमुळे प्रदूषण होतं; वातावरणाचं तापमान वाढून काचघर-परिणामात (ग्रीन-हाऊस इफेक्ट) भर पडते हे खरं. त्यामुळेच अणुविजेची पालखी वाहणारे भोई ती स्वच्छ, अप्रदूषक आहे असे डिंडिम पिटतात. पण ही निव्वळ धूळफेक आहे. कारण धुराचे दृश्य प्रदूषण नसलं, तरी किरणोत्सर्गाचं अदृश्य प्रदूषण फार मोठ्या प्रमाणावर होत असतं. आणि ते अधिक घातक आहे. अणुवीजकेंद्रातील गळती, मानवी निष्काळजीपणा, तंत्रज्ञानातील अपुरेपणा आणि त्रुटी किरणोत्सर्गी द्रव्यांच्या सुरक्षित साठवणुकीचा कोणताही खात्रीलायक उपाय नसणं या कारणांमुळे अणुवीजनिर्मितीच्या प्रक्रियेत सातत्यानं किरणोत्सर्ग होत असतो. आणि कर्मचाऱ्यांत नि आजूबाजूच्या लोकवस्तीतही कर्करोग निर्माण करीत असतो. आपलं तारापूरचं अणुवीजकेंद्र याबाबत जगातलं पहिल्या क्रमांकाचं, तर राजस्थानतलं रावतभाट्याचं केंद्र दुसऱ्या क्रमांकाचं प्रदूषक केंद्र आहे. शांतपणे कर्करोग निर्माण करीत राहणारं अणु-राक्षसाचं हे मायावी रूप!

**घडवलेला अपघात**

अशाच एका अणुवीजकेंद्रात २६ एप्रिल १९८६ला अपघात होऊन गाभ्यातील किरणोत्सर्गी द्रव्यं हवेत पसरली. जगातला हा सर्वात मोठा अपघात होता. ठिकाण होतं रशियातलं चेर्नोबिल. एकामागून एक सहा चुका करून तेथील कर्मचाऱ्यांनी हा अपघात जणू घडवून आणला. गाभ्यातील इंधनाचा अणुध्वमाप्रमाणे स्फोट होऊन त्याचं १००० टनी झाकण पार वर उडालं आणि आतली ५ कोटी क्युरी इतकी प्रचंड

किरणोत्सर्गी द्रव्यं वातावरणात सोडली गेली. रशियाच्या युक्रेन या भागात नव्हे, तर अनेक युरोपियन देशांत या द्रव्यांचा वर्षाव झाला. या देशांनी कोट्यावधी लिटर दूध ओतून दिलं. गुरं गवतावर चराण्याचं थांबवलं. मुलांना घराबाहेर पडण्यास बंदी घातली!

असाच मोठा अपघात १९६९ मध्ये अमेरिकेत थ्री माईन आयलंड केंद्रांत झाला होता. ब्रिटनमधलं विडस्केलचं अणुकेंद्र हे 'अपघातांचा राजा' आहे. लहानमोठे मिळून ३०० अपघात या क्रेंद्रात झाले आहेत! भारताच्या केंद्रांमध्येही असे लहानमोठे अपघात झालेले आहेत.

अणु-तंत्रज्ञान १००%अचूकता अपेक्षितं. माणूस स्खलनशील आहे -तो इतक्या अचूकपणे काम करू शकत नाही. तरीही हे तंत्रज्ञान राबवण्याचा त्याचा अट्टहास आहे. आपल्याला खाणार आहे हे ठाऊक असूनही आपण या अणुराक्षसाला मुद्दाम डिवचत आहोत!

**समस्याच समस्या**

अपघाताच्या वेळी होणारा आणि नियमितपणे होणारा हे अणुवीजकेंद्रातील किरणोत्सर्गाचे दोन मुख्य प्रकार. याशिवाय तिसराही एक प्रकार आहे. मागे उरणाऱ्या टाकाऊ पदार्थांचा. त्यांना उर्वरित (न्यूक्लिअर वेस्ट)म्हणतात. ही सर्व उर्वरित प्रचंड किरणोत्सर्गी असतात. अणु-इंधनातल्या युरेनियम-२३८चं प्लुटोनियम-२३९या द्रव्यात रूपांतर होतं. हे द्रव्यं अडीच लाख वर्ष किरणोत्सर्जन करीत राहतं. काही द्रव्यं तर कोटयवधी वर्ष किरणोत्सर्जन करणारी आहेत. ही सगळी उर्वरित कुठे, कशी साठवायची? यातील कोणतीही सुरक्षित पद्धत माणसाला ज्ञात नाही. आपल्याकडे आहेत साधारण १००वर्ष टिकणाऱ्या टाक्या. त्यात ही द्रव्यं भरून त्या टाक्या जमिनीखाली वा समुद्रातळाशी गाडण्याची सध्या पद्धत आहे. पण भविष्यात तिथे भूकंप झाले तर? ज्वालामुखींचा उद्रेक झाला तर?प्रत्यक्षात हे काही न होता कित्येक टाक्या फुटल्या आहेत आणि किरणोत्सर्गी द्रव्यं जमिनीत व पाण्यात मिसळली आहेत.मग लाखो वा कोटी वर्षाचा वायदा आपण कशाच्या बळावर करणार आहोत?

अशीच दुसरी समस्या म्हणजे २५-३० वर्ष काम केल्यावर अणुवीजकेंद्र बंद करावे लागेल तेव्हा त्याचं काय करायचं ही सध्याची योजना अशी की, त्याच्या गाभ्याभोवती काँक्रिट ओतून तो बुजवून टाकणं. पण ही किरणोत्सर्ग आत साठवलेली थडगी भूकंपानं फुटली तर ? शत्रूनं ध्वम् फेकून ती उद्ध्वस्त केली तर?म्हणजे हे सगळे जणू कालध्वमच (टाईम बाँबच) आहेत. त्यातला राक्षस केव्हा बाहेर येऊन आपल्यावर झडप घालेल

सांगता येत नाही!

उघड स्वरूपातला अणु-राक्षस जाळून-फाडून सोलून ठार मारतो; तर या मायावी रूपातला अणु-राक्षस कर्करोग आणि अन्य किरणोत्सर्गजन्य व्याधींनी माणसाला संपवितो. किरणोत्सर्गाची मोठी मात्रा शरीरात गेली तर मज्जासंस्था निकामी होते नि माणूस मरतो. जरा कमी मात्रा मिळाली तर अन्नावरची वासना उडणं,मळमळ, उलट्या, हगवण, आतडी पिळवटणं, जलनाश असे विकार होतात. जोडीला थकवा, ताप, डोकेदुखी असतातच. या सगळयांमुळे आठवड्याभरात माणूस मरतो. मात्रा आणखी कमी असेल तर १-२ महिन्यांनी अस्थिमज्जेला इजा होते. त्यामुळे पेशीच्या निर्मितीत खंड पडून मृत्यू येतो. त्याहूनही कमी मात्रा असेल तर रक्ताच्या कर्करोगानं प्रारंभ होऊन नंतर अनेक अवयवांचे कर्करोग होतात. त्यांनी ग्रासलेली माणसं नंतरची कित्येक दशकं मरत राहतात. पुनरुत्पादक पेशींना किरणोत्सर्गाची बाधा झालेली असेल, तर अनेक आनुवंशिक विकृती असतात. माणूस म्हणता येणार नाहीत अशी बालकं जन्माला येतात आणि मरतात!

**राक्षसाबद्दल प्रेम का ?**

इतक्या भयंकर प्रकारांनी नरसंहार घडवून आणणारा हा अणु-राक्षस आपल्याला हवाच आहे का? आपण या पृथ्वीला स्वर्ग बनवणार आहोत की नरक? माणसाचा देवमाणूस व्हावा- नराचा नारायण व्हावा म्हणून आपण प्रयत्न करायचे की मानवजात संपून जाण्यासाठी? बाटलीत सुखानं झोपलेल्या अणु-राक्षसाला आपण जाणीवपूर्वक बाहेर काढलं. आपल्या युद्धपिपासेसाठी आपण त्याला अण्वस्त्राचं रूप दिलं; आपल्या सुखलोलुपतेसाठी त्याला अणुविजेचा बुरखा घातला. आज तो राक्षस आपल्याला खात आहे! त्याला पुन्हा बाटलीत भरायला हवा, खरं ना ? अण्वस्त्रं मोडीत निघायला हवीत. अणुचाचण्या पूर्णपणे थांबायला हव्यात, अणुवीजकेंद्र बंद करायला हवीत. !

पण त्यानं तरी हा राक्षस निष्प्रभ होणार आहे का ? कारण गेल्या ५० वर्षात जी किरणोत्सर्गी द्रव्यं तयार झाली आहेत,ती पुढची लाखो-कोटी वर्षे कर्करोग निर्माण करत राहणारच आहेत. अगदी आज जरी हा राक्षस बाटलीबंद केला,तरी ही संकटं काही बाटलीबंद होणार नाहीतच! पण तरी आजच हा राक्षस बाटलीबंद करण्यात शहाणपण आहे. संकटं टळणार नाहीत हे खरं, पण निदान आणखी वाढणार तरी नाहीत. समस्या सुटल्या नाहीत, तरी निदान त्या वाढणार नाहीत.

हे होण्यासाठी आवश्यकता आहे आपण



जागं होण्याची, संघटित होण्याची. सरकारांवर दबाव आणण्याची. अणु-कार्यक्रम थांबवण्यासाठी व्यापक जन-आंदोलनाची.

बाटलीतला राक्षस पुन्हा बाटलीत जाणं ही परीकथा आहे. बाटलीतून बाहेर आलेला अणु-राक्षस पुन्हा बाटलीत गेलेला नाही ही सत्यकथा आहे. पण या सत्यकथेचं परीकथेत रूपांतर होऊ शकेल तुमच्या-आमच्या प्रयत्नांनी ! ***

**दिलीप कुलकर्णी**, पंचनदी
ता.दापोली, जि.रत्नागिरी

## का व कसे?

**प्रश्न :** तापलेल्या जमिनीवर जेव्हा पाऊस पडतो तेव्हा'मातीचा सुगंध' का येतो ?

**उत्तर :** मातीमध्ये अनेक सेंद्रिय व असेंद्रिय घटक असतात. ह्युमस हा त्यातील एक सेंद्रिय घटक. जेव्हा पावसाचे थेंब गरम मातीवर पडतात तेव्हा त्यांची लगेच वाफ होते. ही वाफ स्वत:बरोबरच या ह्युमसचा देखील काही अंश वर घेऊन येते. हा वास या 'ह्युमसचा'येतो बरं! ही प्रक्रिया काहीशी 'स्टीम डिस्टिलेशन' या प्रक्रियेशी मिळती जुळती आहे. काही सेंद्रिय रसायने त्यांच्या उच्च उत्कलन बिंदूपर्यंत तापवली असता विघटन पावतात. पण वाफेच्या उपस्थितीत ती वायुरूप बनू शकतात. भारतात ही प्रक्रिया गुलाब पाकळ्यांपासून अत्तर काढण्यासाठी फार जुन्या काळापासून वापरण्यात येते.

### तुम्हीच उत्तरे पाठवा

१. आपल्या घरातील गॅसची (L.P.G.) शेगडी जळत्या उदबत्तीने पेटत नाही. मात्र ती विजेच्या बत्तीने(इलेक्ट्रिक लायटर) पेटते असे का ?


२. उकडलेले बटाटे हे कच्च्या बटाटयांपेक्षा सोलायला सोपे असतात असे का?

३. साबण कपड्यातून घाण कशी दूर करतो?

**कथा**

# पेट्टुकलीतील गुपित

**डॉ. लीला दीक्षित**



सुंदरवाडी तसं अगदी छोटंसं गाव. गावाची लोकवस्ती असेल एक हजाराच्या आसपास. हे गाव कसले! छोटीशी वाडीच होती ती. पण गाव मात्र नावाप्रमाणे सुंदर होते. पूर्वेकडे निळया टेकडया, डोंगरउतारावर छोटी भातशेती. खाली सखल भागात आंबे, फणस, नारळी, जांभूळ,पेरू असे नाना तऱ्हेचे फळवृक्ष आणि या गर्द झाडीत सुंदरवाडीची सारी वसाहत होती. गावात एक छोटीशी शाळा. तीसुद्धा केमळारू.धोऽधो पाऊस पडायला लागला की शाळा म्हणजे नदीच व्हायची, एवढं पाणी साठायचं मग गावातील सानेकाकांच्या ओटीवर आणि पडवीत तीन-चार महिने वर्ग भरायचे. सानेकाका होतेच तसे छान! मनमिळाऊ, दिलदार. ते कायम मुंबईला असायचे.सुट्टीमध्ये यायचे पण यंदा त्यांनी पेन्शन घेतली.मुंबईच्या धावपळीचा त्यांना कंटाळा आला होता.म्हणून आपले म्हातारपणचे दिवस शांतपणे घालवायचे म्हणून त्यांनी सुंदरवाडीलाच आता कायमचे राहण्याचा निर्णय घेतला होता. सानेकाकांच्या शेजारीच संदीप राहात होता.

**संदीप कुतूहलाने पेटीशी खेळत होता... कालियाची बाहेर आलेली ती चामडयाच्या तुकडयाची जीभ...सारंच गंमतीचं होतं.त्याच्या मनात प्रश्न आला, काय असेल या पेटुकलीत?**

संदीपच्या बाबांची शेती होती. गावातील पोस्ट ऑफिस त्यांच्या ओटीवर होते. ऑफिस कसले म्हणा! ओटीवरचा एक कोनाडा म्हणजे हे ऑफिस होते. गावात पत्रं तरी किती येणार. एकच अर्धवेळचा पगारी माणूस होता. तो यायचा. चारसहा पत्रे असत,ती वाटून टाकायचा. रजिस्टर भरायचा.पण सानेकाकांची पत्रे मात्र रोज संदीप नेऊन द्यायचा. हळूहळू सानेकाकांची व काकूंची संदीपशी गट्टी झाली. संदीप होताच तसा.तो तिसऱ्या यत्तेत शिकत होता. काकांची छोटी-मोठी कामे तो करायचा.नाक्यावर एकच किराणा मालाचे दुकान होते.त्यामधून काकूंना वस्तू आणून द्यायचा. एस.टी.च्या थांब्यावरून कधी सानेकाकाचे सामान यायचे तेही तो घेऊन यायचा. सकाळी देवासाठी फुले आणून द्यायचा. काकूंचे पाय दुखत, तेही तो चेपून

द्यायचा. काकू म्हणायच्या-

''कोण रे तू आमचा? नक्कीच गेल्या जन्मीच्या कोणीतरी असणार तू''

''काकू असं काय म्हणताय? या जन्मीचाच आहे की मी तुमचा.''

''ते खरं रे!''

''ते काही नाही मी नातू आहे तुमचा.''

खरंच नातूच आहेस बाबा, त्या शिवाय का एवढी सेवा करतोस?''

''सेवा कसली काकू? आई म्हणते या गोष्टी सहज आहेत. त्या करायलाच हव्यात लहान मुलांनी.''

काकूंचे मन भरून यायचे.

''काकू, एक विचारू? यंदा पंचाईत आहे?''

''कसली पंचाईत?''

''यंदा पावसाळ्यात शाळा कुठे भरणार?

''दरवर्षी कुठे भरते?''


''कमाल झाली काकू, तुम्ही मुंबईला असता. घर रिकामे असे.म्हणून तुमच्या ओटी-पडवीत भरत असे शाळा''

''मग यंदा पण तिथेच भरेल.''

सानेकाका म्हणाले. नुकतेच ते फिरून येत होते. सानेकाका फिरून आले की संदीपला सांगायचे,''संदीप माजघरातली ती पेटुकली घेऊन ये कोनाड्यामधली.''

संदीप ती पेटुकली घेऊन यायचा.शिसवीच्या लाकडाची ती एक फूट लांब आणि तीन फूट रूंद अशी पेटी होती.सानेकाका तिला पेटुकली म्हणायचे.संदीपला ती पेटी म्हणजे अगदी जादूचीच वाटायची. त्यामध्ये अनेक कप्पे होते. सानेकाकांनाच ते उघडता यायचे. त्यामध्ये सानेकाकांची खर्चाची वही असे,पैसे असत.आणखी काहीबाही. पेटी उघडली की पेटीच्या झाकणावर एक सुंदर चित्र होते कृष्णाचे.पण हा कृष्ण कसा होता माहीत आहे? कालियाच्या फणीवर एक पाय नाचवत उभा असलेला तो कृष्ण होता. आणि गम्मत म्हणजे कालियाची जीभ बाहेर आलेली होती. बाकी चित्र तैलरंगात होते. परंतु चामड्याच्या तुकड्याची जीभ मात्र बाहेर लोंबत असे.

संदीपने ती पेटुकली आणून सानेकांकाना दिली. सानेकाकांनी काकूंना विचारून खर्च मांडला. छोटी वही पेटीत



ठेवली आणि संदीपला ती पेटी परत नेऊन ठेवायला सांगितले. संदीपला कित्येक वेळा ती पेटी तपासून पाहावी असे वाटायचे पण त्याने असे कधी केले नाही.दुसऱ्याच्या वस्तूंना धांडूळून असा हात लावणे बरे नाही हे त्याला माहीत होते. संदीपचे बाबा आणि आई मधून मधून सानेकाकांकडे येत असत. एक दिवस संदीपने त्या पेटीकडे बोट करून दाखविले व म्हणाला–

''आई ऽ जादूची पेटुकली.''

तिने संदीपला दटावले–''कसली जादू. साधी तर पेटी आहे.''

पण या पेटीबद्दल संदीपच्या मनात मनात एक कुतूहल मात्र राहून गेले होते.

मे माहिना सुरू झाला की सानेकाकांचा पुतण्या, त्याची मुले व सून यायची. त्यांचा मोठा मुलगा रमेश संदीपएवढाच होता. संदीपला मुळीच आवडायचा नाही. कारण तो शहरात राहणारा ना! कसल्या ऐट्या मारायचा. घरात सारखी उचकपाचक करायचा. ऐकायचा तर कुणाचेच नाही. धाकटा विभास अगदीच लहान म्हणजे तीन वर्षांचा होता. त्यामुळे त्याला खेळायला कसं घेणार? तो सारखा आईचा पदर धरून फिरत असायचा. सानेकाकू ही सारी मंडळी आली की खूष असायच्या. घरात सारखे छान छान पदार्थ करायच्या. काही केले तरी संदीपचा वाटा वाटीत काढून ठेवलेला असायचा. रमेशला ते मुळीच आवडायचे नाही.त्याची आई तर एकदा सानेकाकूंना म्हणाली सुद्धा, ''सासूबाई फार लाडावून ठेवलंय तुम्ही त्या संदीपला. प्रत्येकात त्याला वाटा कशाला?''

''अगं असू दे, तुम्ही नसता तेव्हा तोच असतो हो माझ्या हाताशी.किती गुणी मुलगा आहे?''

''हुं ऽ ऽ''असे म्हणून नाक मुरडून रमेशची आई निघून गेलेली संदीपने पाहिले होते. तो शहाणा होता. मग तो रोज सारखा यायचाच नाही. पण सानेकाकूंना कुठली चैन पडायला. त्या संदीपला हाक मारून बोलवायच्या.मग संदीपचा नाईलाज व्हायचा. संदीपला हे जाणवले होते की ही सारी माणसे मतलबी आहेत.त्याचे असे झाले...

त्या दिवशी भल्या सकाळी संदीप सानेकाकूंच्या बागेत नेहमीप्रमाणे फुले आणायला गेला होता. चमेलीचा वेल छान बहरला होता. इतका विस्तारला होता की न्हाणीच्या मागच्या भिंतीवर खूप वर चढला होता. तिथे छान आडोसा होता. संदीप फुले काढतोय हे कुणालाच दिसले नाही. सानेकाकांचा पुतण्या व सून न्हाणीच्या पलीकडच्या हातणीवर बसले होते. गप्पा मारीत होते.संदीपला सारं ऐकायला येत होते.



''म्हातारी भारी आहे. आठ दिवस झाले येऊन पण काही दाद लागू देत नाही–''रमेशच्या आईचा आवाज आला.

''अगं जरा सबुरीने घ्यायला हवे, मृत्यूपत्रासंबंधी मी बोललो. पण ते नुसतंच हसण्यावारी नेतात. म्हणतात तुझ्याशिवाय आहे कोण मला?''रमेशच्या बाबांचा आवाज.

''ते जरी खरं असलं तरी सारं कागदोपत्री हवं.''

संदीपला फारसा अर्थबोध झाला नाही. त्याने आईला आल्यावर सारं सांगितलं आई मनातून समजली.या पुतण्याचा आणि सुनेचा सानेकाकांच्या इस्टेटीवर डोळा आहे. सानेकाका निवृत्त झाले त्यावेळी निवांत राहावे म्हणून त्यांनी सुंदरवाडीला हे छोटे घर–वाडी खरेदी केले. सानेकाकांची ही स्वत:ची इस्टेट होती. त्यामुळे त्यांची विल्हेवाट लावण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे हे ओळखूनच मृत्यूपत्राची घाई झाली होती. सुट्टी संपली तशी पुतण्या व सारी परत मुंबईला गेली.संदीपला हुश्श वाटले. कारण ही सारी मंडळी आल्यापासूनच सानेकाकांच्याकडे जाण्यातला मोकळेपणाच नाहीसा झाला होता.

दुसऱ्या दिवशीच एक दुर्दैवी घटना घडली. नेहमी सकाळी संदीप फुले घेऊन सानेकाकांकडे आला.सानेकाका उठलेच नव्हते. संदीपने विचारले–

''काकू काका उठले नाहीत अजून?आज फिरणे बंद वाटते?''

''जा, उठव पाहू त्यांना. केव्हापासून हाक मारत्येय.''

संदीप काकांच्या खोलीत गेला. त्याने काकांना हलवले पण त्यांचे उठण्याचे चिन्ह दिसेना. तो म्हणाला–

''काकू गदागदा हलवून काका उठत नाही.''

''काय? गदागदा हलवूनही उठत नाहीत?

त्या खोलीत आल्या आणि किंचाळल्याच. कारण आजोबाचे डोळे अर्धवट उघडे होते, एक हात कॉटखाली लोंबत होता. त्यांचे अंग गार लागत होते. त्यांच्या किंचाळण्याने संदीपचे आई बाबा आले. सारा प्रकार त्याच्या लक्षात आला. रात्री केव्हातरी काकांचे प्राण अनंतात

विलीन झाले होते. सानेकाकू तर कोसळल्याच.त्याच दिवशी सायंकाळी मुंबईहून पुतण्या सून मुले आली. काकांचे सारे दिवस–वार ठीक झाले. सानेकाकूंना मुंबईला नेण्याचा विचार पुतण्याने बोलून दाखवला.पण त्यांनी नकार दिला.त्या म्हणाल्या,

''मुंबईला मला मुळीच करमायचं नाही.तुझ्या घरी चौथ्या मजल्यावर मी अडकून पडते. मला चढउतार होत नाही बाबा. गुडघे दुखतात माझे.''

''अगं ऽकाकू, मुंबईला मी खाली ब्लॉक घेतोय.तुला स्वतंत्र खोली.''

''काही नको बाबाऽ''

''काही नको कसे?हे घर विकून तर पैसे...

''काय? हे घर नाही मी विकणार.''

''विकावंच लागणार.''

आणि मग त्या दोघांचा खूप वाद झाला. संदीप मागच्या अंगणात फुले काढीत होता. त्याने सारे ऐकले. घरी येऊन आईला सांगितले. पुतण्या मुंबईला निघून गेला मधून मधून तो येई. काकूंशी वादडून जाई.पण काकू या साऱ्याला कंटाळलेल्या होत्या. सानेकाका अचानक गेल्याने त्यांनी मृत्यूपत्र केले की नाही काही कळत नव्हते. तसे कागदपत्रही सापडले नाहीत. पुतण्याने हळूहळू साऱ्याचा कब्जा घेतला होता. बागेचे येणारे थोडे उत्पनही तो लाटायचा.संदीपच्या बाबांनी सांगितले तरी त्याचा काहीच उपयोग नव्हता.काकूंना त्रास होत होता,त्याने संदीप अस्वस्थ होता.तो आता चौथीत गेला होता. सानेकाकूंचा रोजचा खर्च तोच लिहीत असे. सानेकाकांच्या त्याच पेटीत काकूंची डायरी व पैसे असत. संदीपच्या मनातील त्या पेटुकलीचे रहस्य तसेच होते.एक दिवस खर्च लिहून झाल्यावर काकू पैसे मोजीत होत्या.

संदीप कुतूहलाने पेटीशी खेळत होता. पेटीच्या झाकणावरील कृष्णाचे चित्र,कालियाची बाहेर आलेली ती चामडद्याच्या तुकडद्याची जीभ.सारंच गमतीचं होतं संदीप म्हणाला,

''काकू या साऱ्या चित्रात ही कालियाची जीभ बाहेर लोंबती कशाला?

''काय की? पहिल्यापासूनच ही

(पान क्र. १६५ वर पुढे चालू)



**वाचलेच पाहिजे असे काही**

# पूर्णत्वाचे प्रवासी

**सुषमा निसळ**

समाजामध्ये वावरताना आपण आपल्याभोवती अनेक प्रकारच्या नात्यांची माणसे जमवलेली असतात. त्यांच्याशी आपला नेहमी संवाद होत असतो.त्यातून आपले स्नेहबंध अधिकाधिक दृढ होत असतात.आजोबा आणि नातू हे एक असेच मायेचा रंग असलेले नाते आहे.याच नात्यांचा आधार घेऊन प्रा.शरद कुलकर्णी यांनी 'पूर्णत्वाचे प्रवासी' हे पत्ररूपातील पुस्तक लिहिले आहे.

अजाण, निरागस बालवय असलेल्या आपल्या नातवाला तो तरूण होईपर्यंत पत्रे लिहिली आहेत. त्या ठराविक वयात आपण नेहमी ऐकत असलेल्या गोष्टी महाभारतातील कथा, रामायणातील प्रसंग




या सर्वांचा सद्य:स्थितीशी कसा मेळ घातला जायला हवा याचे रंजक वर्णन आहे.आई-मुलगा, वडील-मुलगा, शिक्षक -विद्यार्थी या दोन्ही भूमिकांमधील नाते कसे असावे, ते कसे वाढवावे, कसे जोपासावे हे साध्या साध्या उदाहरणांतून दाखवून दिले आहे.या पत्रांमधून आपल्याला तत्त्वज्ञान वाचायला मिळते,राजकारण म्हणजे काय ते समजते, समाजसेवा कशी करावी याचे मार्गदर्शन मिळते.

'मोक्षाचा मार्ग' या पत्रामध्ये लेखकांनी स्वत:च्या मामांविषयी लिहिलेले आहे. त्यांनी सर्व आयुष्य समाजसेवेमध्ये घालविले. उतारवयात कर्करोगासारख्या रोगाशी टक्कर दिली. त्यांना स्वत:ला परदेशातून आलेली औषधे त्यांनी शेजारच्या तरूण रोग्याला देऊन टाकली. हा प्रसंग मनाला फारच चटका लावतो.

'नाममहिमा' या पत्रामध्ये प्रत्येकाने आपल्या नावाला चांगला 'अर्थ'द्यावा.कर्तृत्वाने नाव मिळवावे, मिळालेले नाव टिकवावे असा संदेश आहे.

आजोबांच्या भूमिकेतून लिहिलेली ही पत्रे कुठेही कंटाळवाणी झालेली नाहीत. त्यात केवळ उपदेशाचा, आज्ञेचा सूर नाही 'असेच वागा,असेच करा' हा दुराग्रह नाही. मला असे असे अनुभव आले, अशी माणसे भेटली.ही वस्तुस्थिती समोर ठेवली आहे. त्यात निराशा, वैफल्य उद्वेग, त्रासलेपणा आलेला नाही. त्यामुळेच सुरवातीला अपरिचित वाटणारे लेखकाचे नाव पुस्तक

वाचल्यानंतर आपलेसे वाटू लागते.आपल्याला आजोबांनी असेच समजावून सांगितले असते इतकी जवळीक ते निर्माण करू शकते.

लेखक स्वत: उच्चविभूषित आहेत.देशपरदेशात प्रवास करून आलेले आहेत.भारतीय संस्कृतीचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. या सर्वांचा त्यांनी पुस्तकात केला आहे. त्यांच्या लिखाणात रुक्षपणा,पाल्हाळ,द्विरूक्ती हे दोष कुठेही आढळत नाहीत. समतोलतेची एक सुंदर लय लिखाणात सतत अनुभवाला मिळते.

या सर्व पत्रांच्या लेखनाचा हेतू मुलांची वाढ होत असताना,घडण होत असताना ती एक 'माणूस' या नात्याने व्हावी हा आहे. त्यासाठी चांगलं काय आणि वाईट काय दोन्ही बाजू समोर ठेवण्याचा प्रयत्न आहे. निरीक्षण, स्वानुभव, जागरूकता कशी ठेवावी याचे मार्गदर्शन आहे. आपल्या जन्मापासून सुरू झालेला प्रवास 'माणूसपणात' पूर्णत्वाला पोहोचावा ही इच्छा आहे. तुमची, तुमच्या आईवडीलांची आणि आजीआजोबांचीही तीच इच्छा असणार नाही का? तेव्हा हे पुस्तक वाचून तुम्ही तुमच्यातील 'माणूसपण' घडवायला सुरूवात करा आणि 'पूर्णत्वाचे प्रवासी' व्हा!

**पूर्णत्वाचे प्रवासी,**
**लेखक :** प्रा.शरद कुलकर्णी
**प्रकाशक :** राजहंस प्रकाशन
**पुष्ठे :** २४७ किंमत रू५०/-

# चौघीजणी

सुवर्णा जोशी

अमेरिकन लेखिका लुईसा मे अल्कॉट यांच्या 'लिटल वुमेन' आणि 'गुड वाईव्हज्' या पुस्तकांचा मराठी अनुवाद म्हणजे 'चौघीजणी' ही प्रदीर्घ कादंबरी. मराठीतील ख्यातकीर्त कवयित्री, सिद्धहस्त लेखिका शांताबाई शेळके यांनी या पुस्तकांचा सलगपणे अनुवाद केला आहे.

श्रीमती अ‍ॅल्कॉट यांची 'लिटिल वुमेन' ही कादंबरी प्रथम प्रसिध्द झाली. लेखिका अत्यंत गरीब कुटुंबात बाढलेली. आपल्या तीन बहिणींचे संगोपन करण्यासाठी शिवण-टिपण अशी घरगुती कामे करीत असे. आपल्या जीवनाचे भावविश्व नकळत या कादंबरीत लुईसा अल्कॉटने शब्दबद्ध केले. 'लिटल वुमेन' ला अमाप लोकप्रयता मिळाली. तसेच मराठीतील 'चौघीजणी' या कादंबरीलाही



वाचकांनी डोक्यावर घेतले.

या कादंबरीत प्रामुख्याने आपल्याला भेटते मार्च कुटुंब. या कुटुंबातील आईवडील, चार बहिणी आणि त्यांचा शेजारी लॉरी यांच्याभोवती कथाविश्व फिरत राहते.या चौघीजणी स्वभावाने अत्यंत भिन्न, प्रत्येकीच्या आवडीनिवडी अगदीच वेगळ्या. तरीही चौघींचे एकमेकींवर असलेले जिवापाड प्रेम, माया या एका अनोख्या धाग्याने त्या एकमेकींना सतत समजून घेत असतात.अंगात ताप असताना बहिणींच्या वाटणीचे काम करणारी बेथ,आणि आईवडिलांच्या अनुपस्थितीत बेथचा आजार बळावल्यावर अनेक रात्री जागणाऱ्या दोघी बहिणी असे कितीतरी प्रसंग वाचताना डोळ्यांत टचकन् पाणी येते.

या कादंबरीतील दुसरी बहीण ज्यो हे पात्र मुळ लेखिका लुईसा हिचेच प्रतिरूप आहे.दिसण्यास अत्यंत पुरुषी परंतु मनाने तितकीच हळवी, भावपूर्ण लेखन करणारी, मोठी लेखिका बनण्याचे स्वप्न पाहणारी..वाढत्या मुलामुलींना असणारे छंद, उदाहरणार्थ मांजर पाळणे,बाहुल्यांना नटवणे, चित्र काढणे असेच छंद या मुलींना आहेत. त्यामुळे भलीमोठी कादंबरी वाचताना त्यातील पात्रं आपल्याशी जवळीक साधतात.

या मुलींचे आईशी असलेले मैत्रीचे नाते आणि आईबरोबरच्या घडणाऱ्या संवादांतून मुलांच्या मनावर संस्काराचे ठसे खोलवर उमटण्यास निश्चितच मदत होते. परंतु सतत उपदेशाचे डोस दिले जात नाहीत हे विशेष. अगदी साध्या, लहानशा प्रसंगातून विचाराला दिशा देण्याचे कार्य कादंबरी करते.

या कुटुंबाच्या शेजारी लॉरेन्स राहात असतात. त्यांचा नातू लॉरी या चौघींचा चांगलाच मित्र असतो. अत्यंत खोडकर,मिश्कील स्वाभावाचा लॉरी,प्रत्येक संकटांत मार्च कुटुंबियांना मदत करीत असतो. तसेच आनंदातही सहभागी होत असतो. पुढे ज्यो या लेखिका बनत चाललेल्या बहिणीला प्रोफेसर भाअर हे मित्र भेटतात.मेगचा विवाह होतो.. सर्वांना अत्यंत प्रिय असणाऱ्या बेथचा अकाली मृत्यू होतो. अशा अनेक घटनांनी कादंबरी वाचकांना आपलीशी वाटते.आणि त्यातील पात्रांशी आपलाही स्नेह जुळतो.

मूळ कादंबरीला जशी वास्तवाची भक्कम चौकट आहे. तशीच चौकट अनुवाद करतानाही शांताबाई शेळके यांनी कायम ठेवली आहे. त्यामुळे वाचताना कुठेही तुटकपणा जाणवत नाही याचे श्रेय अर्थातच श्रीमती शेळके याच्या अनुवाद कौशल्याला आहे. १३ वर्षे वयाच्या पुढच्या प्रत्येक मुलामुलीने ही कादंबरी जरूर वाचावी आणि 'चौघीजणी'च्या भावविश्वाचा अनुभव घ्यावा व आपले अनुभवविश्व विस्तारित करावे.

***

**'चौघीजणी'**
**लेखिका :** शांता शळके
**प्रकाशक :** उन्मेष प्रकाशन,पुणे.
**पृष्ठ संख्या :** ५७५ किंमत रू १००/-

# धुरंधर सेनानी
# हरिसिंह नलूआ

लेखक :
डॉ.वि. वि. पेंडसे
चित्रकार :
मिलिंद मिसाळ

महाराजा रणजितसिंह! भारताचा मानबिंदू 'कोहिनूर' आणि 'मयूरसिंहासन' मुघलांकडून जिंकून पेशावरपर्यंत धडक मारणारा वीर पुरुष! त्याच्या सैन्याच्या बहाद्दूर सेनापतीची 'हरिसिंह नलुआ' ची ही कथा! 'चूप' नलूआ आया' म्हणताच पठाणांची रडणारा पोरे गप्प बसत असं म्हणतात. त्या झुंजार वीरांच्या पराक्रमाची ही कथा !




तयांच्या कळा जाणवाव्या अम्हाला, तयाच्या सुखाचीच लागो स्पृहा।





गुरूविण कोण दाखविल वाट, आयुष्याचा पथ हा दुर्गम, अवघड डोंगरघाट




स्मरोणि आत्मकर्तव्या, प्रयत्नांची करी रास। स्वये चोखाळितो वाटा तयांचा देवही दास।




समतेचे हे तुफान उठले,उठले सागरकडे, एकजूट ही पाहून पडतील अन्यायाला तडे




घावावाचून नसे देवपण, जळल्यावाचून प्रकाश कोठून। का सांग निराशा तुझ्या उरी. हा दीप तमावरी मात करी।




आधार दुःखिताचे होतात हात ज्याचे, सेवेत धर्म आहे. सेवेत तीर्थ ज्याचे, सहवास ईश्वराचा त्यालाच नित्य आहे.

# माथा टेकवावा अशी पावले



**संकलन : सुवर्णा जोशी**

मित्रांनो,

प्रतिभावंत लेखक, कवी, नट, उद्योजक ही सर्व कीर्तीच्या झगमगाटात असणारी माणसं!आई किंवा वडील म्हणून त्यांच्या जीवनाकडे पाहताना त्यांच्या मुलांना काय वाटतं,आपल्या मुलांशी त्यांचे कसे संबंध असतील या विषयीचं कुतूहल आपल्या मनात असतं. आईवडिलांनी ज्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवलं त्याच क्षेत्रात त्याच्या पावलावर पाऊल टाकून चालणाऱ्या काही थोर व्यक्तींच्या सुपुत्र वा सुकन्यांनी आपल्या हा वारसा कसा मिळाला याविषयीची मनोगते ‘माथा टेकवावा अशी पावले’ या लेखमालेत व्यक्त केली आहेत.

निसर्गप्रेमी,दुर्गप्रेमी,रसिक,प्रतिभावंत लेखक गो.नी.दांडेकर यांचा परिचय करून दिलाय त्यांची सुकन्या **‘वीणा देव**’यांनी! एकेकाळी मराठी चित्रपटसृष्टी गाजवणारे नटसम्राट **राजा गोसावी** यांच्याविषयी लिहीत आहेत**‘शमा देशपांडे!** सामाजिक जाणीव आणि भव्योदात्त निसर्गाची ही आपल्याला आईकडून मिळालेली देणगी आहे असं कवयित्री **पद्मा गोळे** यांचे चिरंजीव ‘प्रकाश गोळे’ यांना वाटतं. ‘माझं रसिकमन जपणाऱ्या आईकडूनच मला प्रतिभेचा स्फुल्लिंग मिळाला’ अशा शब्दांत कवयित्री **इंदिरा संत** यांचे ‘**प्रकाश संत**’ मातृऋण मान्य करतात.उद्योजक नवलमल फिरोदिया यांच्या सहवासात व्यवसायात यशस्वी पावलं टाकताना धंद्यातील नीतीमत्ता जतन करण्याचा संस्कारही मिळाला हा अनुभव आहे त्यांचे सुपुत्र ‘अभय फिरोदिया’ यांचा.

मोठ्या व्यक्तींचं मोठेपण त्यांच्या मुलांच्या शब्दांत अनुभवणं हा मनोरम अनुभव ही मनोगतं वाचताना नक्कीच येईल!


## गो.नी.दांडेकर

गोपाल नीलकण्ठ दांडेकर या प्रतिभावंत माणसाची मुलगी होण्याचं भाग्य मला लाभलं आहे. त्यांच्याकडून मला आजवर खूप मिळालं.विशेषत: माझ्या संस्कारक्षम वयात त्यांनी मला जे दिलं, ते आगळंच आहे.

कोणत्याही आई-वडिलांचं आपल्या मुलांवर प्रेम असतंच. पण तरीही प्रत्येकाची

प्रेम व्यक्त करायची रीत वेगळीच असते. संस्कार करायचीच पद्धत निराळी असते. आमच्या बाबतील थोडं आणखी निराळं होत. माझे अप्पा नोकरी करीत नव्हते. लेखन हाच व्यवसाय त्यांनी निवडला होता. त्यामुळे त्यांचा वेळ तसा बांधलेला नसे. शिवाय लेखकाची संवेदनशीलता, भावनाशीलता त्यांच्यापाशी असल्यानं त्यांचं माझ्याशी आलेलं नातं अगदी उत्कट.छोट्या छोट्या गोष्टींतून ते मला शिकवत राहायचे.

आम्ही तळेगाव दाभाडे ह्या खेडेगावी राहात होतो. त्यामुळे ग्रामजीवनातल्या अनेक वैशिष्ट्यांचा परिचय मला त्यांनी तिथेच करून दिला. रोज संध्याकाळी ते मला फिरायला नेत. तळेगाव दाभाडे सरदारांचं गाव! तिथं त्यांचा पडका वाडा होता. तिथे कधी नेत अन् इतिहासाच्या गोष्टी सांगत.कधी मित्राच्या शेतावर नेत, अन् जमिनीशी आपल्या नात्याबद्दल बोलत.कधी तळ्यावर जाऊन पाण्यात पाय सोडून लोकगीतं म्हणून दाखवीत. तर कधी डोंगरावर नेऊन वारा प्यायलेल्या वासरांसारखं



उनाडताना मला सुखानं पाहात. हे सारं अनुभवता यायला हवं, हा त्यांचा आग्रह असे. अशा वेळी मुलगी आहे असा विचार त्यांनी कधी केला नाही. किंबहुना मुलगा-मुलगी भेद त्यांनी कधी दाखवला नाही.कधी त्यावर बोलायची वेळ आली तर मुलीकडे झुकत माप असायचं.

समाजात वेगवेगळ्या जाती असतात, त्याच्यात उच्चनीच असा भेद असतो. ह्याची मला माझ्या घरात कधीही जाणीव झाली नाही. कारण अप्पा-आई-आजी ह्यापैकी कोणीही आमच्या घरात येणाऱ्या कोणाही माणसाला सन्मानानंच वागवत.इतकंच नाही तर त्या प्रत्येकाजवळ असणाऱ्या गुणवैशिष्ट्यांचं त्यांनी कौतुक केलं.निसर्गाची असंख्य रूपं त्यांनी अतिशय मनापासून अनुभवली.अन् ती कधी शब्दांनी तर कधी प्रत्यक्ष नेऊन आम्हालाही अनुभवायला लावली. गड किल्ले हे त्यांनी इतिहासाचे साक्षी म्हणून पाहिलेच. पण तिथल्या निसर्गाची भुरळही त्यांना फार मोठी होती.ही सारी रूपे म्हणजे देवाचं काव्य आहे असं त्यांचं मत. ते त्यांच्या तरूण वयात गाडगेबाबांचे शिष्य होते. बाबांनी त्यांना असं

सांगितलं होतं.की ''ही सृष्टी देवाची लिपी आहे. ती वाचावी.'' अप्पांनी स्वत: तर ती वाचलीच. पण त्या लिपीतले अनेक बारकावे त्यांनी मला दाखविले. कधी डोंगरावर जाऊन आसपासाच्या डोंगररांगा निरखायला लावून, कधी नद्यांच्या प्रवाहातल्या वेगाची साक्षी होऊन, कधी चिमुकल्या फुलांना न्याहाळायला लावून तर कधी तुफान पावसात भिजायला लावून, कधी वाऱ्यांचे झोत अनुभवायला लावून,तर कधी उन्हाचे चटके सोसायला लावून ह्या साऱ्या सृष्टीशी आपलं अगदी जवळचं नातं आहे ह्याची जाणीव ते करून देत. आज असं खूप वाटतं की हे खूप निराळं होतं. आपल्या मुलांना फिरायला सगळेच पालक नेतात.पण तिथे गेल्यावर काय पाहायचं, कसं पाहायचं ह्याची जाणीव झाली तर त्याचा फायदा खूप होतो, एरवी मग नुसतंच आम्ही 'जाऊन आलो' ह्या समाधानात मुलं राहतात.

अप्पांना स्वत:ला संगीतादि कलांची मनापासून आवड. त्यातलं शिक्षण काही त्यांना घ्यायला मिळालं नाही. पण उपजत जाण म्हणतात ती त्यांच्यापाशी आहे. मी गाणं म्हणत असे. मला त्यातलं शिक्षण आप्पांनी दिलं.पण मी काही गायिका झाले नाही. मात्र माझ्या कानांवर संगीताचे संस्कार व्हायला हवेत ह्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. अगदी 'कानसेन'नाही झाले तरी संगीतातली सौंदयस्थळं माझ्या कानांना जाणवतात ती त्यामुळेच.

काही चांगले चित्रपट व नाटकं त्यांनी मला आवर्जून दाखवीले.चित्रपटातील अभिनेत्यांच्या उत्कृष्ट अभिनयाच्या जागा, चांगल्या छायाचित्रणाचे तपशील, चित्रपटसंगीतातलं सौंदर्य ते अगदी सहजपणे एखाद्या प्रतिक्रियेने जाणवून द्यायचे. ह्यामुळे चांगलं काय आणि ते का मला समजायला लागलं लहान वयात हे फार आवश्यक असते.

ते स्वत:अतिशय शिस्तबद्ध अन् नियमबद्ध असे राहायचे. आजही त्यांना प्रत्येक गोष्ट अगदी वेळेवर लागते. सकाळी उठून व्यायाम करून पथ्यपाणी सांभाळून त्यांनी आपली प्रकृती चांगली राखली. कोणतेही कष्ट करता यायला हवेत असं ते म्हणायचे. अन् कोणतेही काम करायला लाज वाटू नये असंही. कोणत्याही गोष्टीचा आळस नाही. ह्याचाही परिणाम माझ्या मनावर झाला आहे.कुठेही जाताना वेळेवर जायचं.लोकांना आपल्यासाठी टांगत ठेवायचं नाही हे त्यांनीच शिकवलं.तेही स्वत: त्याप्रमाणे वागून!

मोठ्या माणसांचा आदर करायला हवा, असा त्यांचा सतत आग्रह असतो. आमच्या घरी वयानं,अधिकारानं ज्येष्ठ अशी अनेक

माणसं येत असत, त्यांच्याशी अप्पा अतिशय नम्रपणे वागत. ज्येष्ठ माणसाला वाकून नमस्कार करणे ही आपल्याकडली प्रथा, ती अप्पा आवर्जून पाळत आणि मला पाळायला लावत. मला आठवतं की बारा-तेरा वर्षाच्या वयात मला असं वाटे, की नवीन ठिकाणी गेलो, की त्यांनी माझी सगळ्यांशी ओळख करून द्यावी.कारण मला हळूहळू जाणीव व्हायला लागली होती. पण ते मला म्हणत, 'तू आत जा, आणि सांग, मी अप्पा दांडेकरांची मुलगी म्हणून' मला संकोच वाटे. पण त्यांनी मला आग्रहपूर्वक तशी ओळख करून द्यायला लावली.त्यामुळे माझा अहंकार मारला जायचाच. आणि माझीही घरातल्यांशी थेट भेट व्हायची. एरवी दांडेकरांची मुलगी म्हणून अधिक लाड झाले असते.अन् त्याचा माझ्यावर विपरीत परिणाम होऊ शकला असता. केवळ लाडवले असते.

आणखी एक विशेष असा की ह्या साऱ्या संस्काराच्या बाबतील माझ्या आई-बाबाचं एकमत होतं आणि आपल्या लेकीवर चांगले संस्कार व्हावेत ह्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली.ही मेहनत हाही एक वेगळा भाग आहे. कारण त्यासाठी एकतर आपल्या अपत्याकडे पूर्ण लक्ष असावं लागतं. त्याचा कल लक्षात घेऊन आपल्या कामातून वेळ काढावा लागतो अन् योजनाबद्ध परिश्रम करावे लागतात. ते त्या दोघांनीही केले. अन् माझ्या बाबतीत असं नव्हे, पण माझ्या मित्र-मैत्रिणींनाही त्यांनी असंच वागवलं. त्यांनाही लोकगीतं शिकवली, त्यांना सहलीला नेलं.गडकिल्ल्यांवर नेलं. त्यांच्यासाठी हे करतानाही अप्पांना कष्ट करावे लागलेच. पण आपल्या लेकीच्या सोबत्यांनाही असं समृद्ध करावं, ह्याची जाणीव त्यांना होती.

आणखी एक महत्त्वाचा संस्कार त्यांच्यामुळे झाला.तो म्हणजे साधेपणाचा.एवढे ख्यातनाम लेखक असूनही त्यांच्या वागण्याबोलण्यात दिमाख नव्हता. साधी राहणी अन् चांगली विचारसणी असावी,हे मत माझ्यावर बिंबवलं. त्यामुळे मलाही कधी नटवेपणा करावासा वाटला नाही. पुढे मोठेपणी अनेक थोर व्यक्ती पाहिल्या,त्यांचं साधेपण पहिलं,अन् मग ह्या संस्कारांचं मोल समजलं.

आमच्या गावात असलेला स्वस्थपणा हाही आम्हा मुलांच्या पथ्यावर पडला, अप्पांच्या अनेक पैलू असलेल्या व्यक्तिमत्वाची सोबत मला लाभली, अन् त्यातून सहजपणे घडत गेले.

ह्याचा अर्थ असा मुळीच नव्हे,की त्यांनी जे जे दाखवलं,ते सारं मी सर्वार्थानं पाहू शकले किंवा त्यांच्या कल्पनेप्रमाणे पूर्ण

आदर्श वागू शकले,पण ह्या माझ्या व्यक्तिमत्वाच्या मर्यादा असतील.माझा आळशीपणा असेल किंवा माझा कल तिकडे नसेल, योग्यताही नसेल.पण हे नक्की की त्यांनी दर क्षणाला माझ्यावर संस्कार करायचे प्रयत्न केले, ह्याबद्दल माझं मन नेहमीच कृतज्ञतेनं भारलेलं असतं.

**वीणा देव**

'मानसी',तुळशीबागवाले वसाहत पुणे -९

## राजा गोसावी

नटश्रेष्ठ राजा गोसावी यांची मी कन्या. मराठी चित्रपटसृष्टीचा एक काळ गाजवणाऱ्या माझ्या वडिलांना रसिकाच्या हृदयात एक खास स्थान होतं. मला तसं फारसं आठवत नाही, तेव्हाची ही घटना. वयाच्या दुसऱ्या वर्षी माझी इवली इवली पावलं भाऊंचा हात धरून रंगभूमीवर आली. माझ्या बोबडच्या बोलांमध्ये आपल्या संवादाचे शब्द त्यांनी मिसळले आणि माझ्या अभिनय कारकिर्दीचा श्रीगणेशा झाला. कलेचा वारसा अशा तऱ्हेनं मला वडिलांपासून मिळाला.

बालपणीचा काळ सुखाचा..असं म्हटलं जातं.भौतिक दृष्टीने विचार केला तर माझे बालपण सुखातच गेलं.पण ही इमारत उभी होती, भाऊंनी उमेदवारीच्या काळात सोसलेल्या हालअपेष्टांच्या पायावर. यांची जाणीव वाढत्या वयात झाली. एकीकडे शालेय शिक्षण सुरू होते आणि त्याचबरोबर भाऊंच्या तालमीत अभिनयाचे धडे मी मन लावून घेत होते.भाऊंमुळे घरात मोठी नट मंडळी, कलावंत,दिग्दर्शक-निर्माते यांच्याबरोबरच अगदी स्पॉटबॉय, इतर काम करणारी मंडळी यांची-सतत आवक-जावक आमच्याकडे असे. परंतु हा मोठा तो छोटा अशा नात्यानं भाऊ कधीच कोणीशी वागत नव्हते. सर्वांशी हसून खेळून बोलत. याचा खोलवर संस्कार आणि परिणाम आम्हा सर्व भावंडांवर न कळत झाला आणि सगळ्यांशी सारख्याच आपुकीने आम्हीही वागू लागलो. 'राजा गोसावी'ची मुलगी म्हणजे कुणी विशेष व्यक्ती अशी भावना त्यांनी कधीच होऊ दिली नाही.

मात्र याउलट परिस्थिती बाहेर होती.



इतर लोकच आम्हाला तसे 'वेगळे' वागवत. भाऊंच्या वलयांकित प्रतिमेमुळे फक्त कौतुक कधीच वाट्याला आले नाही.नाटक-सिनेमावाल्यांची मुलं म्हणून आम्हा भावंडांना समाजाकडून, शाळेमधून वेगळीच वागणूक दिली जात असे.उदाहरणार्थ, शाळेत कित्येक मुली डोक्यात फुलं गजरा घालून येत. त्यांना बाई कधी रागवत नसत. उलट मी फूल घालून गेले की बाई डोळे डाफरून म्हणत, ''गोसावी, हे काही स्टेज नाही फुलं घालायला!''

आताच्या दिवसांत नाट्यकला, अभिनय याला जितकी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. नाटकात काम करणाऱ्या मुलीचं कौतुक केलं जातं, तसं माझ्या बालपणी, फार काय समजत्या वयात नव्हतं. यामुळे विचार करताना वाटतं, भाऊंनी तर समाज निंदेला तोंड देत शून्यातून स्वत:चं अभिनयविश्व निर्माण केलं. त्यांना किती त्रास झाला असेल? त्यांनी त्यावेळी केलेल्या परिश्रमामुळेच त्यांच्यापुढे माथा टेकवून लीन, नम्र होणे ही अगदी सहजक्रिया घडते.

नट म्हणून भाऊंचं मोठेपण मला लवकर समजलं.त्यामुळेच मला त्यांच्याकडून खूप शिकता आलं.आज मी माझ्या कुवतीवर नाव कमावलं याचा त्यांना अभिमान वाटतो.''राजा गोसावी''या नावाच्या कुबड्या मुलीने वापरल्या नाहीत याचं त्यांना समाधान आहे. रसिक प्रेक्षकच कलावंताची पारख योग्य तऱ्हेनं करतात. या क्षेत्रात तुमचं नाणं खणखणीत वाजणारं हवं.असंच त्यांनी मला शिकवलं.

इतका महान विनोदी कलाकार गंभीर होऊ शकतो यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. पण माझ्या विवाहाच्या वेळी ते एक पिता होते हेच खरं! आणि कन्येच्या पाठवणीच्या क्षणी ते विव्हळ झालेले,अंतर्मुख झालेले मी प्रथमच पाहिले.आणखी एक प्रसंग म्हणजे माझ्या आईच्या निधनाचा. पत्नीची साथसंगत सुटली त्यावेळी सर्व काळ हसविणारे, हसणारे भाऊ एकदम एकाकी दु:खी वाटू लागले.आम्ही भावंडं-त्यांची मुलंही त्यांना 'परकी' वाटत असावीत असाच विचार त्यावेळी मनात आला.

भाऊंनी प्रामुख्याने विनोदी नट म्हणून नाव कमावले. या विनोदी अभिनेत्याला प्रतिष्ठा त्यांच्या अभिनयानं मिळाली असं म्हटलं तर वावगं वाटू नये प्रतिभावंत नट विनोदी,गंभीर कोणतीही भूमिका तितक्याच ताकदीने पेलू शकतो हे त्यांनी 'नटसम्राट' करून दाखवून दिलं. नट म्हणून आणि वडील म्हणून त्यांच्या ऋणातून मी कधीच मुक्त होऊ शकणार नाही.मात्र ऋण व्यक्त

करण्याचा एक छोटासा प्रयत्न म्हणून मी 'नटसम्राट'या गंभीर नाटकाची निर्मिती केली.गेली ५२वर्षे ज्यांनी असंख्य भूमिका अजरामर करून सर्वांना सतत हसवलं त्याच कलाकाराने-भाऊंनी 'नटसम्राट' मधील आप्पा बेलवलकरांची भूमिका करून सर्व रसिकांना १५ मिनिटांत अक्षरशः रडवलं. भाऊंच्या विनोदी अभिनयाला हसून दाद देणारे आणि आता रडणारे प्रेक्षक मी पाहिले.नटसम्राटमधील बुटपॉलीशवाल्या बरोबरचे शेवटचे दृश्य भाऊ ज्या पद्धतीने सादर करायचे त्यावेळी माझ्याच नव्हे प्रेक्षकांच्याही हृदयाचा ठोकाच चुकायचा. यावेळी त्यांच्यातील कलाकाराचे वेगळेच पैलू मला दिसले आणि या पावलांपुढे मी नतमस्तक झाले.

**शमा देशपांडे,**
द्वारा-श्री.राजा गोसावी,
राजलक्ष्मी अपार्टमेंट, टि.म.वि.कॉलनी,
मुकुंदनगर,पुणे-३७.

## पद्मा गोळे

माझ्या आईचा,कवयित्री पद्मा यांचा जन्म सांगलीजवळ तासगाव येथे झाला.त्या पेशव्यांचे शूर सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या घराण्यातल्या.त्यांचं बालपण गेलं तासगावाच्या मोठ्या भुईकोट किल्ल्यात-भोवती मोठा तट, भव्य दगडी वाडा, आजूबाजूला भरपूर मोकळी जागा आणि त्यांत घोड्यांचा पागा, असा इतमाम होता सरदार पटवर्धनांचा या शतकाच्या सुरवातीला. आईचं प्राथमिक शिक्षण झालं वाड्यातच- एका खाजगी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि आई वडिलांकडून कौरवपांडवांच्या, शिवाजी महाराजांवर आणि परशुरामभाऊ पटवर्धनांच्या शौर्यगाथा ऐकत. इतिहासाच्या गोष्टीचा वारसा मला तिच्याकडूनच मिळाला आणि शिवाजी महाराजांवर अनन्यसाधारण भक्ती जडली ती सुद्धा तिनं आमच्याभोवती निर्मिलेलं तसंच''तासगावी''वातावरण यामुळे. पक्ष्यांच्या आधीची माझी पुस्तकं इतिहासावरच आहेत. आणि आजही



इतिहास माझा अत्यंत आवडता विषय आहे.

मुलांच्या शिक्षणासाठी आईचं कुटुंब नंतर तासगावहून पुण्याला स्थलांतर करते झाले. आईचं माध्यमिक शिक्षण पुण्याच्या कन्याशाळेत नामवंत लेखिका बाळुबाई खरे उर्फ विभावरी शिरूरकर (मालती बेडेकर) यांच्या मार्गदर्शनाखाली झालं. इतिहासाचा वारसा घेऊन आलेल्या आईनं शाळेत असतानाच पत्रादाई या सुप्रसिद्ध रजपूत शूर स्त्रीवर नाटिका लिहिली. आणि बाळूताईंना ती एवढी आवडली की त्यांनी ती त्या वर्षी शाळेच्या नाटकात बसविली.भाषेचं वरदान लाभलेल्या आईच्या मनात काव्याचे अंकुर शालेय जीवनातच फुटले आणि महाविद्यालयीन वर्षात ते जोमदार झाले. पण प्रागतिक विचारांचा वारसा आईला मिळाला विभावरी शिरूकरांकडून आणि चूल मूली या पलीकडे नवनवीन क्षेत्रांत महिलांनी उडी घेण्याची आवश्यकता तिच्या मनावर बिंबली ती याचवेळी.

स्काउटिंग, महिला मंडळे या चळवळीत तिने भाग घेतला आणि तिच्या विचारांना, काव्याला सामाजिक परिमाण लाभले.स्वातंत्र्य चळवळीशीही तिचा संबध या वेळी आला आणि रावसाहेब व अच्युतराव हे पटवर्धन बंधू, एस.एम. जोशी, शिरूभाऊ व अनुताई लिमये या त्यावेळच्या क्रांतिकारक मंडळीशी स्नेह जमून आला. स्वदेशीचं व्रत तिनं त्यावेळी स्वीकारलं. त्याचबरोबर स्त्रीशिक्षणाला, उच्च शिक्षणाला, सक्रीय पांठिबा द्यायचा या हेतूने, इतर नामवंत महाविद्यालये टाळून तिने पदवी परीक्षेसाठी धोंडो केशव कर्व्यांच्या महिला विद्यापीठात नाव घातले. आणि तिथून जी.ए. (गृहितागमा) ही पदवी मिळविली.आई आमच्या शनिवार पेठेतल्या घरातून चालत त्यावेळी गावाच्या अगदी टोकाला असलेल्या (आता कर्वे रस्त्यावर स्थित) कर्वे महिला विद्यापीठात जायची. पुढे एम.ए ही पदवी तिने याच विद्यापीठातून मिळविली.

आईच्या सामाजिक कार्याचा, तिच्या सामाजिक दृष्टीचा आम्हा मुलांच्या मनावर निश्चित परिणाम झाला असला पाहिजे कारण तसंच सळसळतं वातावरण घरात असायचं. त्यामुळे आजही अमुक एका गोष्टीचा समाजावर काय परिणाम होईल, हा विचार मनात प्रथम डोकावतो;–ती गोष्ट स्वत:च्या फायद्याची आहे की नाही हे डोक्यात येण्याच्या आधी!

आईच्या पाठोपाठ मीही स्काऊट चळवळीत प्रवेश केला आणि माझ्या

समाजभिमुख विचारांना आणखीच चालना मिळाली. स्वत:ला शक्य होते, तोपर्यंत सामाजिक चळवळीत भाग घेण्याचा प्रयत्न केला. गोव्याच्या मुक्तीसंग्रामात ती याच भावनेतून सामील झाली होती.आम्ही जेव्हा शनिवार पेठ सोडून पुण्याच्या सीमेवर राहावयास गेलो, तेव्हा सामाजिक चळवळीत असलेल्या लोकांचा संपर्क कमी होत गेला आणि साहित्य हेच आईचे प्रमुख क्षेत्र उरले.


गावाच्या मध्यभागात बालपण गेलेल्या मला, मोकळा निसर्ग, प्रशस्त मोकळ्या जागा, डोंगर आणि रस्ते या गोष्टी पारख्या होत्या. ज्या गोष्टी आपल्याला मिळत नाहीत, त्यांची तीव्र आस आपल्याला लागते.गावाबाहेर पडून केव्हा एकदा मोकळ्यावर येईन असं मला लहानपणी वाटायचं आणि आजही त्याच तीव्रतेने वाटतं.रम्य भूतकाळात शिरण्याची वृत्ती आणि भव्योदात्त निसर्गाची ओढ याचं एक विलक्षण मिश्रण होऊन मी घडविला गेलो.आईच्या हृदयातील काव्यमयतेचाच आविष्कार समजतो मी या गोष्टीला!

**प्रकाश गोळे**

१ब, अभिमानश्री सोसायटी, पुणे ८

## नवलमल फिरोदिया

'उद्योजकाचे घरी ऋद्धी –सिद्धी पाणी भरी! या विधानाची प्रचीती फिरोदिया यांच्या निवासस्थानी पाऊल ठेवताच येते. हे वैभव पिढ्यान् पिढ्या चालत आलेले असले तरी त्यात सतत भर घातली जात आहे.ते वृद्धिंगत करण्यासाठी व्यवहार्य मार्गाचा अवलंब केला जात आहे.



''हा मार्ग आखून दिला आमच्या बाबांनी. मी वेगळं काही केलं नाही.''असं प्रसिद्ध उद्योगपती नवलमल फिरोदिया यांचे उद्योजक पुत्र अभय फिरोदिया सांगत होते. पिताजींबद्दलचा आदरभाव स्वरातून सहज व्यक्त होत आहे, हे लक्षात येत होते.

वडिलांचा जीवनपट सांगतानाच त्यांनी आपण मोठे होत असताना त्यांच्या विचारशैलीचा,कार्याचा प्रभाव कसा पडला आणि त्यातून आपण कसे घडलो याचा तपशील अगदी बारीक सारीक उदाहरणांवरून

मांडला.ते त्यांच्या शब्दांत वाचूया!

‘‘बाबा आजमितीला ८६ वर्षाचे आहेत. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात अर्थात त्यांच्या तरूण वयात देशकार्याचे कंकण बांधले.१९३२च्या लढ्यात ते सहभागी झाले होते. त्यांनी चळवळीचे नेतृत्वही केले. याचा त्या काळात परिणाम व्हायचा तोच झाला. तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली.

देशहिताची गरज ओळखून १९४६ मध्ये वकिली सोडून बाबांनी उद्योगधंदा सुरू करण्याचा निर्णय घेतला. भारताची भरभराट होण्यासाटी येथे मोठमोठाले उद्योग सुरू होणे आवश्यक आहे, हे त्यांना प्रकर्षाने जाणवले, त्यामुळे उद्योगातूनच देश घडवायचा असा निर्धार करून त्या दिशेने त्यांनी वाटचाल सुरू केली.

या देशात स्कूटर, ऑटो-रिक्षा टेम्पो यांसारख्या स्वयंचलित वाहनांचा रस्त्यावर सुळसुळाट होईल असे कोणी १९४६मध्ये सांगितले असते तर त्या व्यक्तीला वेड्यात काढलं असतं. अशा परिस्थितीत परदेशातील सायकल रिक्षांचा अभ्यास करून त्या तयार करण्याचा उद्योग सुरू करण्याचा निर्णय बाबांनी घेतला. त्यासाठी भांडवल उभारणी, तंत्रज्ञान जुळवणी आणि कुशल कामगार तयार करणे या सर्व आघाड्यांवर ते अहोरात्र काम करू लागले. कोणतेही काम हाती घेतलं की ते पूर्ण होईपर्यंत चिकाटी सोडायची नाही, असा त्यांचा स्वभाव.त्यामुळे कारखाना उभारण्यात ते यशस्वी झाले आणि हळूहळू कामाचा व्याप वाढत गेला.

मी माझ्या बाबांना पाहिलं ते ‘उद्योजक’ या रूपातच. त्याआधीचे आंदोलनाचे नेतृत्व करणारे बाबा मला त्यांच्यात तोंडून आणि इतर स्नेह्यांच्याकडून समजले. शाळेत मला ‘डेडिकेशन’ या इंग्रजी शब्दांचा अर्थ ज्यावेळी समजला त्यावेळी माझ्या वडिलांची मूर्ती डोळ्यांसमोर आली. बाबांनी ज्यावेळी ‘ऑटो-रिक्षा’ बनविण्याच्या कारखान्यासाठी तत्कालीन ‘गव्हर्नमेंट ऑफ बाँबेकडे अर्ज केला त्यावेळी ‘ऑटो रिक्षा हा शब्दच शब्दकोशात नव्हता.ऑक्सफर्ड शब्दकोशाचा आधार घेऊन आपण तयार करणाऱ्या वाहनाला ऑटो रिक्षा म्हणता येईल हे त्यांनी सरकारला पटवून दिले. आज हा शब्दच का तर हे वाहनही आपल्या चांगल्याच परिचयाचे आहे! याचे श्रेय अर्थातच बाबांना जाते.

उद्योजक म्हणूनच फक्त आपलाच

व्यवसाय विस्तारायचा असा संकुचित विचार त्यांनी कधीच केला नाही. आपल्याबरोबर भाऊ, इतर नातेवाईक, स्नेही,कुशल कामगार यांनाही उद्योग उभारणीसाठी बाबांनी सर्वतोपरी मदत केली. परदेशातून नवीन तंत्रज्ञान आणून त्यांचे संपूर्णत: स्वदेशीकरण केले आणि हाच विचार त्यांनी आमच्यामध्ये रुजवला. १९५०ते १९६० हे दशक उद्योगाच्या दृष्टीने भरभराटीचे ठरले. आज विचार करताना, वडिलांनी उद्योग उभारताना प्रत्येक गोष्टीचा किती खोलवर, बारीकसारीक तपशिलांचा नीट अभ्यास केला होता याची जाणीव होते. व्यवसायाने वकील असतानाही त्यांनी उद्योगाचा केलेला सखोल अभ्यास स्तिमित करणारा आहे.

उद्योगधंद्यात कोणताही निर्णय ते सांगोपांग विचार करून घेत. 'यश-अपयश दोन्हीची तयारी ठेवली पाहिजे.'असे आम्हाला सांगत. पण शॉर्टकट घेण्याबद्दल त्यांचा सक्त विरोध असे. अपयशातून शिकत शिकत नावीन्याचा ध्यास हवा हा त्यांचा सतत आग्रह असे.

उद्योगधंद्याच्या प्रत्यक्ष कामातून बाबा आता सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांचा या क्षेत्राशी संबध राहिलेला नाही असे मात्र नाही. आपल्या ज्ञानाचा फायदा इतरांना व्हावा म्हणून आवश्यक तेथे मार्गदर्शन करून सल्ला देण्याचे कार्य ते करतात. त्यांचं वाचन दांडगं आहे. या वयातही रोजची सर्व वर्तमानपत्रं उद्योगविषयक मासिके वाचून आपल्या उद्योगाच्या दृष्टीने कोणता भाग आवश्यक आहे याचे सतत चिंतन ते करीत असतात. तसे आधुनिक काळाशी सुसंगत बदल सुचवितात. कामगारांचे हित कसे जपले जाईल याचा सारखा विचार करतात. सेवानिवृत्ती पत्करण्याआधीच बाबांनी काढलेले उद्गार मोठे सूचक आहेत.ते म्हणाले,''मुला, कारखाना चालूच राहील. त्यामुळे तुला पैसाही खूप मिळेल, पण केवळ पैसा मिळवणे हा एकच उद्देश ठेवून मी उद्योग उभारले नाहीत. व्यवहार्य आणि रास्त मार्गाने पैसा कमावता येतो. रास्त असेल त्याचा स्वीकार करून अयोग्य असेल त्याला सर्व ताकदीनिशी विरोध कर. हे करताना सचोटी, हातोटी आणि चिकाटी सोडू नको.''याच विचाराचा मागोवा घेत घेत आम्ही मोठे झालो, हे आत्ता मला समजून येते.

**अभय फिरोदिया**
सन्मित्र, बाणेर रोड, पुणे.
(मुलाखतीचे शब्दांकन - सुवर्णा जोशी)

## इंदिरा संत

सर्वसाधारण मुलांच्याप्रमाणेच मी माझ्या आईचं अस्तित्व आणि व्यक्तिमत्व अगदी लहानपणी गृहीत धरूनच चालतो असणार. कुणीही फक्त आपलं आपल्यासाठी आहे म्हटल्यावर थोडंफार असंच होत असणार. प्राथमिक शाळेत आल्यावर कविता म्हणण्याच्या आणि शिकण्याचा एक आता 'धुंद' वाटणारा काळ सुरू झाला.

कधीतरी आमच्या मास्तरांनी आम्हाला आईवरची कविता शिकवली. मुलाच्या कौतुकाने, आनंदाने ओसंडून जाणारी आई. मुलांच्या छोट्याछोट्या यशाने पिसाप्रमाणे अधांतरी तरंगणारी आई मुलांशी त्यांच्याच भल्यासाठीच त्याच्यावर रुसणारी, त्याच्यापाशी अबोला धरणारी, क्वचित त्याहीपेक्षा कठोर शिक्षा करणारी आणि नंतर ते सहजपणे विसरणारी आई. अशा अनेक प्रतिमा मास्तरांनी आम्हाला त्या कवितांमधून उभ्या करून दाखवल्या .


..हे गुंतले जिवाचे पायी तुझ्याच धागे
कर्तव्य माऊलीचे करण्यास येई वेगे..
रुसणार मी न आता जरि बोलशील रागे
ये रागवावयाही परि येई येई वेगे ..

अशा या ओळी आम्हा पोरापोरींच्या डोळ्यांतून पाणी काढत असायच्याच. पण कधी कधी संध्याकाळचा शेवटचा वगैरे तास असेल तर रडारडही व्हायची. तास संपल्यावर घरी जायची ओढ असली तरी पावलं जड झाल्यासारखी वाटायची. मास्तरांच्या शिकवण्याने माझ्यासारख्या मुलांच्या मनात असणारी आईची प्रतिमा झळाळून निघाली.

वर्गातल्या इतर मुलामुर्लीप्रमाणे मीही माझ्या आईकडे पाहायला लागलो.

माझ्या मित्रांच्या घरी मी जात होतो त्यांची घरं पाहात होतो. त्यांना प्रिय असणाऱ्या त्यांच्या आयाही पाहात होतो एक गोष्ट सगळ्या घरातून जशीच्या तशी होती. सगळ्यांच्याच आया प्रेमळ होत्या.

हे सगळं असलं तरी हळूहळू माझ्या घराचं वेगळेपण माझ्या लक्षात यायला लागलं होतं. इतर घरांच्या मानाने माझं घर स्वच्छ, नेहमी टापटीप, प्रसन्न आणि



सुगंधित आहे हे मला कळायला लागल्यापासून जाणवलं होतं. माझ्या घरात दिसणारा हा फरक जाणवल्यावर तो तसा का दिसत होता, तेही एक दिवस समजलं. घरावरून फिरणारा माझ्या आईचा हातच त्यामागे होता! त्याला आळस माहीत नव्हता आणि त्या हाताला एक सौंदर्यदृष्टी होती.त्यामुळे तो हात जिथे फिरला ते असं प्रसन्न दिसायला लागायचं.

घरासमोर एक छोटीशी बाग. बागेत मोजकीच झाडं, वेली वगैरे. कशाचाही फार पसारा नाही. आईच्या कवितांसारखंच! आईवडिलांचं भावजीवन एकमेकांत गुंतून गेले होते. त्यांचं-मित्रमैत्रिणीचं एक जग होतं. दोघंही कलासक्त, साहित्यिक, नाट्य, संगीत वगैरेंची दोघांनाही आवड. संध्याकाळी मोकळ्या हवेत फिरायला जायची दोघांनाही आवड होती.

१९४३ साली वडिलांनी पुण्याच्या रास्ता एज्युकेशन सोसायटीतील शिक्षकाची नोकरी सोडून बेळगावच्या मराठी ट्रेनिंग कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी धरली.आम्ही बेळगावला आलो.

लहानपणी आई बेळगावला काही काळ राहिलेली होती. तिचा माहेरचा पुढे विस्तीर्ण बाग असलेला एक सुबक बंगला बेळगावच्या ठळकवाडी या उपनगरात होता.

बेळगावचं वातावरण दोघांनाही मानवलं. त्यांचं लेखन बहरलं. नवं मित्र मंडळ जमलं. १९४६ साली वडिलांना प्राचार्यपद देण्यात आलं पण त्याच वर्षी जूनमध्ये त्यांचा विषमज्वराने मृत्यू झाला. सर्व अकस्मात झालं.

त्यानंतरचा काही काळ भावनिक कल्लोळाचा होता. मी त्यावेळी नऊ वर्षाचा असेन. त्यावेळी आईचं वय ३२ असेल.शिक्षण बी.ए.

परवापरवापर्यंतचा हसता, खेळता, फुलता संसार अचानक जडशीळ बेड्यांसारखा, पायात अडकल्यासारखा झाला. ते आनंदमय भावविश्व चुरगळून गेलं.

त्या जीवघेण्या काळात ती माडीवरच्या खोलीत एकटीच बसलेली असे. स्वभाव प्रखर स्वाभिमानी असल्याने तिने लवकरच स्वत:ला सावरलं. कविवर्य बा.भ. बोरकरच्या शब्दामुळे तिला वडील ज्या कॉलेजात नोकरी करत होते तिथेच प्राध्यापिकेची नोकरी मिळाली. तिथेच पुढे ती प्राचार्यपदावरून निवृत्त झाली. ते कॉलेज वडगावला म्हणजे आमच्या राहत्या घरापासून सुमारे दोन-अडीच मैल दूर असेल. बहुतेक सगळा रस्ता निर्जन माळावरून, लाल रंगाच्या रांगोळीचा पट्टा फिरवल्यासारखा गेलेला.दूर दिसणाऱ्या

*(पा क्र. १४७ वर पुढे चालू)*

**डोळस भटकंती**

# महाराष्ट्रातील किल्ले




**प्र. के. घाणेकर**


> **मध्ययुगीन काळातील भूराजनैतिक गरज म्हणजे किल्ले. या दुर्गकारणाच्या बळावर इथल्या भूमीपुत्रांना कसं आणि कशासाठी जगायचं याचा वस्तुपाठच दिला.**

मला भटकायला मनापासून आवडतं. दरवेळी काहीतरी नवं कारण काढून महिन्यात एकदोन वेळा तरी बाहेर पडल्याशिवाय तर मला चैनच पडत नाही. अशा छोट्या सहलींमध्ये किल्ल्यांवर जायला पहिलं प्राधान्य.

महाराष्ट्रात आहेत तसे आणि तितक्या वैविध्यतेचे किल्ले उभ्या जगात कुठेही नाहीत. जळगावपासून बेळगावपर्यंत नि चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या महाराष्ट्रात लहानमोठे सुमारे सात–आठशे किल्ले तरी आहेतच आहेत. कोकण, सह्याद्री अन् पश्चिम महाराष्ट्रातील किल्ले इतिहासाशी अधिक जवळीक साधून आहेत.या प्रदेशातील कोणत्याही डोंगर शिखरावर जाऊन उभं राहिलं अन् चहुकडे नजर फिरवली तर दर चार–दोन शिखरांआड



हे नुसते मातीचे डोंगर नव्हेत, ही तर स्वराज्याची स्फूर्तिस्थाने।



एखाद्या शिखराला तटबंदीचं शेलापागोटं चढवले गेलेले दिसते. या दुर्गांच्याच भरवशावर त्यांनी इथे, महाराष्ट्र देशी हिंदवी स्वराज्य स्थापन केलं आणि परकीय– आक्रमक– धर्मांध–जुलमी सत्ताधीशांना नामोहरम केलं. मध्ययुगीन काळातील भूराजनैतिक गरज म्हणजे किल्ले. या दुर्गकारणाच्या बळावर त्यांनी इथल्या भूमिपुत्रांना कसं आणि कशासाठी जगायचं याचा वस्तुपाठच दिला. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे समर्थपणे दुर्गकारण करणारे एकमेव राजे होते.

आज आपण एखाद्या किल्ल्यावर जायचं ठरवलं तर त्या किल्ल्याची यथास्थित माहिती पटकन मिळत नाही, त्या किल्ल्याच्या किमान पायथ्यापर्यंत तरी बारमाही वाहतूक अपेक्षित ठेवली तर तीही नसते. किल्ल्यावर गेलं तर पडके बुरूज, माना टाकलेल्या कमानी, ढासळलेली तटबंदी, ओहोटलेली नि शेवाळलेली टाकी, फारतर काही उद्ध्वस्त इमारतीचे थोडेफार अवशेष, यावेगळं काही दृष्टीस पडत नाही. त्यामुळे आपली दुर्गभेट निष्कारण वाया जाते.


शिवशाहीर बाबासाहेब तथा ब.मो.पुरंदरे, दुर्गमहर्षी अप्पासाहेब तथा गो.नी.दांडेकर, 'डोंगरयात्रा'कार आनंद पाळंदे ''ट्रेक द सह्याद्रीज'' लिहिणारे हरीश कापडिया आणि अशाच अनेकांनी अनेक किल्ले पाहिले. त्याबद्दल आपल्या दृष्टिकोनातून बरंच काही लिहून ठेवलं. त्याचा उपयोग आपण सर्वांनी करायला हवा, जिल्हा गॅझेटियर्स किंवा दार्शनिकांमध्येही ''प्लेसेस ऑफ इंटरेस्ट'' या १४व्या प्रकरणात त्या त्या जिल्ह्यातील किल्ल्यांबाबत बरीच माहिती दिलेली आहे.

एखादा किल्ला पहिला की अनेक प्रश्न आपल्याभोवती फेर धरून नाचू लागतात.हा किल्ला कोणी बांधला? नंतर कोणी फेररचना केली का?या सर्वांना पुरावे उपलब्ध आहेत का? किल्लारचनेमध्ये काही साम्यभेद आहे का? किल्ल्याची उंची किती? त्या विशिष्ट किल्ल्याचं वैशिष्ट्य काय? किल्ल्यांवरच्या टाक्यांमध्ये पाणी कसं जमा होतं? तट–बुरूज दरवाजे या व्यतिरिक्त चर्या–जिभी जंग्या–माची–बालेकिल्ला अशा अनेक शब्दांची नक्की व्याप्ती काय? कशाला उदेशून हे शब्द वापरले जातात? याची माहिती सहज मिळू

शकली नाही. ही अडचण लक्षात घेऊन मी ''अथाऽतो दुर्गजिज्ञासा''हे एक पुस्तक लिहिले. किल्ल्यांसंदर्भातील बरीच माहिती या पुस्तकात उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील शंभर किल्ल्याची माहिती देणारं ''साद सह्याद्रीची- भटकंती किल्ल्यांची'' हे पुस्तक आणि ८२सागरी किल्ल्यांची माहिती देणारं ''जलदुर्गाच्या सहवासात'' हे एक पुस्तक लोकांना बरंच उपयुक्त वाटलं त्यांच्या पुन्हा आवृत्त्या निघाल्या.

आव्हान, गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून, डोंगरयात्रा ही श्री. आनंद पाळंदे यांची तीन पुस्तके म्हणजे मराठी दुर्ग साहित्याचे अलंकारच आहेत. कै. प्रा.ग.ह.खरे यांचं दुर्ग, स्वराज्यातील तीन दुर्ग, सिंहगड, भोर संस्थानातील किल्ले, शनिवारवाडा अशी पुस्तके प्रमाणभूत मानली जातात.

महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येकानं एकदा तरी वाचलंच पाहिजे असं एक पुस्तक आहे. अतिशय व्यासंगी, चतुरस्त्र विद्वान अशा श्री.स.आ जोगळेकर यांनी प्रथम प्रसाद



मासिकातून लेखमाला लिहिली. पुढे ती १९५२ मध्ये ''सह्याद्री'' या नावाने ५०९ पृष्ठांच्या पुस्तकातून प्रसिद्ध झाली. त्यामध्ये ५५-१३३ पानांवर सह्याद्रीतील किल्ल्यांसंबधी मजकूर आहे. किल्लेविषयक काही कल्पना स्पष्ट व्हायला हा भाग अतिशय उपयुक्त ठरतो.एकूणच सह्याद्रीबद्दलच्या आपल्या कल्पना स्पष्ट व्हायला श्री. स.आ.जोगळेकरांचे ''सह्याद्री''अतिशय उपयुक्त ठरते. मध्यंतरी हे पुस्तक अप्राप्य झाले होते. आता ते नव्या रूपात पुन्हा उपलब्ध झाले आहे.

''महाराष्ट्र देशातील किल्ले भाग १व २''ही दोन पुस्तके म्हणजे किल्ल्यांच्या माहितीची गंगोत्रीच.चिंतामण गंगाधर गोगटे यांनी विसाव्या शतकाच्या सुरूवातीला ती प्रकाशित केली. आता ती सहज मिळू शकत नाहीत. त्यातील माहितीचा अपुरेपणा ध्यानी येऊन सुद्धा त्यांची उपयुक्तता वादातीत आहे.

'महाराष्ट्राची धारातीर्थे'-पंडित महादेवशास्त्री जोशी,'महाराजांच्या मुलखात'-श्री. विजय देशमुख, 'महाराष्ट्रातील किल्ले'-शं.रा.देवळे, ही पुस्तके वाचून किल्ल्यांच्या गौरवशाली इतिहासाची ओळख होते.एकेका किल्ल्याची माहिती देणारी पुस्तकेही काही कमी नाहीत. 'रायगडाची

जीवनकथा'शां.वि.आवळसकर,'किल्ले पुरंदर' कृष्णाजी भास्कर पुरंदरे, 'किल्ले विशाळगड'-शिरवळकर,'शिवतीर्थ राजगड' गो. नी. दांडेकर, दख्खनदौलत पन्हाळगड' आणि पन्हाळगड ते विशाळगड'ही मु. गो. गुळवणी यांची पुस्तके म्हणून त्या त्या किल्ल्यांबाबत कष्टपूर्वक सिद्ध केलेले दुर्गनवनीतच मानावे लागेल.''प्रतापगडाचे युद्ध''हे कॅप्टन मोडक यांचे पुस्तक आणि ''वसईची लढाई'' हे य.न.केळकर यांचे पुस्तक आवर्जून वाचायला हवे. याशिवाय अनेक लहानमोठी पुस्तके एकेका किल्ल्यासंबंधीही आहेतच.

रायगड किल्ल्यावरील वस्तूंची नावे ओळखण्यात व ती प्रचारात आणण्यात अनेक गफलती झाल्या आहेत. इतिहासातील पुरावे, वास्तूंचे स्वरूप यांचा अभ्यास करून ''तो'' रायगड ह्या पुस्तकाचे लिखाण केले. ते पुस्तक वाचून रायगडावरील नगरपेठेला आपण बाजारपेठ म्हणण्यात कशा चुका करतो ते लक्षात येते. रायगडावर सध्या ज्यांना राणीवसा म्हणतात, ती भांडारगृहे आहेत आणि अंधारी तळघरे म्हणजे खलबतखाना नसून जवाहिरखाना आहेत, तुरुंगाच्या कोठड्या म्हणजे धान्य साठवायच्या जागा आहेत हे सारं विस्तारानं सकारण प्रतिपादून वाचकाला अंतर्मुख करणारं ''तो''रायगड हे पुस्तक आहे. ते मुळातूनच वाचायला हवं.रायगडासारख्या महत्त्वाच्या किल्ल्याच्या बाबतीत तरी सगळ्याच गोष्टी नीट तपासून घेणं शक्यही आहे आणि अनिवार्यही.उगीच कोण्या गोऱ्या साहेबानं काही तरी म्हटलं आणि आपण सर्वांनी ते मान्य केलं हे काही योग्य नाही. खरं तर सगळ्याच किल्ल्यांच्या बाबत हे व्हायला हवं. ते जरी जमलं नाही, तरी एक पथदर्शक प्रकल्प म्हणून रायगडापुरता केलेला हा उद्योग आपण किमान वाचायला तरी हवाच.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संदर्भात इंग्लिशमध्येही बराच विश्वसनीय भाग उपलब्ध आहे. 'द डेक्कन फोर्टस्' हे जे.एन्.कमलापूर यांचं पुस्तक, महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र परिचय केंद्रानं प्रकाशित केलेलं 'शिवाजी -दि लास्ट फोर्ट आर्किटेक्ट' हे प्रा.रमेश देसाईचं पुस्तक, 'पिक्टोरियल शिवाजी' हे य.न.केळकरांचं पुस्तक, 'फोर्टस् ऑफ महाराष्ट्र' हे विवेकानंद केंद्र, मुंबई, याचं प्रकाशन ही काही पुस्तके यानिमित्तानं सुचविता येतील.

'फोर्टस् ऑफ इंडिया' हे व्हर्जिनिया फास यांचं रंगीत प्रकाशचित्रांनी भरलेलं पुस्तक, भारत सरकारच्या प्रकाशन विभागानं काढलेलं 'फोर्टस् ऑफ इंडिया'

हे अमृत वर्मा लिखित पुस्तक यामध्ये ऐतिहासिक चुकांचं प्रमाण जरा जास्त आहे. 'स्ट्राँग होल्डस् ऑफ इंडिया' आणि 'फॉर्टिफाइड सिटीज ऑफ इंडिया' ही सिडने टॉय यांची दोन पुस्तकंही न पाहून चालणारच नाही.

छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकात हा लेख आपण वाचत आहोत. दिवाळी आणि किल्ले यांचं एक अतुट नातं सगळ्यांना परिचित आहे.कोठून तरी दगड-धोंडे-माती आणायची ही नेहमीची गोष्ट. अलीकडे मात्र नकाशे- रेखाटने- फोटो यांच्या साहाय्याने किल्ल्यांच्या हुबेहुब प्रतिकृती करणं आणि अशा प्रतिकृतींच्या स्पर्धा भरवणं दिवाळीच्या निमित्तानं पुन्हा सुरू झालं आहे.

मी मात्र यापेक्षा थोडं वेगळं तुम्हाला सुचविणार आहे. अलीकडे ट्रेकिंगचं खूळ वाढत चाललं आहे. ट्रेकस्च्या निमित्ताने अनेकजण किल्ल्यांवर जातात. तेथील निसर्ग, साहसं, ऐतिहासिक स्थळं, श्रमदान अशा विविध पैलूंमधून या किल्ल्यांवर नकाशे-प्रकाशचित्रे यांच्या साहाय्याने लेख लिहिले जातात.आपल्या घरी येणाऱ्या वर्तमानपत्रांमधून, त्यांच्या रंगीत पुरवण्यामधून, लहान- मोठ्या साप्ताहिके, पाक्षिके किंवा मासिकांमधूनही किल्ल्यांसंबधी लेख किंवा लेखमाला प्रसिद्ध होत असतात. प्रत्यक्ष किल्ल्यांवर जाऊन, माहिती ताडून पाहून अभ्यासकांनी हे लेख लिहिलले असतात. त्या लेखाची कात्रणे काढून ठेवून ती किल्लावार, जिल्हावार व्यवस्थित चिकटवून लावून ठेवली तर पाहाता पाहाता काही वर्षांत तुमच्याकडे या रद्दीतील रत्नांमधून तयार झालेला दुर्गकोशच सिद्ध झालेला असेल. किल्ल्यांसंबधी येणाऱ्या बातम्यांचाही समावेश करता येईल. माझ्याकडे अशा किमान १ ।।-२ हजार कात्रणांच्या धारिण्या (फाईल्स) तयार आहेत. मला स्वत:ला नवे किल्ले पाहायला जाताना त्यांचा खूपच उपयोग होतो.

या लेखांमधून आलेली माहिती फारच क्वचित वेळा पुस्तकांमधून समाविष्ट झालेली आढळते. तुम्ही या दिवाळीपासून असा कात्रणसंग्रह करायला सुरूवात तर करून पाहा. या कात्रणांमधून निर्माण होणारा संग्रह हा तुमच्या घराचं भूषण ठरल्यावाचून राहणार नाही, हे नक्की.

याबाबत माझ्याकडून मदत-मार्गदर्शन लागलं तर तुम्ही माझ्याशी अवश्य संपर्क साधा. किल्ल्यांवर जाणं हे जसं महत्त्वाचं,तसंच त्यांची माहिती जमवून ती गरजूला त्वरेनं उपलब्ध करता येणं, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. ***

**प्रा.प्र.के. घाणेकर**
१०५, नारायण पेठ पुणे -३०

**कथा**

# डांबराच्या डोहातले प्राणसंकट



**विजय वि. देवधर**

''त्या दिवशी खेळण्यासाठी म्हणून बाहेर पडलेले आम्ही तिघंजण डांबराच्या डोहाकडे जाणार आहोत हे जर माझ्या आईला नि मावशीला कळलं असतं तर त्यांनी आम्हा तिघांनाही नक्कीच चांगलं फोडून काढलं असतं! त्या चित्तथरारक घटनेची हकिगत सांगताना बारा वर्षाचा जॉन रसेल म्हणतो, पण वास्तविक त्यात आमची खरोखरच काही चूक नव्हती. कारण आई, वडील,मावशी मोठी माणसं लहान मुलांना अमुक करू नकोस,तमुक करू नकोस असं म्हणून एकसारखं रागवत असतात. घरात खेळायचं नाही, दंगा करावयाचा नाही, बाहेरही जायचं नाही! मग आम्ही मुलांनी करायचं तरी काय?

छोटा जॉन त्या दिवशी आपल्या आईबरोबर टेक्सासमधल्या मावशीच्या गावी आला होता. त्याच्या मावशीकडे त्या दिवशी तिची एक मैत्रिणही आपल्या दोन मुलांसह आली होती. अकरा वर्षाचा जेम्स आणि दहा वर्षाची त्याची धाकटी बहीण मार्गारेट. ती दोन्ही मुलं साधारण जॉन रसेलच्याच वयाची असल्यामुळे त्या तिघांचीही लगेच चांगली गट्टी जमली. आणि झालं! मावशीच्या घरात त्या तिघांनी दंगामस्ती करण्यास सुरूवात केली. त्यांच्या धांगडधिंग्याला वैतागून जॉन रसेलच्या आईनं आणि मावशीनं त्यांना घराबाहेर पिटाळलं.

''पाठीमागच्या मैदानात जा आणि तिथं हवं तेवढं हुंदडा!''जॉनची मावशी त्याला म्हणाली ''मात्र फार लांब जाऊ नका बरं का !''

घराबाहेर हकालपट्टी झाल्यामुळे तीनही मुलं वैतागली. कारण त्यांना मनसोक्त खेळायचं होतं. नेहमीपेक्षा काहीतरी वेगळा खेळ खेळायचं त्यांनी

> **... आणि दुसऱ्याच क्षणी समोरच्या चढावरून धावत जॉन त्या टेकाडाच्या माथ्यावर पोहोचला. डांबरामध्ये लडबडल्यामुळे त्याचे पाय जड झाले होते. पण त्या संकटसमयी त्याच्या अंगात कुठलं अवसान संचारलं कुणास ठाऊक?**

ठरवलं. घराच्या पाठीमागे काही अंतरावर विटा बनविण्याचा कारखाना होता.त्याच्याजवळच विटा तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मातीचे मोठे मोठे ढिगारे होते. या तीन मुलांनी आपला मोर्चा तिकडे वळवला. ते उन्हाळ्याचे दिवस असल्यानं बाहेर अक्षरश: ऊन रणरणत होतं. १९६२ सालातला तो उन्हाळा फारच कडक होता. थोडा वेळ खेळून झाल्यावर ती तिघं कारखान्याच्या बाजूला वाहात असलेल्या एका लहानश्या ओढ्याच्या काठावर गेली. त्या ओढ्याच्या थंडगार पाण्यात खेळायला मिळालं म्हणून ती तिघंही खूप खूष झाली.बराच वेळ त्या ओढ्याच्या पाण्यात खेळल्यानंतर ती तिघं त्यातून बाहेर पडली. ''एऽ! आपण त्या रेल्वे यार्डात जाऊन त्या वॅगन्स बघायच्या का ?''जॉननं जेम्स आणि मार्गारेट या दोघांना विचारलं.

त्यानं काढलेली ती टूम त्यांना आवडली आणि विटांच्या कारखान्यापाठीमागे असलेल्या मोकळ्या माळरानामधून धावत ती तिघं त्या रेल्वेसायडिंग यार्डाच्या दिशेनं निघाली. थोडा वेळ त्या यार्डामध्ये घालविल्यानंतर



जॉनची नजर यार्डाच्या पलीकडे सुमारे अर्ध्या मैलांवर असलेल्या एका लहानशा टेकाडावर गेली.

‘‘ए ऽ! आपण त्या छोट्या टेकडीवर जाऊ या का?’’त्यानं आपल्या सवंगड्याना विचारलं.

‘‘चालेल! त्या टेकडीवरून आपल्याला आजूबाजूचा सगळा भाग बघायला मिळेल. चला जाऊया!’’जेम्स म्हणाला.

‘‘छान आयडिया! त्या टेकडीवर वारंही छान असेल.’’मार्गारेट म्हणाली.

आणि झालं! ती तिघंही त्या टेकाडाच्या दिशेनं धावत सुटली. काहीच मिनिटात ती त्याच्या पायथ्याशी पोचली. ते टेकाड चढून त्याच्या माथ्यावर पोहोचली तेव्हा तिघंही पार घामाघूम होऊन गेली होती.

म्हणून मग तिथं खाली बैठका मारून ती दम खाऊ लागली.त्या टेकाडावरून दूरपर्यंतचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात येत होता. दुपारची वेळ असल्यानं त्या एकाकी प्रदेशात कुणीही नव्हतं. चोहीकडे पार सामसूम होती. तेवढ्यात जॉनची नजर टेकडीच्या पिछाडीला गेली. टेकाडाच्या पलीकडच्या उतारावर त्याला काळ्या रंगाचं काहीतरी चमकताना दिसलं. उतार जिथे संपत होता तिथे टेकाडाच्या तळाशी सुमारे साठ फूट लांब व तीस फूट रूंदीचा एक भला मोठा लंबगोलाकार खळगा होता.तो भला मोठा खळगा टाकाऊ डांबरानं भरलेला होता. पण त्यातलं डांबर सुकलेलं असावं तसं दिसत होतं. कारण त्याच्या पृष्ठभागावर दाट काळपट सायीसारखा थर जमलेला होता. जॉन त्या उतारावरून खाली जाऊ लागला. उतारावर असलेल्या वाळलेल्या डांबराच्या पृष्ठभागावर त्याच्या बुटांचे ठसे उमटू लागले. ते पाहून त्याला गंमत वाटली. टेकाडच्या उतारावरून खाली जाताना पाहून जेम्स आणि मार्गारेट ही दोघं पण त्याच्या मागोमाग डांबरात आपल्या बुटांचे ठसे उमटवीत गेली. ती तिघंही टेकाडाच्या तळाशी असलेल्या डांबराच्या त्या डोहापाशी पोहोचली. समोर दिसणारा वाळलेल्या डांबराचा थर बघून जॉनच्या डोक्यात अचानक एक कल्पना चमकली.

‘‘ए! चला आपण यावरून धावत पलीकडे जाऊया! आपल्या बुटांचे ठसे उमटतील नि गंमत येईल. कोण सर्वात आधी पलीकडे पोहोचतो ते बघू!’’

असं म्हणून जॉन समोर धावत सुटला. जेम्स आणि मार्गारेट ही दोघंही कुठलाही विचार न करता त्याचं अनुकरण करत धावत सुटली. मार्गारेट अधिक चपळ असल्यामुळे जॉनला मागे टाकून

पुढे गेली. जेम्सही मार्गारेटच्या मागोमाग गेला. त्या दोघांच्या तुलनेत जॉन थोडा मागे राहिला.

सर्वांत पुढे गेलेली मार्गारेट त्या डोहाच्या मध्यावर गेली असेल नसेल तोच अकस्मात् एक विलक्षण प्रकार घडला! तिचे दोन्ही पाय एकदम खाली धसले! आणि अगदी अलगदपणे तिचा देह हळूहळू खाली खचू लागला! प्रखर उन्हामुळे नि हवेतल्या उष्म्यामुळे त्या ठिकाणाचं डांबर वितळलेलं होत! शिवाय त्या खळग्याच्या मध्यभागी खोलीही अधिक होती. त्यामुळे धावत तिथे पोहोचलेली मार्गारेट डांबराच्या त्या डोहामध्ये अलगद बुडत खाली जाऊ लागली. अन् अवघ्या काहीच क्षणांमध्ये ती कंबरेपर्यंत रूतली! जेम्स तिच्या मागे असल्यामुळे तो पण त्या ठिकाणी पोहोचताच डांबरात रूतला. वजनानं तो थोडा जड असल्यामुळे तो वेगानं खाली जाऊ लागला. मार्गारेटपासून तो फक्त तीन-चार फुटच मागे होता. जॉन सर्वात मागे होता तरी पण तो सुद्धा वितळलेल्या डांबराच्या क्षेत्रात पोहोचल्यामुळे त्याचेही दोन्ही पाय एकदम खाली घुसले. तोल सांभाळणाच्या प्रयत्नात असतानाच तो डांबरात पोटऱ्यापर्यंत रुतला नि हळूहळू खालीखाली जाऊ लागला. इतक्या वेगानं ती घटना घडली की एकमेकांना सावध करायला तिघांपैकी कुणालाही उसंत मिळाली नाही.

त्या अनपेक्षित प्रकारानं घाबरून गेलेल्या मार्गारेटनं एकदम मोठमोठ्यानं ओरडण्यास, रडण्यास सुरूवात केली. तिच्यामागे असलेला जेम्सही गांगरून मोठ्यानं ओरडू लागला. जॉनची घाबरगुंडी उडाली. मार्गारेटला मदत करण्यासाठी जेम्स धडपडू लागला.पण त्याच्या हालचालीमुळे दोघं आणखीनच खोल जाऊ लागली, त्या डांबराच्या डोहात बुडून आता मरणार या भीषण कल्पनेनं तिघंही कमालीची भयभीत होऊन गेली आणि मोठमोठ्यानं ओरडू लागली, ''वाचवा ऽऽ! आम्ही डांबरात अडकलो आहोतऽऽ!''

पण तो भाग अगदी निर्मनुष्य असल्याने आसपास कोणीही नव्हतं.त्यामुळे त्याच्या हाकांना कुणी प्रत्युत्तर दिलं नाही की कुणी त्यांच्या मदतीला आलं नाही. दुपारच्या या आडवेळी सभोवताच्या परिसरात चिटपाखरू देखील नव्हतं! कुणी मदतीला येत नाही हे पाहून ती तीनही मुलं आणखीच भेदरून गेली आणि जिवाच्या आकांतानं ओरडू लागली.वर रणरणतं उन आणि खाली गरम डांबर अशा विचित्र संकटात सापडल्यामुळे त्यांची अवस्था फारच बिकट होऊन गेली. जेम्स

आणि मार्गारेट यांच्या तुलनेत जॉन फार खोलात रुतला नव्हता. कारण तो त्यांच्यापेक्षा थोडा मागे होता. खाली रुतत जाणारे त्याचे पाय डांबरात गुडघ्यापर्यंत बुडाले आणि अकस्मात् त्याची पावले टणक पृष्ठभागावर टेकली!

तो त्या डांबराच्या डोहाच्या काठावर होता आणि सुदैवानं त्याच्या पायाखाली खडक लागला होता! त्या प्रचंड खळग्याच्या किनाऱ्यावर डांबराची खोली जास्त नव्हती.म्हणून त्याच्या खडकाळ पृष्ठभागावर अगदी नशिबानं त्याची पावलं टेकली होती! तो खडकाळ आधार मिळताच जॉननं जोर लावून आपला उजवा पाय डांबरातून उपसून बाहेर काढला. तो काही इंच मागे नेऊन



त्याच्या बळावर डांबरात रुतलेला आपला पाय सोडविण्यासाठी तो धडपडू लागला. सुदैवानं त्यात त्याला यश आलं! डांबराच्या लडबडलेल्या पायाच्या आधारानं तो इंचाइंचानं मागे मागे सरकू लागला आणि... आणि काहीच क्षणांत तो त्या डांबराच्या डोहाच्या काठावर पोहोचला.

सुरक्षित जागी पोहोचताच जेम्स आणि मार्गारेटला उद्देशून तो ओरडला, ‘‘घाबरू नका! मी मदत घेऊन येतो. तोवर अजिबात हालचाल न करता अगदी स्तब्ध राहा. नाहीतर तुम्ही डांबरात आणखीन खोल जाल.मी ताबडतोब मदत घेऊन येतोऽऽ’’

आणि दुसऱ्याच क्षणी समोरच्या चढावावरून धावत तो त्या टेकडाच्या माथ्यावर पोहोचला. डांबरामध्ये लडबडल्यामुळे त्याचे पाय जड झाले होते.पण त्या संकटसमयी त्याच्या अंगात कुठलं अवसान संचारलं कुणास ठाऊक! ते टेकाड उतरून तो खाली आला आणि पाय ओढत शक्य त्या वेगानं धावत सुटला पाहता पाहता त्यानं रेल्वे यार्ड ओलांडलं. त्या पलीकडल्या माळरानामधून पळत तो त्या विटांच्या कारखान्याच्या दिशेनं निघाला.उन्हामुळे घामानं तो ओलाचिंब होऊन गेला होता. काहीच मिनिटांत तो त्या कारखान्यापाशी

पोहोचला. डांबरानं माखलेला तो पोरगा पाहून तिथल्या कामागारांना आश्चर्य वाटलं. त्यांना उद्देशून जॉन मोठ्यांदा ओरडला, ‘‘रेल्वेयार्डाजवळच्या टेकाडापलीकडल्या डांबरांच्या डबक्यात दोन मुलं अडकली आहेत त्यांना बाहेर काढाऽऽ! धावाऽऽ! त्याच्या मदतीला जा! मी घरच्या लोकांना घेऊन येतोऽऽ’’.

धापा टाकत एवढं बोलून जॉन आपल्या मावशीच्या दिशेनं धूम पळत सुटला! विटांच्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं. हातातली काम टाकून ते सगळेजण त्या रेल्वे यार्डाच्या दिशेनं धावत निघाले.

इकडे डांबराच्या डोहात अडकलेल्या जेम्स आणि मार्गारेट या दोघांची अवस्था आता अधिकच वाईट झाली होती. दोघंही अजिबात हालचाल न करता अगदी स्तब्ध उभी राहिली होती. तरीपण शरीराच्या वजनामुळे अगदी मंदगतीनं ती खालच्या डांबरात रूतत चालली होती. ती आता जवळजवळ छातीपर्यंत डांबरात घुसली होती. दोघांनींही आपले हात वर उभे ताणून धरले होते.डांबराच्या पृष्ठभागावर असलेले त्यांचे देह आता घामानं अक्षरश:निथळत होते. मार्गारेटचा धीर एव्हाना खचत चालला होता आणि ती हमसून हमसून रडत होती. जेम्सही तसा लहानच होता. पण त्या संकटसमयी तो आपल्या धाकट्या बहिणीला धीर देऊ लागला, ‘‘मॅगी! रडू नकोस. जॉन घरी गेलाय! एवढ्यात तो मदत घेऊन येईलच. घाबरू नकोस. हालचाल करू नकोस. आपली यातनं नक्की सुटका होईल.’’

सरणारा प्रत्येक क्षण त्या मुलांना युगानुयुगासारखा वाटू लागला. जेम्सच्या मनात नाना तऱ्हेचे भयप्रद विचार येत होते. जॉन जर वेळेवर मदत घेऊन आला नाही तर? त्या लोकांना यायला उशीर झाला तर?..पुढलं भीषण चित्र त्याच्या नजरेसमोर उभं राहिलं आणि त्याचा देखील धीर खचू लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले आणि चेहऱ्यावरल्या घामात मिसळत खाली ठिबकू लागले.तेवढ्यात लांबून येत असलेल्या माणसांचा गलका त्याच्या कानावर पडला.तो जवळ जवळ येऊ लागला. ते आवाज ऐकताच तो ओरडला ‘‘मॅगी! तो बघ लोकांचा आवाज येतोय. बहुतेक ते इकडेच येत आहेत.’’आणखी काही मिनिटांतच लोकांचा कोलाहल पाठीमागे असलेल्या टेकाडावर आला. जेम्सनं मान वळवून मागे पाहिलं. तेव्हा त्या उंचवट्यावर

(पान क्र. १५९ वर पुढे चालू)

Count your life in smiles, not in sorrows.

**हस्तकला**

# बाटिक

**सौ. रेखा जोशी**





वस्त्र रंगवण्याची कला फार पूर्वीपासून माणसांना अवगत होती. बाटिक हा बांधणी पैकीच एक प्रकार आहे. बांधणीमध्ये ज्या ठिकाणी रंग लागायला नको असेल त्या ठिकाणी दोऱ्याने घट्ट बांधून ठेवतात. त्यामुळे त्या ठिकाणी रंग न लागता कापडाचा मूळ रंगच राहतो. बाटिकमध्ये ज्या ठिकाणी रंग नको असेल त्या ठिकाणी मेण लावले जाते. शिवाय नंतर या लावलेल्या मेणाला हाताने चुरगळून 'क्रॅक्स'(चिरा,भेगा) पाडल्या जातात. त्यामुळे त्या क्रॅक्समधूनही रंग आत जाऊन अतिशय मनोहारी डिझाईन्स तयार झालेली दिसून येतात. सुरवातीच्या काळात चित्रलिपीतील अक्षरे या पद्धतीने लिहिली जात.चित्रलिपी पूर्वेकडील देशात रूढ असल्याने या कलेचा उगम इंडोनेशियात झाला असावा असे वाटते. परंतु आपल्या इथे बंगालमध्ये या कलेचा विकास झाला व या कलेच्या कक्षा रुंदावल्या गेल्या. कापडाचा एखादा भाग मेणाने आच्छादून ते कापड विशिष्ट रंगाने सुशोभित करण्याच्या पद्धतीला बाटिक म्हणण्याचा प्रघात आहे.


बाटिक करण्यासाठी कोणतेही कृत्रिम (सिंथेटिक) निर्मित कापड चालत नाही तर सुती व रेशमी कापडांवरच हे काम करता येते.यासाठी जे मेण लागते ते ७०% पॅराफिन मेण +३०% मधमाशांचे मेण यांचे मिश्रण घ्यावे लागते. नव्याने काम करणाऱ्यांसाठी मेणबत्या वितळवून घेतल्या तरी चालते. कारण मेणबत्यांमध्ये जवळ जवळ असेच मिश्रण असते. मधमाशांचे मेण कापडावर चांगले बसते व पॅराफिन मेणामुळे 'क्रॅक्स'पडतात. 'क्रॅक्स हे बाटिकचे वैशिष्ट्य आहे.

या बाटिक डिझाईन्सच्या साड्या, पडदे,टेबलक्लॉथ, वॉलपिसेस, ओढण्या, चादरी, रुमाल, उशाचे अभ्रे इत्यादी करता येते.कापड जेवढे मोठे असेल तेवढी रंगवण्याची प्रक्रिया किचकट होत जाते. यासाठी हल्ली इंस्टंट बाटिकसाठी वेगळे रंग मिळतात. पूर्वी त्याला ॲक्रोफील म्हणत. आता 'केमोटिक रंग' या नावाने मिळतात. पुण्यात नू.म.वि शाळेजवळचे 'आर्ट सेंटर' किंवा हुजूरपागेसमोरचे 'व्हरायटी' स्टोअर्स इथेही हे रंग मिळतात.

पॅराफिन वॅक्स व मधमाशांचे मेण हे केमिकल्सच्या दुकानात मिळतात. ज्या कापडांवर बाटिक करावयाचे आहे ते कापड पाण्यात थोडा वेळ भिजवून मग धुवावे. म्हणजे त्यावरील खळ निघून जाईल व त्यावर रंग चांगले बसतील. धुऊन वाळलेले कापड इस्त्री करून मग वापरावे. प्रथम एका लहान पातेल्यात मेण चांगले वितळेपर्यंत गरम करावे व त्यापेक्षा मोठ्या पसरट पातेल्यात पाणी घेऊन त्यात २-३ इंच उंची इतके पाणी ठेऊन त्यात मेणाचे छोटे पातेले ठेवावे व पसरट पातेले वातीच्या स्टोव्हवर ठेवावे.पाण्याची पातळी कायम राखण्यासाठी त्यात वरचेवर पाणी घालावे. मेणाचे पातेले तसेच स्टोव्हवर ठेवून गरम करीत राहिल्यास मेण उकळून नंतर त्यातून धूर येऊ लागतो व मेण ब्रशने कापडाला







लावणे कठीण जाते. गरम मेण वरचेवर चमच्याने ढवळत राहावे.

आता आपण हातरूमालावर बाटिकचे डिझाईन कसे काढायचे ते पाहू. रुमालाच्या आकाराचे सुती पांढरे कापड, २ मेणबत्या त्या वितळवण्यासाठी लहान पातेले, बाटिकचा रंग १ग्रॅम, मीठ व धुण्याचा सोडा १-१चमचा, ९व १२नंबरचे ब्रश, एक चपटा ब्रश एवढे साहित्य गोळा करा. नवीन करणाऱ्यांसाठी सुरूवातीला समजतील अशा कमीत कमी रेषा काढाव्यात. प्रथम कापडावरील एक रंग व बाटिकचा एक रंग अशा एकच रंगाचा उपयोग करावा. थोडा सराव झाल्यावर दोन-तीन रंग कापडावर वापरता येतात.जास्त रंग वापरताना फिक्या रंगांकडून गर्द रंगाकडे जावे.म्हणजे उदा. पिवळा केशरी, तांबडा तपकिरी, काळा अशा क्रमाने जावे. मेण लावताना बाह्य रेषेप्रमाणे डिझाईन काढावे.ब्रशच्या रुंदीइतकी रेषेची जाडी असावी. एका जागेवर मेणाचा थर दोनदा देऊ नये. मेण

पूर्ण घट्ट झाल्यावर कापडाच्या मागच्या बाजूनेही डिझाईनला मेण लावावे. नाहीतर रंग मागच्या बाजूने कापडावर पसरून चित्र बिघडण्याची शक्यता असते. दोन्हीकडचे मेण घट्ट झाल्यावर कापड दोन्ही हातात धरून चुरगळवावे त्यामुळे त्यावर लावलेल्या मेणाला चिरा (भेगा) पडतील.

आता कापड प्रत्यक्ष रंगावयाचे कसे ते पाहू! रुमाल बुडेल इतके पाणी घेऊन त्यात १चहाचा चमचा मीठ व चिमूटभर धुण्याचा सोडा घालून ते गरम करून घ्यावे. एका लहान वाटीत १चमचा पाणी घेऊन त्यात पाव चमचा बाटिकचा रंग घालून पाण्यात घालून पाण्यात चांगले कालवून घ्यावे व तो रंग मीठ व सोड्याच्या पाण्यात घालावा. हे मिश्रण चांगले थंड होऊ घ्यावे. थंड झाल्यावर त्या पाण्यात मेण लावलेले कापड टाकावे. साधारण पाच मिनिटे ते तसेच पाण्यात राहून द्यावे.नंतर बाहेर काढून न पिळता सुकवत ठेवावे. कापड पूर्णपणे सुकल्यावर मेण काढावे.

**मेण काढणे:** वर्तमानपत्राच्या दोन कागदामध्ये मेण लावलेले कापड ठेऊन त्यावर गरम इस्त्री फिरवावी किंवा कापड पाण्यात टाकून उकळावे, म्हणजे कापडाला लागलेले मेण निघून जाईल.हे पाण्यात उतरलेले मेण नंतर पाणी थंड झाल्यावर घट्ट होईल.तेव्हा बाहेर काढून सुकवत ठेवावे. त्यातील पाणी पूर्ण सुकल्यावर हे मेण परत वापरता येऊ शकते.

मेण पूर्णपणे निघून गेल्यावर कापड सुकवून घ्यावे व नंतर इस्त्री करावी.

आकृतीत दाखविल्याप्रमाणे समजा आपण आपल्या रूमालावर चित्र काढले तर फुले सोडून बाकी सर्व भागाला मेण लावून घेणे. आतील गोलांच्या बाह्यरेषेवरही मेण लावणे. गुलाबी रंगाने पांढऱ्या कापडावर बाटिक केले तर फुले गुलाबी रंगाची होतील. आतील गोलाची बाह्यरेषा मेण लावल्यामुळे पांढऱ्या रंगाचीच राहील व उरलेल्या ज्या भागावर मेण लावले होते तो भाग पांढरा राहील व चुरगळल्यामुळे मुद्दाम केलेल्या क्रॅक्समधून गुलाबी रंग आत जाऊन पांढऱ्यावर गुलाबी रंगाची नक्षी तयार होईल व बाटिकचा सुंदर रूमाल तयार झालेला दिसेल.

छोटी व ढोबळ नक्षी वापरून वरील कृतीच्या आधारे हातरूमाल लहान आकाराचे वॉलपीस किंवा भेटकार्ड इ. गोष्टी तुम्ही सहज तयार करू शकाल.परंतु चादर, साडी, पडदा अशा मोठ्या कापडावर बाटिक करावयाचे झाल्यास ते बराच सराव केल्यानंतर किंवा कोणा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली केलेले जास्त चांगले.

भ भ भ

**सौ. रेखा जोशी,** अ-६, संगमश्री सोसा., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे २९.

कथा

# मोडकसरांचे डोळे

**सुधाकर प्रभु**



शाळेतील सामूहिक प्रार्थना संपवून मुले वर्गात पोहोचली होती. सातवी 'अ'ची मुलेही वर्गात पोहोचली होती. सातवी 'अ'चे वर्गशिक्षक मोठ्याने ओरडून कुणाला तरी दाखवत होते. मुख्याध्यापक गाडगीळ कार्यालयात येऊन कामाला लागले होते. पण राहून राहून त्यांचे अवधान कार्यालयाजवळचा वर्ग असल्याने सातवी 'अ'मधील मोडक सरांचे दटावणे भंग करत होते. मुख्याध्यापकांना फार वेळ वाट पाहावी लागली नाही. मोडक सर एका मुलाला पुढे ढकलून मुख्याध्यापकांच्या खोलीत शिरले.



**रामकृष्ण वागडे वगळता शाळेतील एकाही मुलाने हलगी वाजविण्याची इच्छा दाखवली नाही.तर मोडक सर हेडसरांना म्हणत होते, ''सर याच्या हातात हलगी देऊ नका... साऱ्या कार्यक्रमाचा फज्जा उडवेल तो!'...**

''सर, हा रामकृष्ण बगडे. माझ्या गणिताच्या पहिल्या तासाला हा दुसऱ्या मुलाचे इतिहासाचे गृहकार्य उतरून देत होता.''मोडक सरांनी आणलेली वही मुख्याध्याकांनी पाहिली. रामकृष्ण बगाडेने दुसऱ्या मुलाची इतिहासाच्या गृहकार्याची वही सुंदर हस्ताक्षरात लिहून काढली होती. त्याचे ते टपोरे मोत्याच्या दाण्यासारखे अक्षर,लिखाणातील परिच्छेद, मुख्य शीर्षक, शाईने अधोरेखित करण्याची पद्धत, सगळेच गाडगीळ सरांच्या मनात भरले होते.त्यांनी वहीची सुरूवातीची पाने पाहिली. ते गिचमिड अक्षर आणि आताची सुंदर अक्षरावली त्यांना परत मोहून टाकत होती. त्यांनी मोडक सरांना

वहीची ती पाने दाखवत म्हटले ''अहो किती सुंदर हस्ताक्षर आहे या मुलाचं, पाहा तरी.''

मोडक सरांनी चेहरा वेडावाकडा केला. त्यांना म्हणायचे होते जणू ''मी तुमच्याकडे काय तक्रार घेऊन आलोय आणि तुम्ही कुणाचं कसलं कौतुक करता?''गाडगीळांनी मोडक सरांकडे पाहिले. त्यांचे डोळे विलक्षण अंगार ओकत होते.

''अहो पण ...'' ते काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करू लागले. गाडगीळ सरांनी त्यांना थांबवत म्हटलं,''तुमची तक्रार माझ्या लक्षात आलीय. मी त्याला विचारतोच सगळं.तुम्ही जा वर्गावर, सगळा वर्ग खोळंबला असेल.गणिताचा तास बुडायला नको.''

मोडक सर मुख्याध्यापक गाडगीळांच्या कार्यालयातून थोडे नाराजीनेच बाहेर पडले असावेत. आपला राग त्यांनी बाहेरच्या सतीश कांबळे याच्या पायावर काढला.त्याला काहीतरी खेकसून बोलले व ते वर्गावर गेले.पण गाडगीळ सरांच्या ते गावीही नव्हते. ते अजूनही बगाडेचे हस्ताक्षर न्याहाळत होते. गाडगीळ सरांना आता रामकृष्ण बगाडे चक्क आठवला.

या मे महिन्यात त्यांनीच रामकृष्णला प्रवेश दिला होता, तोही थोडा गफलतीने. रामकृष्ण बगाडे सतत दोन वर्षे गणितात नापास होऊन या शाळेत आला होता. सातवीतल्या जागा भरून काढण्याच्या अट्टाहासात गाडगीळांनी त्याच्या प्रमाणपत्राकडे दुर्लक्ष करून प्रवेशपत्र त्याच्या वडिलांना दिले होते. प्रमाणपत्रातील दोनदा नापास या शेऱ्याखालील लाल रेघ तापळेल्या सळई सारखी त्यांच्या डोळ्यात नंतर शिरली. तेवढ्यात त्या मुलाचे–बगाडेचे वडील म्हणाले, ''साहेब, माझं दुकान आहे वाण सामानाचं. शाळेतून येताच हा कधी कधी दुकानावर बसतो. आज त्यानं गल्ल्यातील नोट उचलून समोर मटक्याच्या दुकानात लावली. माझ्या मुलाला समज यावी म्हणून तुमच्या शाळेत आणलाय. उद्या दुकानाचा मालक तोच होणार.त्याला थोडा समजदार होऊ द्या.**तुमच्याच शाळेत समजदार होईल तो.**''गाडगीळ सर थोड्या निरूपायनेच गप्प बसले. 'तुमच्याच शाळेत समजदार होईल तो' हे शब्द त्यांना सुखावून गेले.

गाडगीळांनी रामकृष्णाकडे पाहिले. काही विचारायच्या आत तो मुलगा म्हणाला ''वर्गात मला सर काय शिकवतात ते उमगतच नाही सर! मग मीच काहीतरी काम करीत बसतो.''
''काय करतोस तू गणिताच्या तासाला?''या गाडगीळ सरांच्या प्रश्नावर बगाडेने मान खाली घातली.गाडगीळसर

मात्र मनाशी म्हणाले, हा मुलगा अपराधी भावनेचं ओझं उरावर घेऊन वागतोय.याच्या हातून काही वाईट घडलं नसेल आणि हा तासाला बसून काही वाईटही करत नसेल.याच्या सुंदर अक्षरासारखं याचं मनही सुंदर असलं पाहिजे.बगाडेला समजावत त्यांनी वर्गावर पाठविले.कारण बाहेर कुणी पालक थांबल्याचे दिसत होते.

वार्षिक परीक्षेचा सातवी ‘अ’चा निकाल तक्ता गाडगीळ सरांच्या समोर आला. रामकृष्ण बगाडे गणितात भोपळा मिळवून बसला होता. मी त्याची गणिताची उत्तरपत्रिका मागविली.ती संपूर्ण कोरी होती.मोडक सरांनी ‘कोरा कागज कोराही रह गया’ ही काव्यपंक्ती लिहून आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती.

उन्हाळ्याची सुट्टी लागली. सुट्टीत रामकृष्ण वा त्याचे पालक भेटीला येतील असे वाटले होते पण तसे घडले नाही. सुट्टीनंतर शाळा सुरू झाली आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी मोडक सर बगाडेला घेऊन कार्यालयात आले त्याला समोर ढकलत ते म्हणाले, ‘‘सर हा दोन वर्ष नापास झालेला मुलगा. याला तुम्ही प्रवेश दिलात.गेल्या वर्षी त्याने काय दिवे लावलेत ते पाहिलंत. सर आम्ही रक्ताचं पाणी करतो आणि तुम्ही अशी मुलं शाळेत दाखल करता.’’

मोडक सर खूप बोलत होते, बडबडत होते. गाडगीळांना आठवलं.गेल्या वर्षी गणित सोडून बगाडे सर्व विषयांत उत्तीर्ण झाला होता.मोडक सरांनी त्यांची अन्य विषयांतील प्रगती समजून घेतली होती का? त्या मुलाची गरज वेगळीच होती असं गाडगीळ सरांना वाटत होतं. ती गरज बाल मनाला लागलेल्या प्रतिष्ठेची असावी. रामकृष्णाबद्दल ते खूपसं कष्टदायक आणि थोडसं विचार करायला लावणारं ऐकत होते.पण मोडक सर सोडून कुणी त्याला तिरस्कृत मात्र केले नव्हते.

त्या दिवशी राष्ट्रीय शिस्त योजनेचे गायकवाड कार्यालयात आले व विनम्रपणे गाडगीळ सरांना म्हणाले‘‘सर, एक अडचण आहे.’’

‘‘काय अडचण आहे गायकवाड? तुमच्या १५ ऑगस्टच्या प्रॅक्टीसला वेळ अपुरा पडतोय का? आपल्याला हा कार्यक्रम सुंदरच करायला हवा. स्वत: सदर्न कमांडचे सी.ओ. सपत्नीक उपस्थित राहाणार आहेत.’’मुख्याध्यापक म्हणाले.

‘‘आणि मला कार्यालयात ‘ड्यूटी’ लावलीय सर. भोसले साहेबांची भेट ठरलीय. मला पाच ऑगस्टपासूनच कार्यालयात जायचे आहे.’’गायवाड म्हणाले.

‘‘अहो मग हलगी वादनाचे काय

होणार? तुमचे लेझिमचे प्रात्यक्षिक हलगीवादनावर चालते ना? आज किती दिवस एखाद्या मुलाला हलगी वादन शिकवा असे मी म्हणतोय.''गाडगीळ थोडे करवादलेच.

''सर, माझं चुकलं, आता मुलांना मैदानात बोलवून घेता का? मी चाचणी घेतो.''

गाडगीळ सरांनी गायकवाड सरांच्या बोलण्यातील गरज ओळखली. घंटेचे दोन टोल दिले. याचा अर्थ सगळ्या मुलांनी मैदानावर यावे. सगळी मुले प्रार्थनास्थळावर आली. गाडगीळांनी गायकवाड सरांची अडचण मांडली. हलगी शिकावयास कोणीतरी पुढं यावं असं आवाहन केलं.विविध स्पर्धात चमकणारे विद्यार्थी समोर उभे होते. पण एकाही मुलानं हलगी वाजविण्याची इच्छा दाखवली नाही.खालच्या वर्गातील एकच हात वर आलेला दिसला. गाडगीळ सरांनी त्या मुलाला पुढं बोलवलं. तो रामकृष्ण बगाडे होता.रामकृष्ण बगाडेशिवाय या गोष्टीला कोणीच प्रतिसाद दिला नव्हता. रामकृष्ण बगाडे येताना पाहून मोडक सर धावतच गाडगीळ सरांकडे गेले. ''सर, या पोराच्या हातात हलगी देऊ नका. सगळ्या कार्यक्रमाचा फज्जा उडवेल तो.''‘फज्जा’ हा शब्द मोडक सरांचा आवडता शब्द होता.

गायकवाड सर म्हणाले, ''सर! बाकीच्या मुलांना वर्गात पाठवा. मी याची जरा परिक्षा घेतो.

पाचच मिनिटात गायकवाड सर कार्यालयात आले.ते म्हणाले ''सर, हलगीचा ठेका त्या मुलानं उत्तम पकडलाय.

मी याला तयार करतो सर.''

गायकवाड सर मोठ्या आत्मविश्वासाने बोलत होते.गाडगीळ सरांना उगीच वाटून गेलं. हा आत्मविश्वास गायकवाडांना कोणी दिला?

त्यानंतर रोज शाळा सुटल्यानंतर बगाडे हलगी वाजवू लागला. मध्ये दोन रविवारीही त्याने मनसोक्त हलगी वाजवल्याचे कळले. त्याच्या हलगीच्या ठेक्यावर मुले छान लेझिम खेळत होती. कधी नागमोडी चाल, कधी मोराची चाल असा पवित्रा घेत ही प्रात्यक्षिके चालत



होती.

पंधरा ऑगस्टचा दिवस उजाडला. पावसाची एक सर टपटपून गेली होती. मैदानावरील मातीवर छान शिडकावा झाला होता. पण पावसाळी हवेने हलगी उतरली होती. हलगीचे चामडे सरदले होते.मैदानाच्या एका कोपऱ्यात जाळ करून मुले हलगी शेकवत होती. एक दोन शिक्षकही तिथे डोकावताना दिसले. रामकृष्ण बगाडेला त्याचे वर्गमित्रच नाहीतर सगळी शाळाच शुभ चिंतित होती. त्याच्या हस्ताक्षरामुळे, त्याच्या दुसऱ्याच्या मदतीला धावण्याच्या गुणामुळे कदाचित् हा मित्रवर्ग त्याने जमविला असावा. लेझिमचे प्रात्यक्षिक अपेक्षेपेक्षा सुंदर झाले.बगाडेचा चेहरा किती आत्मविश्वासाने फुलला होता. तेव्हा पांढऱ्या गणवेशातील बगाडे मागे नागमोडी वळणाने कधी झुकत, कधी सापाच्या फण्यासारखी मान उंचावत, कधी एका पायावर नाचत आणि वर खाली होत मुले लेझिम खेळत होती. सगळी शाळा, मुले, शिक्षक, पाहुणे ते 'कवतिक'पाहात होती. सगळे आनंदले होते. मोडक सरांचे डोळे तर आगळेवेगळे स्नेहाळपण झिरपवत होते, होय मोडक सरांचेच डोळे!

कार्यक्रम संपला. टाळ्यांचा कडकडाट झाला. पाहुण्यांनी भाषणात रामकृष्णाची पाठ थोपटली.पाहुणे



सपत्नीक येणार म्हणून दोन गुच्छ आणले होते. त्यातला एक गुच्छ उपयोगात आला होता. मोडक सर दुसरा गुच्छ घेऊन धावतच माझ्याजवळ आले.''सर आज रामकृष्णनं कमाल केली.पाहुण्यांच्या हस्ते हा दुसरा गुच्छ त्याला देऊन त्याचा सन्मान करा सर.''

मोडक सरांच्या मनात असलेली सहृदय प्रवृत्ती जागी झाली होती. या त्याच्या मनातल्या देवाला जाग आणली होती रामकृष्णानं. त्याच्या हलगीच्या आवाजानं त्याने एका शिक्षकाच्या मनातील राम आज जागा केला होता.

भ भ भ

**सुधाकर प्रभु,** १फेअर रस्ता, एस्. एम्. जोशी हिंदी हायस्कूल, पुणे ४०

काळ जखम करतो, काळ फुंकर घालितो, काळ यातना देऊनी त्येचा इसर पाडीतो।

# सावली

*सूर्याचा हात धरून*
*सावली आली सकाळी*
*ऐसपैस पसरू लागली*
*होऊ लागली काळी-निळी*

*प्रत्येकाच्या पुढे पुढे*
*जाऊ लागली हवे तसे*
*अंगाभोवती बागडण्याचे*
*वेड लागले वेडेपिसे*

*लहान-मोठे, कोण कसे*
*कसला कसला विचार नाही*
*उजेडाचे वय काय...*
*विसरून गेली सावलीबाई*

*बोलणे बिलणे नकोच होते*
*कळत नव्हते काय हवंय...*
*पायामध्ये घोटाळण्याची*
*जडली होती फक्त सवय*

*कुठून आली कुठे जायचे*
*याचे तिला नव्हते भान*
*काळोख वाढत गेला तसा-*
*निघून गेला तिचा प्राण*

**डॉ. कल्याण इनामदार**
३९/२/२, अर्चना सोसा.ॐ-९७
एरंडवणे, पुणे ३८.

# वरदान आम्हाला दे ...

*वरदान आम्हाला दे,*
*भगवान*

*मातीतून हसण्याचे,*
*काट्यातून फुलण्याचे,*
*पदी मंगलमय मूर्तीच्या*
*तनु त्यागून जगण्याचे,*
*कुसुमासम तेजस्वी*
*बलिदान आम्हाला दे ... ॥१॥*

*नभ नील निरामय हो,*
*तम संकुल भीषण वा*
*दृढ ध्येयपथी चालण्याचे*
*करि वाण सतीचे हो*
*या कर्तृत्वाकांक्षी*
*ध्रुवस्थान आम्हाला दे... ॥२॥*


*मलयातील गंधित जे*
*श्वासांतून वाहू दे.*
*आषाढ घनांतील अमृत*
*हर हृदयी नाचू दे.*
*कलकल संजीवक*
*सरित्गान आम्हाला दे... ॥३॥*

*घन-गंभीर शिवालय असे*
*मन-गगन असीम हवे*
*गरूडासम आकांक्षांनी*
*भेदावे क्षितीज नवे*
*वरदान आम्हाला दे*
*भगवान...... ॥४॥*

**सुहासिनी अ. देशपांडे**
३,पुण्यश्री अपार्टमेंट, रस्ता क्र. ७,
डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे -२९

# एन्रॉनचा उदयास्त

विक्रम वाळिंबे



**गेले काही दिवस एन्रॉन हा शब्द वारंवार कानी पडत आहे. हे प्रकरण आहे तरी काय? नवीन सरकारने 'एन्रॉन करार रद्द केल्यामुळे भारतातील उद्योगधंद्यांवर काही परिणाम होऊ शकेल का? 'एन्रॉन'ला पर्यावरण प्रेमींचा का विरोध आहे? याविषयी माहिती देणारा लेख.**

मित्रांनो, अनेकदा आपल्या कानांवर असे कित्येक शब्द पडतात की त्यांचा अर्थ आपल्याला नीटसा माहीत नसतो. गंमत म्हणजे, आपणही तो समजून घेण्याचे फारसे प्रयत्न करत नाही. खरं ना?

उदाहरणार्थ गेल्या काही महिन्यामध्ये 'एन्रॉन' हा शब्द कित्येकदा आपल्या कानांवर पडला असेल. 'वादग्रस्त एन्रॉन करार रद्द झाला.' असंही आपल्यापैकी काही हुशार मित्रांच्या वाचनात आलं असेल. 'हे सगळं आहे तरी काय?' असा प्रश्न आपल्यापैकी कित्येक विचारी मित्रांना पडला असेल.

पडलाय ना?

मग चला तर. हा सगळा प्रकार नेमका काय आहे ते आपण नीट समजावून घेऊया.

आपण जी वीज वापरतो ती आपल्याला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (मराविमं) महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले मंडळ पुरविते. पण ह्या मंडळाला तरी वीज कुठे मिळते.

**वीजनिर्मिती क्षमता व गरज:** वीजनिर्मिती करणारी 'मराविमं'ची स्वत:ची काही केंद्रे आहेत. उदा पोफळी (जलविद्युत), एकलहरे, कोराडी, पारस (औष्णिक) इ. याखेरीज काही इतर खाजगी उत्पादकांकडून मराविमं वीज खरेदी करते आणि ती आपल्याला पुरवण्यात येते (उदा. BSES (डहाणू) NTPC (कावस), न्यूक्लीअर (काक्रापारा) ह्या सगळ्यांची मिळून महाराष्ट्रातली विद्युत् क्षमता सध्या ११,५८२ मेगावॉट इतकी आहे.

पण ही वीजनिर्मितीची क्षमता आपल्याला पुरत नाही. वाढते उद्योगधंदे आणि वाढती विजेची गरज लक्षात घेता इ.स.२००२ पर्यंत ही क्षमता आपल्याला २०५०० मेगावॅटपर्यंत वाढवावी लागणार आहे.

**वीजनिर्मितीचे खाजगीकरण:** ह्यासाठी राज्यात नवे विद्युत निर्मिती प्रकल्प

उभारावे लागतील. वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रचंड पैसा लागतो. एवढा पैसा राज्यसरकारकडे नाही आणि राज्याला तर विजेची अत्यंत गरज आहे. नाहीतर औद्यगिक विकास खोळंबेल, म्हणून खाजगी कंपन्यांना परवानगी देऊन ती त्यांच्याकडून वीज विकत घेऊन ती राज्यातील जनतेला पुरवायची असा निर्णय मराविमं आणि राज्यशासनाने घेतला.

**एन्रॉनचा उदय:** तुम्हाला हे माहीत असेलच की आपल्या देशाने आता खुले आर्थिक धोरण स्वीकारले आहे.म्हणजे परदेशातील उद्योजकांनाही यापुढे ह्या देशात येऊन खुलेपणाने आर्थिक गुंतवणूक करता येईल.उद्योगधंदे सुरू करता येतील. भारतामध्ये इतर उद्योगांबरोबरच वीजनिर्मितीसाठीही आपले प्रकल्प उभारण्यास अनेक परकीय बहुराष्ट्रीय कंपन्या, म्हणजे अनेक देशामध्ये आपले उद्योग चालवणाऱ्या कंपन्या उत्सुक आहेत. अमेरिकेची एन्रॉन पॉवर कॉर्पोरेशन ही अशीच एक कंपनी. ह्या कंपनीशी राज्यसरकारने चर्चा केली आणि वीजनिर्मिती करण्यासाठी तिला आमंत्रित केले.

**एन्रॉन करार:** महाराष्ट्रात रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर जवळच्या दाभोळ या गावी एन्रॉन कंपनीने वीज प्रकल्प उभारावा आहे असे ठरले. हा औष्णिक विद्युत प्रकल्प असणार होता. त्यासाठी पहिल्या टप्प्यात६९५ मेगावॉट वीजनिर्मितीची क्षमता गाठली जाणार होती आणि दुसऱ्या टप्प्यात १३२०मेगावॉट एवढी क्षमता गाठली जाणार होती. पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर आवश्यक वाटल्यास दुसरा प्रकल्प रद्द करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे होते.पण या टप्प्याबाबत मात्र निश्चित करार झाला होता आणि तो पाळण्यात मराविमंकडून काही कसूर झाली तर एन्रॉनचे जे नुकसान होईल ते भरून देण्याची 'हमी' राज्यसरकारने दिली होती. एवढेच नव्हे तर राज्यसरकार जर नुकसान भरून देऊ शकले नाही तर केंद्रसरकार नुकसान भरपाई देईल अशी 'प्रतिहमी'केंद्रसरकारने दिली होती. ह्या कराराप्रमाणे एन्रॉनचं कामही वेगात चालू झाले. असे असतानाही महाराष्ट्रात नव्याने सत्तेवर आलेल्या युतीच्या सरकारने हा प्रकल्प पूर्णपणे रद्द केला. प्रकल्पाचे काम थांबवले.

नव्या सरकाराने असे का केले? प्रकल्प रद्द करण्याची काय गरज होती? असे प्रश्न आपल्या मनामध्ये निर्माण होतात. ह्या प्रश्नांची उत्तरं आपण आता पाहूयात!

**एन्रॉनवरील आक्षेप :** हा प्रकल्प होणार अशी कुणकुण लागल्यानासूनच ह्या प्रकल्पाला अनेकांकडून विरोध सुरू झालेला होता. हा करार केल्यावरही ह्या प्रकल्पाविषयीचा वाद वाढत गेला.

या प्रकल्पाला सगळ्यात पहिला आक्षेप

असा घेतला गेला की प्रकल्पासाठी सरकारजवळ भांडवल नसलं तरी एकदम परकीय कंपनीच कशाला हवी? भारतातील एखादी कंपनी का नको? भारतातील भारत हेवी इलेक्ट्रिकल कंपनीने (भेल) असा प्रकल्प उभारण्याची तयारी दाखवली होती.

दुसरं म्हणजे एन्रॉनशी करार करत असताना दुसरी एखादी कंपनी एन्रॉनपेक्षा कमी खर्चात वीजप्रकल्प उभारून स्वस्तात वीजपुरवठा करायला तयार आहे की नाही हे सरकारनं पाहिलंच नव्हतं, त्यामुळे एन्रॉनने हा प्रकल्प बनवणं खूपच महागाचं आहे, खर्चाचं आहे असं भासवलं आणि प्रकल्पाच्या उभारणीसाठी प्रति मेगावॉटला ४ कोटी ३६ लाख रूपये खर्च होईल. असं सांगितलं म्हणून प्रतियुनिट विजेसाठी २ रूपये ४०पैसे एवढा दर मराविमंकडे मागितला. याउलट 'भेल'कंपनी हा प्रकल्प प्रतिमेगावॉट ३कोटी रुपयांत उभारण्यास तयार होती. त्यामुळे विजेचा दर मराविमंला कितीतरी स्वस्त पडला असता. त्यामुळे आपल्यासारख्या सामान्य ग्राहकांना वीज स्वस्तात मिळू शकली असती. सध्या आपण सरासरी प्रतियुनिट १.५० रु.ने वीज वापरतो. एन्रॉनकडून वीज घेतल्यास आपल्याला ही वीज ५ते ७।। रूपये एवढी महाग पडेल असं अनेक तज्ज्ञाचं मत होतं.

एवढंच नव्हे तर विजेची किंमत डॉलर्समध्ये द्यावी लागणार होती. त्यामुळे डॉलरचा भाव वाढला तर विजेचा भाव वाढण्याची भीती होतीच.आयात कराव्या लागणार असलेल्या द्रवरूप वायूचे भावही जर भडकले तर विजेची किंमत आणखीनच वाढेल अशीही भीती होतीच.

इतक्या अनेक आर्थिक बाबीबरोबरच पर्यावरणाचाही प्रश्न काही जणांनी उचलून धरला होता.प्रकल्पामुळे कोकणातल्या प्रदूषणविरहित भागामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होईल.कोकणातलं महत्त्वाचं आणि नाजूक पीक आंबा, हे यामुळे धोक्यात येईल. शिवाय ह्या प्रकल्पांमधून उष्ण पाणी समुद्रात सोडलं जाणार असल्यामुळे समुद्रातील जीवसृष्टी धोक्यात येईल, मासेमारीवर परिणाम होईल असा पर्यावरण वाद्यांचा आक्षेप होता.

**अखेर एन्रॉन रद्द :** अनंत त्रुटी असलेला हा करार एन्रॉन कंपनीबरोबर करताना राज्यसरकारातील काही जणांनी भ्रष्टाचार केला असल्याचा आरोपही अनेक संघटनांनी, राजकीय पक्षांनी केला होता. जनसामान्यांच्याही मनात ही शंका होतीच.

मार्च१९९५ मध्ये महाराष्ट्रात सत्तेवर आलेल्या युतीच्या सरकारने या सर्व गोष्टीचा विचार केला. सत्तेवर आल्यास एन्रॉन करार रद्द करण्याचं आश्वासनही युतीने निवडणुकीपूर्वी मतदारांना दिलं होतंच. ते पाळण्याचं काहीसं नैतिक बंधनही सरकारवर होतंच. तरीही जवळजवळ चार-साडेचार महिने ह्या कराराबाबत अनेक बाबींची चौकशी केली गेली आणि ३

ऑगस्टला हा करार रद्द करण्यात आल्याची घोषणा महाराष्ट्राच्या सध्याच्या मुख्यमंत्र्यानी केली.

करार रद्द झाला...पुढे काय?

अशा प्रकारे करार रद्द झाला खरा. पण एवढ्यावरच हे प्रकरण संपते का?...करार रद्द झाल्याचे आपल्या राज्यावर, देशावर काय परिणाम होऊ शकतील? याबाबत आपल्याला काय करता येईल? याही गोष्टीचा विचार आपण करायला हवा.

या प्रकल्पावर आजपर्यंत एन्रॉन कंपनीने केलेला खर्च वाया गेला आहे. ह्याबद्दल थोडीफार नव्हे तर तब्बल ९५० कोटी रुपयांची नुकसाभरपाई महाराष्ट्र सरकारकडे मागितली आहे. याउलट हा करार करत असतानाच कंपनीने दिशाभूल करणारी माहिती पुरवलेली आहे,कायद्यांचं उल्लंघन केलेलं आहे, त्यामुळे मूळ करारच बेकायदेशीर असल्याने कुठलीही नुकसानभरपाई दिली जाणार नाही असा महाराष्ट्र सरकारचा दावा आहे.खरोखरच नुकसानभरपाई द्यावी लागेल की नाही याचा अंदाज आत्ता बांधता येणे अवघड आहे. याबाबत खटला न्यायालयात चालून त्याचा निकाल लागल्याशिवाय काहीच खात्रीचे होणार नाही .

नुकसानभरपाई द्यावी लागणे या व्यतिरिक्त आपलं अन्य काही नुकसान होईल का? 'हे लोक केलेले करार मोडतात',असं समजून परकीय उद्योजक आपल्या देशात यापुढे त्यांचे पैसे गुंतवायला बिचकणार तर नाहीत ना? तसं झालं तर ते फार वाईट ठरेल. कारण आपल्या उद्योगधंद्याच्या विकासासाठी आपल्याला परकीय भांडवलाची खरोखरच गरज आहे. पण तसं होईल असं वाटत नाही. कारण उद्योजक हे धाडसी असतात. एखाद्या प्रकल्प रद्द झाला म्हणून ते सगळेच एकदम घाबरून जातील असं शक्य नाही. इथली बाजारपेठ मिळवण्याची, फायदा कमवण्याची आवश्यकता आहेच. त्यामुळे यापुढे अधिक सावधपणे, अधिक निर्दोष आणि संभाव्य त्रुटींबाबत पूर्ण विचार करून करार केले जातील अशी शक्यता आहे.

एन्रॉन कराराविषयीची प्रत्यक्ष माहिती, लोकांच्या उलटसुलट प्रतिक्रिया यांचा परिचय या लेखातून तुम्ही करून घेतलाय! त्याविषयीच्या वाटाघाटीही एन्रॉन कंपनी व राज्य सरकार यांच्यात होण्याची शक्यता आज निर्माण झाली आहे. त्याविषयीची माहिती आता तुम्ही डोळस नजरेने मिळवू शकाल असा विश्वास वाटतो. या निमित्ताने देशात घडणाऱ्या महत्त्वाच्या घडामोडींकडे जिज्ञासू, अभ्यासू नजरेने पाहण्याची सजगता आपल्यात यावी अशी इच्छा आहे. अशा एखाद्या प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास करून तुम्हीच असा अभ्यासपूर्ण लेख लिहून आमच्याकडे पाठवलात तर आनंद होईल.

***

**विक्रम वाळिंबे,** ११३/७,प्रभात रोड, १०वी गल्ली, पुणे –४

# पोथी

राजा मंगळवेढेकर



**ज्ञान हा एक असा खजिना आहे की देण्यानं रिता होत नाही, वाढतोच. माणसाचं प्रत्येक क्षणाला शिक्षण चालू असतं. लिहिण्या – वाचण्यापेक्षा ऐकणे आणि मनन करणे चांगले.**

एका आटपाटनगरात एक मोठा धनी–मानी गृहस्थ होता. त्याचा मोठा व्यापार होता. मोठी शेतीवाडी होती.मोठी सावकारीही होती. त्याचं नाव होतं एलेलशिंगन.त्याला एक मुलगा होता. लाडात वाढलेला, सुखात लोळलेला. जवान तरणाबांड तसाच खट्याळ,खोडकर अतिव्रात्य.

एकदा अशाच आपल्या चार टवाळखोर मित्रांबरोबर बाजारातून चालला होता. जाता जाता त्याची नजर एका विणकराकडे वळली. विणकर आपला माल घेऊन बसला होता. त्याची लांब दाढी आणि शांत मुद्रा पाहून कोणालाही तो एखाद्या महान संतासारखा वाटला असता. तो होताही संत प्रवृत्तीचा. त्याच्या पुढ्यात त्यानं विणलेल्या दोन साड्याही विक्रीकरता ठेवलेल्या होत्या.

खोडी काढण्याची शक्कल डोक्यात येऊन तो विणकराजवळ गेला. विणकर ओठावर हसू खेळवीत मधुर स्वरात म्हणाला,''ये मुला, काय पाहिजे तुला?''

युवक म्हणाला , ''मला ही साडी पाहिजे. काय किंमत आहे या साडीची?''

विणकराने सांगितलं, ''दोन रुपये.''

युवकाने साडी हातात घेतली आणि तिचे दोन तुकडे केले. म्हणाला, ''मला अर्धीच साडी पाहिजे, काय किंमत हिची? विणकरानं सागितलं, ''एक रुपया.''युवकाने त्या अर्ध्या साडीचेही दोन तुकडे केले. त्यातील एक तुकडा दाखवत विचारलं, ''याची काय किंमत?''

विणकरानं तितक्याच शांतपणे सागितलं, ''आठ आणे.''

युवक विणकराचं असं नुकसान करून त्याला डिवचू पाहात होता. अशा नुकसानीनं विणकर चिडेल, रागावेल अद्वातद्वा बोलेल मग त्याचं शांत संतपण उघडं पडेल अशी त्याची कल्पना होती.

युवकानं साडीचे तुकडे केले आणि एकेका तुकड्याची किंमत विणकराला विचारत राहिला.विणकरही एकेका तुकड्याची किंमत सांगत राहिला. त्यानं त्या युवकला अडवलं नाही की दाटलंही नाही. त्याची मुद्रा शांत शांत होती. ओठावर हसू होतं. डोळ्यांत स्नेह होता. बोलण्यात गोडी होती. तशीच्या तशीच!

साडीचे पुष्कळ तुकडे केल्यावर युवक त्याला म्हणाला,''हे तुकडे माझ्या कामाचे नाहीत. मी हे तुकडे खरेदी करू शकत नाही.''

विणकर त्याच शांतपणानं आणि मधुर वाणीनं म्हणाला, ''तुझं म्हणणं खरं आहे, मुला, या तुकड्यांचा आता कोणालाही उपयोग नाही.''खोडसाळपणानं साडीचे तुकडे तर केले पण विणकर शांत शांत! युवकाला स्वत:ची कीव आली. तो शरमिंदा झाला. विणकरानं त्याला थोडं जरी फटकारलं असतं तरी त्याला बरं वाटलं असतं.पण विणकरानं तसं काहीच केलं नाही. तो जसाच्या तसा शांत हसतमुखानं स्तब्ध राहिला. युवक मनातून खंतावून गेला.

मनाची खंत बुजविण्यासाठी तो विणकराला म्हणाला, ''ठीक आहे. मी पूर्ण साडीचा दाम तुला देतो. हे घे दोन रूपये.''

परंतु विणकरानं पैसे घेतले नाहीत. तो म्हणाला ''हे सगळे तुकडे मी काहीतरी करून जोडीन आणि वापरीन. हे तुकडे



घेऊन तू काय करणार? तुझ्या कामाचे हे जर नसतील तर त्याचा दाम मी तुझ्याकडून कसा घेऊ?''

युवक म्हणाला, ''माझ्याजवळ पुष्कळ पैसे आहेत. मला त्याची पर्वा नाही. तू गरीब आहेस. मी तुझी वस्तू खराब केली आहे.तुझं नुकसान मला भरून दिलंच पाहिजे.''

विणकरानं करूण स्वरात त्याला विचारलं, ''ह्या साडीचं तू केलेलं नुकसान भरून देऊ शकतोस, मुला?हे नुकसान पैशानं भरून निघेल असं तुला वाटतं काय? अरे शेकडो किसानांच्या कष्टातून कापूस निर्माण झाला.माझ्या घरवालीनं कापसातून सूत काढलं.मी ते सूत रंगवलं आणि मागावर विणलं. साडी तयार केली. ही साडी एखाद्या गृहिणीच्या अंगावर शोभेल, तिची लज्जा राखेल, तेव्हा आम्हा सर्वांचे कष्ट सफल होतील. कारणी लागतील. आम्हाला आनंद होईल. सुख मिळेल. पण तू तर या साडीचे तुकडे तुकडे करून टाकलेस. ही आता कोणाच्याच कामाची राहिली नाही. इतक्या लोकांचे कष्ट वाया गेले. चांदीच्या दोन तुकड्यांनी या कष्टांचे झालेले नुकसान भरून निघेल काय? तूच विचार कर,तुझ्याकडून मी कसे पैसे घेऊ?''

विणकराच्या वाणीत तिळभरसुद्धा कटुता नव्हती. एखादा पिता आपल्या पुत्राला जसे समजावून सांगतो तशाच जिव्हाळ्यानं विणकर बोलत होता.

त्याच्या या बोलण्यानं युवकाचं मन द्रवून गेलं. पाणी पाणी झालं. त्याचे डोळे भरून आले.त्याने चटकन विणकराचे पाय धरले. क्षमा मागितली.

विणकरानं त्याच्या पाठीवरून वात्सल्यानं हात फिरवला. त्याला जवळ घेऊन हृदयाशी धरलं. शांत मधुर स्वरात म्हणाला, ''बघ मुला, मी जर दोन रुपयांच्या मोहात पडलो असतो,तर तुझ्या आयुष्याचे देखील साडीसारखे तुकडे तुकडे झाले असते. अशीच दशा झाली असती. मग तू कोणाच्याही कामाचा राहिला नसतास, पण तुला आता समजलं आहे. तुझ्या हातून पुन्हा अशी चूक होणार नाही. सांभाळ.स्वत:ला आवर, जप. अरे एक साडी फाटली तर दुसरी विणता येते, पण आयुष्य खराब झालं तर दुसरं कोठून आणशील?''

शरमिंदा झालेला युवक घरी गेला. आपल्या पित्याला ही सगळी घटना त्याने सांगितली. ती ऐकून एलेलशिंगनला खूप बरं वाटलं. कारण त्याला आपल्या या व्रात्य मुलाची काळजीच वाटत होती. तो वाहवत चाललेला त्याला दिसत होता. पण त्याला आता तो रोखूही शकत नव्हता. अशावेळी विणकराच्या वाणीनं मुलात सुधारणा झाली

हे पाहून एलेलशिंगनला फार फार आनंद झाला. मुलाला घेऊन तो तात्काळ विणकराच्या भेटीस निघाला.पण तोवर विणकर तिथून निघून गेलेला होता.

एलेलशिंगनने आसपासच्या दुकानाजवळ चौकशी केली.

लोकांनी त्या विणकराचं नाव वल्लुवर आहे असं सांगितलं. वल्लुवर मोठा संत आहे, विद्वान आहे, कितीतरी भाषा त्याला अवगत आहेत आणि असे असूनसुद्धा तो साधासुधा, निगर्वी आहे, त्याच्याजवळ लवमात्र अहंकार नाही. तो सदैव शांत, हसतमुख असतो. कष्ट करून तो आपली भाकरी कमावतो, ती देखील भुकेपुरतीच, जरूरीपेक्षा अधिक नाही. तो सगळ्यांशी सारखेपणानं वागतो.त्याच्या लेखी उच्चनीच भाव नाही अशी लोकभावना होती. विचारत विचारत बापलेक वल्लुवरच्या घरी पोचले. बापलेक देवाच्या मंदिरात जावं अशा भावनेनं घरात गेले. वल्लुवर मागावर वस्त्र विणत होता.

बापलेक त्याच्याकडे पाहात राहिले. केवढी शांती! केवढा आनंद! केवढी तल्लीनता! एवढ्यात वल्लुवरची नजर बापलेकांकडे गेली. वल्लुवर लगेच उठला. त्यानं मुलाला ओळखलं त्याच्या पाठीवर प्रेमानं थोपटीत तो म्हणाला, ''ये मुला, इतक्या सकाळी कसा आलास? आणि हे कोण तुझे पिताजी वाटतं?''

मग थोडी विचारपूस झाल्यावर एलेलशिंगन वल्लुवरला म्हणाला, ''आपण माझ्या मुलावर कसली जादू केलीत कोणास ठाऊक? माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आपण याला शिकवून माणूस बनवावे. मी आपला जीवनभर ऋणी राहीन .''

वल्लुवर म्हणाला,''मला जे ठाऊक आहे, मी जे जाणतो ते याला मी समजावून सांगीन.''एलेलशिंगनला फार आनंद झाला. त्या दिवसापासून एलेलशिंगनचा मुलगा वल्लुवरचा विद्यार्थी, शिष्य बनला.

वल्लुवरची शिकवण्याची रीतही आगळीच होती. शिकवण्यासाठी तो पोथी उघडून बसत नसे. मुलाला सांगत असे,''लिहिण्या-वाचण्यापेक्षा ऐकणे मनन करणे काकणभर अधिक चांगले.''काम करताना, शेतातून हिंडताना. बाजार करताना हरक्षणी, शिक्षण चालूच असे. वल्लुवरचे जीवन म्हणजेच एक पोथी होती.

एके दिवशी दोघं शेतातून चालले होते. तेवढ्यात पावसाचे थेंब पडू लागले. वल्लुवर आनंदून गेला. गद्‌गदून म्हणाला,''या पावसाच्या थेंबांतून'' सरींतून हे जग जगते. हे पाणी नाही अमृताचे थेंब आहेत.



वल्लुवरनं 'कुरल' नावाच्या छंदात आपला ग्रंथ लिहिला. त्यामुळं त्याच्या ग्रंथालाही 'तिरूकुरल'असंच नाव पडलं. तिरूकुरचा अर्थ आहे 'पवित्र कुरल ग्रंथ.' आणि वल्लुवरला लोक 'तिरूवल्लुवर' म्हणजे संत 'वल्लुवर' म्हणू लागले.

तामिळनाडूमध्ये तिरूवल्लुवरला महान संत म्हणून आजही मानले जाते. आणि त्याच्या 'तिरूकुरल' ग्रंथाला 'तामिळवेद' असे संबोधले जाते. केवढा हा गौरव!

***

**राजा मंगळवेढेकर,**
९,अशोकवन, मॉडेल कॉलनी पुणे १६.

(पान क्र. ६४ वरून पुढे चालू)



जसजसे सूर्य मावळून अंधाराचे आगमन व्हायला लागे तशी सफीला अनावर झोप येई. मग थोर त्याला लहान मुलासारखे जोजवत, गात डेकवर बसून राही.

रात्र गडद व्हायला लागली की आकाशातल्या लक्ष लक्ष चांदण्या चमकू लागत. चंद्र माथ्यावर येई आणि दिवसभर सूर्यप्रकाश तळपणारे 'रा'चे शीड रात्रीच्या अंधारात सावलीसारखे भासू लागे. जणू नुकत्याच संपलेल्या भूतकाळाची आठवण मागे ठेवणारी सावली. अशा निशब्द रात्री थोरच्या मनात कोरून ठेवल्या जात.

एक आठवडा समुद्र अगदी शांत होता. सभोवती पसरलेल्या अथांग सागराच्या अंगावर लाटेची एक सुरकुती दिसेना. मधूनच शार्क माशाच्या शेपट्या तेवढ्या हवेत चमकून जायच्या. वादळापूर्वीचीच शांतता होती ती आणि घोंगावत रोंरावत वादळ आले. लाटा एकदम राक्षसी आकाराच्या झाल्या. महाकाय लाट वेगाने 'रा' च्या पोटाखाली शिरे बघता बघता 'रा'च्या मस्तकावर आरूढ होई. पुढच्या क्षणी ती लाट त्या नौकेला खोल गर्तेत भिरकावून देई.

डोक्यावर वारा थैमान घालत होता तर पायाशी लाटांचं तांडव नृत्य चाललं होतं. थोर आणि त्याचे सहकारी सुन्न होऊन बसले होते. मोहिमेचीच नव्हे तर जीवनाची इतिश्री होण्याची वेळ आली होती.वाऱ्याचा वेग तर इतका भयानक होता की शिडे फाटून त्यांच्या चिंध्याच होतील याची खात्रीच झाली होती.थोरने आज्ञा केली ती शिडे गुंडाळण्याची.भराभर शिडे गुंडाळली गेली. आता शिडाचा एकुलता एक आधार सुटला होता. एखाद्या प्रचंड तलावात तरंगणाऱ्या काड्यापेटीपेक्षा वाईट परिस्थिती 'रा' आणि तिच्यावरील मंडळींची झाली होती. सगळ्यांनी स्वत:च्या दोरीने मचव्याशी बांधून घेतले होते.नौकेत पाय ठेवायला कोरडी जागा नव्हती. खालचा सगळा भाग पाण्याने भरला होता.लाटेबरोबर पाणी गवतांमधल्या फटीतून आत शिरायचे आणि पुढच्या क्षणी धबधब्यासारखे बाहेर पडायचे.त्यातच एका रात्री संकटाची भर पडली. थोरकडे जागल्याची भूमिका होती. सुकाणू धरून थोर मेघांनी भरलेल्या आकाशाकडे बघत प्रार्थना करत होता. तोच प्रचंड स्फोटासारखा आवाज झाला. एका महाकाय लाटेने 'रा'वर आक्रमण केले होते आणि त्या लाटेच्या तडाख्याने 'रा'वरच्या वल्ह्याचे दोन तुकडे झाले होते.१०इंच व्यासाचा पंधरा- वीस फूट उंचीचा तो लाकडी खांब एखादी काडी मोडावी तसा मोडला होता. संपले सारे! ज्या वल्ह्यांच्या


मदतीने नौकेला दिशा द्यायची तेच तुटले होते. संकटामागून संकटे जशी येऊन आदळतात तसा त्यांना तोंड देण्याचा आत्मविश्वास दुर्दम्य होत जातो. सगळ्यांनीच कंबर कसली. मिळेल त्या साधनांनिशी दुरूस्ती सुरू झाली, पूर्वीपेक्षा लहान का होईना पण एक वल्हे तयार झाले. हळूहळू सागरात्माही शांत झाला.



परमेश्वराने त्यांची प्रार्थना ऐकली असावी. पॅपिरस रीडची पाणी शोषून घेण्याची क्षमता संपली असावी. हा सारा प्रकार घडला तेव्हा 'रा' अटलांटिक महासागराच्या मध्यावर होती. आफ्रिका व अमेरिकेचा किनारा दूर होता व जवळ बेटेही नव्हती.

वादळातून बाहेर पडून 'रा'चा प्रवास वेगाने सुरू झाला. तर दुसरे संकट कोसळले. अनेक दिवस ते संकट जाणवत होते पण त्याची भीषणता आता कळायला लागली होती. 'रा' पाण्यात लोटल्यापासून त्यातल्या गवताने पाणी शोषून घ्यायला सुरूवात केली होती. त्यामुळे 'रा'चे वजन वाढत चालले होते त्यामुळे ती पाण्यात बुडत चालली होती. हळूहळू तिच्या खालचा भाग जलमय झाला होता. कदाचित दोन- तीन दिवसात सारेच जहाज बुडते की काय अशी शंका सगळ्यांच्या मनात चमकून गेली. पण

जलसमाधीचा क्षण जवळ आला होता. मृत्यूने आपल्या अस्तित्वाची चुणूक थोर आणि कंपनीला दाखवून दिली होती. व्यापारी वाऱ्यांच्या पट्ट्यात 'रा' शिरली आणि तिला गती मिळाली. दिवसभरात साठ ते सत्तर नॉटिकल मैल (सुमारे १२०कि.मी) प्रवास होऊ लागला. वाऱ्याचा अधिकाअधिक फायदा घेण्यासाठी थोरने आपली शिडे पुढच्या बाजूला कलती करून घेतली. टाच मारताच भरधाव धावणाऱ्या घोड्यासारखा 'रा'चा प्रवास सुरू झाला. एके दिवशी मध्येच मुक्कामाला आलेल्या कबुतराने निरोप घेतला. ते सकाळी उडत गेले ते



परतलेच नाही. 'रा'वरच्या प्रवाशांना जमिनीची चाहूल लागली होती. अमेरिकेचा किनारा जवळ येत होता.

आणि एक दिवस 'युनो' चा झेंडा फडकवणारे एक जहाज 'रा'च्या जवळ आले. यशस्वी मोहिमेसाठी अभिनंदन करणारी शेकडो पत्रे तिने थोर आणि त्याच्या सहकाऱ्यांसाठी आणली होती.

संकटावर मात करीत प्राचीन नौकानयनावरचा आपला सिद्धांत 'थोर'आणि त्याच्या मित्रांनी सिद्ध केला होता.पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'सहवीर्य करावावहै:'चा मंत्र त्यांनी सिद्ध केला होता. नेहमीच सारे गुण्यागोविंदाने पार पडे असे नाही. कधी वाद होत, कडाक्याची भांडणे होत. संकटाच्या काळात चिडचिडेपणा वाढे. परस्परांवर दोषारोप होत. कधी स्वप्नांत एकमेकांशी भांडणे होत.ताणतणावात हे होणारच. परंतु ती काही सागरातली वादळे नसत. ती तर चहाच्या कपातील वादळे. त्या पलीकडचे उच्चतम ध्येय त्यांना गाठायचे होते. स्वीकारलेले आव्हान पूर्ण करायचे होते. अमेरिकेजवळच्या बार्बाडोसच्या किनाऱ्यावर पाय ठेवताना त्यांनी ते ध्येय गाठले होते, यात काडीमात्र शंका नाही.

***

**प्रा. विवेक पोंक्षे,** प्राचार्य ज्ञान प्रबोधिनी प्रशाला,
५१०,सदाशिव पेठ, पुणे-३०

## चिमुकली गॅलरी

**शि. द. फडणीस,** १२३३, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्रमांक ४, पुणे – २




**'चिमुकली गॅलरी' या नवीन चित्रसंग्रहातून**

(पान क्र. १०१ वरून पुढे चालू)

## माथा टेकवावा अशी पावले 'इंदिरा संत'

वडगावच्या झाडीत नाहीसा झालेला.

कॉलेज सकाळी. लवकर उठून आम्हा मुलांसाठी सर्व तजवीज करून ती जात असे.

रोज येता-जाता पाच मैलांचं चालणं सुरू झालं ते कायम नोकरीतून मुक्त होईपर्यंत. ऊन,पाऊस, वारा सर्व अंगावर घेत. तिच्याकडे उपजतच असलेल्या प्रखर प्रतिभेच्या देणगीत हा एरवी निर्जन वाटणारा रस्ता उजळून निघाला. तिच्या बऱ्याच कवितांचं बीजारोपण या रस्त्यावर झालं असं ती म्हणते. तिच्या अनेक कवितांत हा रस्ता डोकावतो. त्याच्या आसमंतातील निसर्गाचं प्रतिबिंब दिसतं. तिच्या एकंदरीत जीवनाच्या वाटचालीशी हा रस्ता जोडला गेल्यासारखा झाला किंवा खरं म्हणजे तो तिच्या जीवनाचं प्रतीकच असल्यासारखं मला तरी वाटतं.

तिच्या निवृत्तीनंतरच्या काळात माझ्या धाकट्या आर्किटेक्ट भावाने सुंदर देखणा बंगला बांधला, तो वडगावलाच आणि जिथे माझ्या आईची वाटचाल संपायची, त्या मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या शेजारीच.

संसाराची आणि त्यासाठी लागणाऱ्या अर्थार्जनाची जबाबदारी तिच्यावरच पडल्याने अपरिहार्यपणे आम्हा भावंडांवर काही लहान लहान जबाबदाऱ्या आल्याच. मी सर्वात मोठा असल्याने आई घरात नसेपर्यंत सबंध घराची जबाबदारी माझ्यावरच आली. घरातली बारीक सारीक कामं येणं आवश्यक बनलं. आपण आपलं स्वावलंबी व्हायला हवं ही शिकवण आईने दिली.

लहानपणापासून अनेक छंद होते. 'छांदिष्ट पोरगा' या प्रकारातलाच मी. या सगळ्यांना तिचं प्रोत्साहन होतं. लहानपणी गणपती समोर केलेली आरास असो की संगीताचं वेड असो, चित्रकलेचा महागडा छंद असो की नाटकात काम करणं असो, माझ्या सगळ्या छंदांना आई खतपाणी घालत असे.

मला शास्त्रीय संगीताची आवड लागल्यावर आई माझ्याबरोबर या बैठकीना येत असे. रात्री नऊ वाजता जाताना बसने. पहाटे कधीतरी येताना चालत. ती तीन मैलांची परतीची वाट कळलेल्या न कळलेल्या धुंद स्वरांनी आणि आकाशातील किनखापी स्वरांनी भरलेली असायची.

मॅट्रिक झाल्यावर लोकांच्या सल्ल्यांना नकार देऊन तिनं मला कॉलेजात पाठवलं नोकरीला जोडला नाही आणि कहर म्हणजे इंटरसायन्सनंतर बेळगावच्या कॉलेजात न पाठवता पुण्याच्या फर्ग्युसनमध्ये जायला सांगितले. माझ्या वडिलांचं आणि तिचं

मिळून फर्ग्युसनशी एक सुंदर नातं होतं ते झालंचं पुण्यासारख्या ठिकाणी राहिल्यावर आताच्या चालू भाषेत 'व्यक्तिमत्व विकास' होईल असा तिचा विचार होता.

खरंतर मला बेळगावलाच ठेवून घेणं सोपं आणि सोईचं होतं. पण तसं झालं नाही. कारण माझी आई हे व्यक्तिमत्वच वेगळं.

बी.एस्.सी.च्या फायनल परीक्षेला मी काही वैयक्तिक कारणांसाठी बसू शकलो नाही. तसं आईला सांगण्यात मला कोणतीही भिती वाटली नाही. ती फक्त म्हणाली ''काही हरकत नाही ऑक्टोबरला बस. तोपर्यंत अभ्यास कर.वाटल्यास काहीतरी नवं शिकून घे.नंतर सहा महिने नोकरी कर. मग परत पुढचं शिक्षण.''

असा समजदार सल्ला फारच थोड्या ज्येष्ठ चिरंजीवांना अशा परिस्थितीत त्यांच्या आईकडून मिळाला असेल. मी तसंच केलं. ऑक्टोबरमध्ये पास झाल्यावर एका खाणीवर जिऑलॉजिस्ट म्हणून काम केलं. त्या अनुभवाच्या जोरावर मला एम. एस्सी ला जाता आलं आणि माझं भवितव्य नियतीने नक्की केलं.

आता असं लक्षात आलं की शिक्षण संपेपर्यंतच्या काळापर्यंत तिनं प्रत्यक्ष कोणताही सल्ला कर्कशपणे न देता मला जी दिशा भावली, भावत होती ती हलक्याशा प्रकाशझोताने उजळून दाखवली.

मी १९५२पासून लेखन सुरू केलं. तिनं मला नेहमीच प्रोत्साहन दिलं.लेखन आवडलं तर का, व आवडलं नाही तरी का हे मात्र तिनं सांगितलं. प्रत्यक्ष काय लिहावं आणि काय नाही हे कधीच नाही. मी कविता लिहाव्यात हे तर कधीही सांगितलं नाही. तिनं म्हटलं असतं तर मी कवीही झालो असतो.पण हे बरंच झालं नाहीतर स्टेजवरच्या गर्दीत मांडी ठोकून कविता सादर कराव्या लागल्या असत्या.लंपनचं भावविश्व मग कुणी उलगडून दाखवलं असतं? ती स्वत: मला माझं लेखन वाचल्यावर म्हणाली, ''असं हे लेखन आतापर्यंत कुणी केलेलं नाही. हे लेखन तू करच. ते तुला नाव मिळवून देईल.''

शेवटी लंपनचं भावविश्व हा तिच्याही विश्वाचा भाग असल्याने या लेखनाच्या संदर्भातही तिनं नकळत हलकासा प्रकाशझोत टाकून तीही दिशा उजळून दाखवली नसेल कशावरून? ते तसं असणारच. कारण जे करायचं ते नकळत करायचं हा तिचा व्यक्तिविशेष आहेच.

माझी आई कोणीतरी मोठी आहे हे तिला भेटायला येणाऱ्या अनेकांच्या नम्र, आदरपूर्ण वागण्याने माझ्या लक्षात आलेलं

होतं, लहान असतानाच. पण तिचं मोठेपण नक्की सांगू शकणारं कोणतंही 'मीटर' माहीत नव्हतं. व्यक्ति म्हणून, कॉलेजची प्राचार्या म्हणून व प्रतिभावंत कवयित्री म्हणून असलेलं तिचं मोठेपण आम्हा भावंडाना इतरांच्याकडून समजत गेलं.

साधेपणा हा मोठ्या कलाकृतीचा, मोठ्या माणसांचाही स्थायीभाव असावा हेच वाटत राहतं.

वडिलांच्या मृत्यूनंतर तिनं आमचा विचार करून स्वत:ला लगेच सावरलंच. पुढच्या आयुष्यात तिनं या अपार वैयक्तिक दु:खाचं प्रदर्शन कधीच केलं नाही. वडिलांची आठवण मलाही येत असे, अजूनही येते. याचा परिणाम असा झाला की माझ्या आठवणीतील माझ्या वडिलांची प्रतिमा चिरतरुण हसरी, बोलकी, अशीच राहिली आहे. वैयक्तिकरित्या आईकडून मला मिळालेली ही पहिली देणगी.

दुसरी देणगी न देता आणि घेताच मिळालेली. तिच्याकडे असलेल्या त्या प्रतिभेचा एक स्फुलिंग!

मी आतापर्यंत जे थोडं फार लेखन केलेलं आहे त्याने तिला आनंद दिला असेल का? तिला ते तितकं आवडलं असेल का?

पण मला जे काही मिळालं त्याचा काही अंश तरी मीही दिल्याचा भास मन सुखावणारा वाटतो.

**प्रकाश नारायण संत**

२८३, बुधवार पेठ, 'अमलताश'

कऱ्हाड, जि. सातारा पिन ४१५११०


(या लेखातील छायाचित्रे 'केसरी'च्या सौजन्याने मिळाली आहेत.)


# झुलणारा, डोलणारा आकाशदिवा !!

**मंजुषा मुंगी**

दीपावली म्हणजे दीपोत्सव. दिवाळीत अनेकविध, कल्पकतेने तयार केलेले फटाके, फराळाचे पदार्थ, रांगोळ्या, कपडे यांचा आपण चोखंदळपणे आस्वाद घेत असतो. फुले,पाने वापरून बनविलेली सुंदर सुंदर शुभेच्छापत्रे आणि मनमोहक आकाशदिव्यांनी रस्ते फुलून गेलेले असतात.आपण नेहमीचे काहीतरी नवे आगळे वेगळे मिळविण्यासाठी धडपडत असतो. चला तर या दीपावलीत, एका सोप्या शास्त्रीय तत्त्वावर आधारित आकाशदिवा बनवू या.

या आकाशदिव्यासाठी तुम्हाला एक घर अथवा देऊळ अथवा किल्ला, मनोरा यापैकी एक काहीतरी बनवावयाचे आहे. हे घर, कार्डपेपर, थर्मोकोल, पुठ्ठा यापैकी कशाचेही चालेल.या घराच्या बाहेरील बाजूंवर शक्य असतील तेवढे छोटे छोटे गोल आरसे, टिकल्या बसवा. एक आयताकृती आकाराचा पुठ्ठा अथवा थर्मोकोलवर हे घर चिकटवा. ह्या आयताच्या रुंदीच्या बाजूला, दोऱ्याने, झोपाळ्यासारख्या कड्या करून हा आयत टांगा. ह्या आयताच्या तळाला एक पट्टी चुंबक चिकटवा. झोपाळ्याच्या दोन बाजूला, दोन पोकळ खांब करून त्यामध्ये विजेचे दिवे सोडावयाचे. खांबांवर, दिव्याच्या समोर जाळी अथवा पारदर्शक



रंगीत कागद लावा. त्यामुळे दिव्याचा प्रकाश आरशांवर पडेल. तळाला ज्या ठिकाणी पट्टी चुंबक बसविला आहे त्याच पातळीत खांबांवर प्रत्येकी एक पट्टी खालीलप्रमाणे बसवा.

| S N | N S | S N |
|---|---|---|
| **खांब** | **घराचा तळ** | **खांब** |

समान ध्रुवांमध्ये पराकर्षण असल्यामुळे हे घर झोके घेत राहील. कवडशाच्या चांदण्यांनी अंगण फुलून येईल दिवसाही सूर्यप्रकाशामुळे हे कवडसे आपल्याला आनंदाची साद घालत राहतील. अनेक आकाशदिव्यांची शोभा केवळ रात्रीच्या अंधारातच अनुभवता येते. परंतु आपण बनवलेल्या ह्या आकाशदिव्याच्या प्रभेचे विलोभनीय तेज रात्रीबरोबरच दिवसासुध्दा फाकते.

प्रयोगासाठी चुंबकाच्या आणखी काय रचना करता येतील?

आडवा चुंबक लावण्याऐवजी उभा लावला. बाजूला दोन चुंबक लावण्याऐवजी वर आणि खाली लावले. कंदील दोन कड्यांवर झोपाळ्यासारखा टांगण्याऐवजी एकाच स्प्रिंगवर टांगला तर उड्या मारणारा आकाशकंदील बनविता येईल का ?

खांब समोरासमोर (१८०°) न बसविता, काटकोनात किंवा २०°, ३०°चा कोन करून त्यामध्ये चुंबक बसवा.

आता आकाशदिवा अर्धगोलात गिरक्या मारू शकेल का? मारीत नसेल तर का नाही हे जरूर कळवा.

अजून एक अवघड प्रयोग करून पाहायला आवडेल?एका कार्डपेपरवर नक्षी कापून त्याचा दंडगोल तयार करा.

त्या दंडगोलापेक्षा लहान त्रिज्येचा अजून एक दंडगोल तयार करा.हे दोन्ही दंडगोल एकाच अक्षावर येतील असे पाहून, वरील बाजूने बंद करावयाचे.बाहेरील दंडगोल बांबूच्या काटकीच्या आधाराने स्थिर ठेवावा. आतील दंडगोल टाचणीच्या अथवा सुईच्या अग्रावर फिरू शकेल असा बसवा.आतील पृष्ठभागाच्या बाहेरील पृष्ठभागावर आणि बाहेरील दंडगोलाच्या आतील पृष्ठभागावर चकतीच्या आकाराचे चुंबक असे बसवा की आतील दंडगोल अक्षाभोवती गोल फिरत राहील. आतील दंडगोलावर आरसे बसवा. त्यावर प्रकाश पडल्यास, बाहेरच्या नक्षीच्या दंडगोलातून कवडसे पडतील. दोन्ही दंडगोल विरुद्ध दिशेने म्हणजे घड्याळाच्या दिशेने आणि एक घड्याळाच्या विरुद्ध दिशेने फिरेल अशी काही चुंबक रचना करता येईल का?

प्रयोग करून पाहा. आणि तुमचे अनुभव जरूर कळवा. झोपाळा सहजपणे झुलत नसेल तर प्रथम थोडासा तुम्हीच झुलवा.झोपाळ्यापासून दोन खांबाचे अंतर सारखे न ठेवता काय होतंय ते पाहा. हे आणि आणखी काय बदल तुम्हाला सुचताहेत ते समजून घ्यायला मी अगदी उत्सुक आहे बरं का? ***

**प्रा.मंजूषा मुंगी**– ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुण

## 'संजीवन'-केवळ रूग्णालय नव्हे तर एक ध्येयनिष्ठ प्रकल्प !

**न त्वहं कामये राज्यं! न स्वर्ग नापुनर्भवम् ।**
**कामये दु:खतप्तानां ।प्राणिनाम् आर्तिनाशनम् ।**

या प्रेरणेने काम करणारे ध्येयधुंद डॉक्टर्स एकत्र येतात आणि पुणे येथील संजीवन रुग्णालयासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभा राहतो. ''वैद्यकीय शास्त्र हे एक मानवी जीवनातील एक महत्त्वाचे अंग आहे. म्हणून ज्ञान प्रबोधिनीने या क्षेत्रातही हिरीरीने काम केले पाहिजे.''अशी ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक डॉ.पेंडसे यांची तीव्र इच्छा होती. तिला मूर्त रूप मिळाले १९९३ साली! ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्थेने संजीवन रुग्णालयाचे व्यवस्थापन स्वीकारले आणि या कामाला सुरूवात झाली.

ज्ञान प्रबोधिनीचे काही माजी विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट यश मिळवून डॉक्टर्स बनून बाहेर पडले: पण वैद्यकीय व्यवसायातील परिस्थिती, त्याला प्राप्त झालेले धंद्याचे स्वरूप त्यांना अस्वस्थ करत होते. डॉ.धनंजय केळकर, डॉ.सचिन गांधी, डॉ.गिरीश गोडबोले,डॉ. विनायक देसुरकर आणि असे अनेक जण दर आठवड्याला एकत्र जमत. आपल्याला ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल याची चर्चा करीत. लातूरचे डॉ.अशोक कुकडे आणि घटप्रभेचे डॉ.वैद्य यांसारख्या वैद्यकीय क्षेत्रात ध्येयनिष्ठेने काम करणाऱ्या मंडळींचे मार्गदर्शन त्यांना लाभले. या विचारविनिमयातूनच ९३ साली एक मेडिकल ट्रस्ट स्थापन करण्यात आला. आणि ज्ञान प्रबोधिनीने संजीवन रुग्णालयाचे व्यवस्थापन हाती घेतले.

रुग्णालय चालवताना काही विशिष्ट ध्येय-धोरणे ठरवण्यात आली. ती साकार करण्यासाठी अविरत काम सुरू झाले. अनेक सुदांनी वेगवेगळ्या स्वरूपात देणग्या देऊन मैत्रीपूर्ण मदतीचा हात पुढे केला. हे रूग्णालय चालवताना कोणत्या आकांक्षा मनात ठेवायच्या याचा विचार करण्यात आला. त्यांच्याकडे नजर टाकली असता या रुग्णालयाचे वेगळेपण लक्षात येईल.

१. येथील वैद्यकीय सेवा शास्त्रशुद्ध, नीतीसंपन्न असेल.

२. वेगवेगळ्या उपचारपद्धतींचा विचार करून सर्वकष एकात्मिक उपचारपद्धती विकसित केली जाईल.

३. डॉक्टरांचे रुग्णांशी सहजस्फूर्त जिव्हाळ्याचे नाते असेल.

४. येथील व्यवस्थापन सहृदय असेल. केवळ पैसा मिळवण्याचा धंदा म्हणून पाहिले जाणार नाही.

५.या रुग्णालयात जास्तीत जास्त अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल .

सध्या या रुग्णालयात क्ष- किरण यंत्र,अल्ट्रासाऊंड यंत्र, सुसज्ज पॅथोलॉजी प्रयोगशाळा, फिजिओथेरपी कक्ष, २ ऑपरेशन थिएटर्स

रुग्णालय परिक्षेत्रात राहणारे डॉक्टर्स मूत्ररोग , हृदयरोग, मज्जारोग व कर्करोग या शाखांमधील उपचारांची सोय, अर्भकांसाठी अतिदक्षता कक्ष इ. सुविधा

न उच्चारलेल्या शब्दावर आपली सत्ता असते. उच्चारलेल्या शब्दाची तुमच्यावर सत्ता चालते.

उपलब्ध आहेत. त्यात टप्प्याने भर पडत जाईल.

एकूणच समाजाचे आपण काही देणे लागतो ही जाणीव असणाऱ्या तरूण, तडफदार डॉक्टरांचा संच येथे काम करतो आहे. हा गट, कर्मचारी, रुग्णांचे नातेवाईक यांच्यासह आठवड्यातून एकदा उपासना करून आपल्या प्रेरणा बळकट करतो. वैद्यकीय कामांशिवाय अनेक प्रशासकीय कामे कुठलाही आर्थिक मोबदला न घेता हे तरूण डॉक्टर्स करत असतात.

विद्यार्थ्यांची शरीर संपदा उत्तम राहावी, त्यांना क्वचितच रुग्णालयाचा आधार घ्यायला लागावा या हेतूने हे डॉक्टर्स सध्या ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य प्रबोधनाच्या तासिका घेत असतात. छात्र प्रबोधनच्या सर्व सभासदांपर्यंत याबाबतचे ज्ञान पोहोचावे या हेतूने पुढील अंकापासून हे डॉक्टर्स आरोग्याबाबतची एक लेखमाला चालविणार आहेत. तिचा तुम्हा सर्वांना निश्चितच उपयोग होईल.

केवळ एका रुग्णालयाचा परिचय करून देणे हा या लेखाचा हेतू नाही तर तुम्हीसुध्दा जे क्षेत्र अभ्यासासाठी निवडाल त्यात निस्वार्थीपणे काम करून समाधान मिळवू शकाल अशी दिशा दाखवणे हे प्रयोजन आहे.

***

---

**संजीवन रुग्णालय,** प्लॉट क्र. २३
गरवारे महाविद्यालयाजवळ, कर्वे रोड पुणे ४
फोन ३४०३३८० ३४१४ ६५

*(पान क्र. ५० वरून* पुढे चालू)

नाही. गरीब कोकरू आहेत श्रीमंत!''

''पण मग मावशी, आपण काय करायचं?

''सध्या तू मी सांगेन तेवढं तर कर! मग बघू पुढं!''

मग त्या दिवसापासून किरात आपला चाचा सुमेरसिंग याच्या मागेमागेच जात राहिला. सुमेरसिंग म्हणाला, ''चाचा, मला आता तिथं गमत नाही. मी इथंच राहतो. तुमच्यासारखा शूर सरदार व्हायचंय मला. मला सारं शिकवाल?''

किरातनं आपल्या चाचाचा विश्वास संपादन केला होता.आता त्याला आनंदीबाईच्या महालात जाता येत होतं. तिथं तर त्याला अनेक गोष्टी कळत होत्या. लवकरच काहीतरी घडणार आहे न् काकासाहेब श्रीमंतांच्या गादीवर बसणार आहेत अशी कुणकुण त्याच्या कानी येत होती. त्यानं संधी मिळताच ही ऐकीव कुणकुण सखूबाईंच्या कानी घातली.सखूबाई घाबरून म्हणाली, ''पोरा, आताच कुठं बोलू नकोस. नाहीतर तुझी धडगत नाही. मात्र जागा राहा.श्रीमंतांना सावध तरी कसं न् कुणी करावं?आपल्या काकांच्यावर त्यांचा मोठा विश्वास!काकीसाहेब तर गंगूबाईसाहेबांच्यावर अगदी साखरपेरणी करीत असतात?

सखूबाईंच्या कानी घालून किरात परत आला.वाटेत त्याला नाना फडणवीस दिसले,नानांना दुरून पहाताच किरातनं त्यांना लवून नमस्कार केला. जवळ येताच त्यांचे पाय शिवले. त्याला पाठीवर थोपटीत नानांनी विचारले''एवढे दिवस कुठं होतास रे?दिसला नाहीस?''

''जी! मी चाचांकडे राहतोय!''

''का रे? श्रीमंत काही बोलले का?''

''जी! नाही, नाही. पण-!''

''काय सांग बघू. असा एकदम भेदरलास का?''

''जी सरकार तसं काय नाय!पण मला डर लागतो. रमामाँ सारख्या ख्व्वॉबमध्ये येतात.न् सांगतात, 'किरात जपून राहा. गंगूबाईला जप!''नाना हसले त्यांना वाटलं, पोर लहान आहे अजून. त्याच्या मनातली रमाबाईची आठवण बुजली नसेल.त्याला म्हणाले,''अरे स्वप्नच ते! घाबरू नकोस!''

नानांच्या पाठीकडे पाहात किरात मनात म्हणाला, 'काय वाटतं ते एकदाच सांगून टाकावं. स्पष्ट तर बोलता येत नाही, पण नाना समजतील.'

दिवसेंदिवस किरातच्या मनात आपला चाचा, राघोबादादा पेशवे आणि आनंदीबाईसाहेब यांच्याबद्दल

अधिकाअधिक संशय निर्माण होत होता.

आणि एक दिवस किरातला पक्कं समजलं आपला चाचा नारायणदादा पेशव्यांना धरणार आहे त्याचा एक सरदार चाच्याला सांगत होता,धरायचं कशाला, मारून टाकू! जहागीर मिळेल.'

ऐकलं न् किरातचं काळीज भीतीनं करपलं.काय वाटेल ते झालं तरी आपल्या चाचाकडून हे असं काम होऊ द्यायचं नाही असं कर्तारनं ठरवलं. तो सतत आपल्या चाचाच्या पातळीवर राहिला.

आणि तो दिवस उजाडला.त्यादिवशी सकाळपासून सुमेरसिंग आणि त्याच्या हाताखालच्या सरदार दरकदालची चालेली धावपळ,गडबड किरातच्या ध्यानी आली.त्यानं एक क्षणभरही चाचाला सोडलं नाही. दुपारचा प्रहर आला. मुदपाकखान्यातून नारायणराव पेशव्यांना थाळा गेला आणि पळभरातच सुमेरसिंग आणि त्याचे दोनचार साथीदार नंग्या समशेरी पारजत नारायणराव पेशव्याच्या महालाकडे निघालेलं किरातनं पाहिलं.त्यानं नुकतीच त्याच्या चाच्यानं दिलेली धारदार समशेर उचलली न् तो धावत त्याच्या मागे निघाला. त्याला पाहून सुमेरसिंग ओरडला, 'कर्तार तू मत आ, इधरही ठहरना.''

''नही चाचा, तुम मत जा! मैं तुझे नही जाने दूँगा.''एवढं म्हणून किरात थांबला



जे अत:करणातून निपजते तेच अत:करणाला जाऊन भिडते।

नाही तर त्यानं जाणाऱ्या एका साथीदाराच्या पायावर त्वेषाने वार केला.तो जोरात ओरडला आणि खाली पडला. किरातनं केलेला वार त्याच्या जिव्हारी लागला होता. तो पडलेला पाहताच दोघं मागे फिरले आणि त्यांनी सपासप वार केले.किरात रक्ताच्या थारोळ्यात पडला. ही गडबड ऐकून जिकडे-तिकडे धावपळ सुरू झाली.काय होतंय ते कळायच्या आत ते सारे नारायण पेशव्यांच्या महालापर्यंत पोचले.धावणाऱ्या पेशव्यांना त्यानं ओरडून सांगितलं.''घात श्रीमंत घात आहे.''

पण त्याचं ऐकण्याच्या मन:स्थितीत कुणीच नव्हतं. जो तो सैरावैरा धावत होता. सखूबाईही त्यात होती, तिनं किरातला त्या तशा अवस्थेत पाहिलं न ती मटकन् त्याच्याजवळ बसली.

किरातनं तिचा हात धरला, तो अडखळत बोलला,''मावशी मी मी हरलो, रमामाँ रागवतील!पण!''

किरातनं प्राण सोडला. सखूबाई त्याचं रक्तानं माखलेलं तोंड कुरवाळीत म्हणाली, ''नाही रे लेकरा? रमाबाईसाहेब तुझं कौतुकच करतील. तुला कुशीत घेतील!तू आता त्यांच्याजवळच राहशील!''

सखूबाईचं ते हंबरत बोलणं किरातनं ऐकलं की नाही कुणाच ठाऊक!पण त्याच्या ओठांवर हसू होतं!

***

**शैलजा राजे**, ३०८, सोमवार पेठ, पुणे -११

जाहिरात

*(पान क्र. ११६ वरून पुढे चालू)*

सुमारे तीस एक कामगार गोळा झालेले त्याला दिसले. त्यांनी ओरडून त्याला आणि मार्गारिटला धीर दिला. ''मुलांनो घाबरू नका. आम्ही तुम्हाला बाहेर काढू.''त्यांनी बरोबर दोर आणले होते. पण डांबराच्या त्या डोहाच्या मध्यभागी अडकलेल्या त्या मुलांपर्यंत पोचायचं कस? हा आता त्यांच्या पुढचा पेच होता. तेवढ्यात एका कामगाराच्या डोक्यात एक शक्कल आली. दोघा-तिघांना आपल्याबरोबर घेऊन तो जवळ असलेल्या रेल्वे यार्डाकडे धावला. हा सगळा गदारोळ चालू होता, त्याच सुमारास जॉन आपली आई, मावशी आणि तिची मैत्रीण या तिघींसह त्या ठिकाणी येऊन थडकला.आपली दोन्ही मुलं डांबराच्या डोहात जवळ जवळ खांद्यापर्यंत रूतलेली पाहून जेम्स आणि मार्गारिटची आई आक्रोश करू लागली. त्यांना सोडविण्यासाठी ती उतारावरून खाली धावली. पण पाय घसरून खाली पडली. दोघा कामगारांनी तिला उठवलं आणि धरून ठेवलं.

रेल्वे यार्डाकडे धावलेले कामगार लाकडाच्या तीन मोठ्या लांबलचक फळ्या घेऊन आले. डोहातल्या डांबराच्या पृष्ठभागावर त्यांनी अगोदर एक फळी टाकली. तिला दुसरी फळी जोडून पहिली फळी पुढे सरकवली. नंतर तिसऱ्या फळीनं त्या दोन्ही फळ्या त्यांनी आणखी पुढे सरकवल्या. सर्वांत पुढली फळी आता दोन्ही मुलांपर्यंत पोहोचली होती. मग किरकोळ शरीराचा एक कामगार गोल फास असलेले दोन दोर घेऊन त्या फळ्यांवरून सरपटत सरपटत जेम्स आणि मार्गारिटपर्यंत पोहोचला. त्या वेळेपर्यंत त्या दोघांच्या हनुवट्यापर्यंत डांबर आलं होत! मग त्यानं त्वरेनं दोरांचे फास त्या दोघांच्या खाकांमध्ये अडकवले. त्या दोरांची टोकं डोहाच्या काठाशी असलेल्या लोकांच्या हातात होती. त्यांनी मग जोर लावून दोर खेचण्यास सुरूवात केली. तशी डांबराच्या राज्यात अडलेली दोन्ही मुलं हळूहळू वर येऊ लागली. पाहता पाहता त्या दोघांचे देह पृष्ठभागावर आले. फळीवरल्या कामगारानं मग अगोदर जेम्सला आणि त्यानंतर मार्गारिटला क्रमाक्रमानं लाकडी फळीवर खेचलं. आणि मग काठावरल्या लोकांनी दोर खेचून त्या दोघांनाही हळूहळू किनाऱ्याकडे ओढून घेतलं.आणि अशा तऱ्हेनं एका मोठ्या प्राणसंकटातून त्यांची सुटका झाली. दोघांचेही देह डांबरात लडबडल्यामुळे काळेकुट्ट झाले होते. वितळलेल्या डांबरामध्ये इतका वेळ अडकूनही पोरं भाजली कशी नाहीत? तिथं जमलेल्या कामगारांनी त्याचं स्पष्टीकरण दिलं. टेकाडपलीकडला तो

प्रचंड खळगा ही एक मोठी कचराकुंडीच होती. रेल्वेच्या वॅगन्समध्ये सांडलेलं डांबर, रेल्वे यार्डातलं टाकाऊ मशीन ऑईल वंगणाचं तेल, ग्रीसचे गोळे, कॉटनवेस्टचे बोळे अशी विविध प्रकारची यंत्रसामुग्री त्या खळग्यात नेऊन फेकली जात असे. त्याबरोबरच मातीचीही त्यात भर पडे. पावसाळ्यामध्ये पावसाचं पाणीही त्यात साचे. या साऱ्याची डांबरयुक्त अशी रबडी तिथे तयार झाली होती आणि या दलदलीत ती तिन्ही मुलं फसली होती त्यांना बाहेर काढण्याच्या कामी मदत करणाऱ्या कामगारांनी मग त्यांना घरी पोहोचवलं. त्या कामगारांना भरघोस बक्षिसी देण्यात आली.

जेम्स आणि मार्गारेट या दोघांना




अक्षरश: रॉकेलनं आंघोळ घालावी लागली आणि त्याच्या अंगावरची राड घासून घासून स्वच्छ करावी लागली. जॉनच्या पायावरचं डांबर कमी वेळात साफ झालं. घाम येऊन शरीरातली रंध्रं मोकळी होण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यावरून मग तिघांना तीन-चार कप गरम चहा पाजण्यात आला. त्या घटनेबद्दल जॉन रसेल म्हणतो, ''अजूनही रस्त्यावरून जाताना जेव्हा डांबरांचा वास मला येतो  तेव्हा त्या प्रसंगाची आठवण होऊन माझ्या अंगावर काटा येतो. डांबराच्या त्या डोहामध्ये माझ्या पायांना खडकाचा आधार मिळाला नसता तर? मदत मिळविण्यासाठी थोडा जरी जास्त अवधी लागला असता तर? .. तर काय घडलं असतं या नुसत्या कल्पनेनंच मी नखशिखांत हादरून जातो. माझ्या मावशीनं आम्हाला  लांब न जाण्याविषयी बजावलं होतं. पण खेळाच्या नादात आम्ही नको त्या ठिकाणी पोहोचलो होतो नि पुढलं सगळं 'डांबरायण' घडलं होत. नशीब बलवत्तर म्हणून आम्ही त्या विचित्र संकटातून वाचलो. त्या अनुभवापासून एक गोष्ट मात्र माझ्या पक्की लक्षात आली आहे ती म्हणजे लहान मुलांनी नेहमी मोठ्यांचं ऐकावं हेच उत्तम.

***

**विजय देवधर,** ७/११०, कामदा कॉम्पलेस,
हिंदुस्थान बेकरीमागे, चिंचवड पुणे ३३

(पान क्र. ८ वरून पुढे चालू)
दिसतो.खग्रास ग्रहणकाळ संपून ज्या क्षणाला सूर्याचा पहिला किरण सावलीतून बाहेर येतो ते दृश्य एखाद्या हिऱ्याच्या अंगठीप्रमाणे (**डायमंड रिंग**) दिसते.भरदिवसा आकाशात ग्रह व तारे दिसू शकतात.मात्र त्याच्या भ्रमणमार्गाची माहिती हवी.एकूणच सूर्यग्रहण हा एक दुर्मिळ खगोलीय अविष्कार आहे.एकदा ज्या ठिकाणाहून खग्रास दिसते तेथून ते पुन्हा दिसण्यासाठी ३५०वर्षे जावी लागतात. तर मग मित्रहो,सुरक्षित माध्यमातून ग्रहण पाहून विज्ञाननिष्ठ बनणार की राहूकेतूंना घाबरून राहणार? किंवा किरणांचा विचार न करता 'नको रे बाबा, डोळे खराब झाले तर? ही

**सूर्यग्रहण पाहणार ना !**



**सूर्यकोरी ! रोळीतून घेतलेले कवडसे**

भीती कवटाळून बसणार? ठरवा.२४ ऑक्टोबर जवळ येतोय.

यातील छायाचित्रे श्री. प्रकाश जाधव व प्रा. प्र. के. घाणेकर यांच्या सौजन्याने छापली आहेत.

## ग्रहण काळातील निरीक्षण आणि प्रयोग स्पर्धा

'ग्राम विज्ञानमंच' या संस्थेतर्फे ही स्पर्धा आयोजित केली आहे.

'अ'गट (५वी ते ७ वी) आणि 'ब'गट (८वी ते १०वी)अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

ग्रहणकाळात तुम्ही केलेली निरीक्षणे,प्रयोग मराठी किंवा इंग्रजीतून १ते २ फुलस्केपवर लिहून पाठवावा. एकट्याला किंवा जास्तीत जास्त तीन जणांच्या गटाला एकत्रित प्रवेशिका पाठवता येईल.

कोणताही विषय निवडून निरीक्षण शास्त्रशुद्ध करावे आणि त्याची तपशीलवार माहिती लिहावी (विषय-केवळ उदाहरणासाठी देत आहोत-ग्रहणातील सूर्याचे,तापमानाचे पाळीव प्राण्यांचे किंवा पक्ष्यांचे, रूग्णांचे, फुलांचे, अंधश्रद्धांचे वनस्पती,अन्नपदार्थ यांचेही निरीक्षण करता येईल.)

आपल्या निरीक्षण लेखनामध्ये-किमान शब्दांत निरीक्षणाची माहिती, उद्देश, पद्धती, मांडणी,निष्कर्ष, अनुमान,अनुभव, निरीक्षणाचे स्थळ व वेळ ही माहिती येणे अपेक्षित आहे. आवश्यक तेथे आकृत्या,तक्ता, आलेख आदि काढावे.

**आपली निरीक्षणे पुढील पत्त्यावर पाठवा.**

१) श्री.सुयश डाके, द्वारा:ग्रामविकासमंच, २, बिल्वकिरण, कर्वे रोड, कोथरूड पुणे-२९.
२) छात्र प्रबोधन,ज्ञान प्रबोधिनी,५१०, सदाशिव पेठ पुणे - ३०

*(पान क्र. ३३ वरून पुढे चालू)*

जन्मात हा असा एकदाच इंजिनिअरी करण्यात पडलो होतो.आपण जे कोणी नाही, तेच आहोत असं जेव्हा एखाद्याला वाटायला लागतं,तेव्हा त्याला शरमेनं मान खाली घालण्याकरिता म्हणून एक देव टपूनच बसलेला असतो.अशी शास्त्रात एक गोष्ट आहे.त्या देवानंच त्या दिवशी माझ्या इंजिनिअरीवर नजर रोखली होती.तेव्हापासून यंत्राला हात लावणं बंद. फार कशाला? सतार, एसराज यांच्यासारख्या वाद्ययंत्रावरसुद्धा कधी तार चढवली नाही..

सतरावं वर्ष लागलं त्याचवेळी माझं विलायतेत जायचं नक्की झालं.शिकायची गरज ढिलीच होती.विद्यार्थिदशेतल्या खालच्या यत्तेतून आमची एकदा पाठवणी झाली होती डिक्रूझसाहेबांच्या 'बेंगाल ॲकॅडेमीत.आणखी काही झालं नाही तरी उपचार म्हणून बोलायचं. इंग्रजी खडखडीत होईल हीच होती आमच्या पालकांची आशा.लॅटिन शिकायच्या वर्गात मी होतो मुका बहिरा.सगळ्या अभ्यासाच्या वह्या विधवेच्या बिनकाठाच्या साडीसारख्या इथूनतिथून पांढऱ्याफटफटीत.माझा न शिकण्याचा अद्भुत हट्ट पाहून वर्गशिक्षकांनी डिक्रूझसाहेबाकडे तक्रार केली होती. डिक्रूझनी त्यांना समजावून दिलं होतं,की यांचा जन्मच अभ्यास करण्यासाठी झालेला नाही. दरमहा फी चुकती करण्यासाठीच या पृथ्वीवर ह्यांचा अवतार!

## पोरवय

ज्ञानबाबूंनीही आपल्या मनाशी बरंचसं असंच ठरवलं होतं.पण त्यातून त्यांनी एक वाट काढली होती.माझ्याकडून त्यांनी सुरवातीपासून शेवटपर्यंत पाठ करून घेतलं.'कुमारसंभव'खोलीत कोंडून ठेवून माझ्याकडून 'मॅक्‌बेथ'चं भाषांतर करून घेतलं. इकडे रामसर्वस्व गुरूजींनी शिकवून टाकलं 'शाकुंतल' वर्गातल्या अभ्यासाच्या बाहेरच मला सोडून दिलं होतं.पण त्याचं फळ मिळालं होतं. माझ्या पोरवयात मनाची घडण करणारा हाच मालमसाला होता.आणखी होती बंगाली पुस्तकं. वाट्टेल ती.त्यात निवडबिवड नव्हती.

विलायतेला जाऊन थडकलो.जीवन घडविण्याची विदेशी कारागिरी सुरू झाली. केमिस्ट्रीत ज्याला संमिश्र वस्तूनिर्मिती म्हणतात तशी.यात नशिबाचा खेळ असा पाहायला मिळतो,की गेलो पद्धतशीर काही शिकायला;खटपटही व्हायला लागली;पण झालं काहीच नाही.मधल्या वहिनी होत्या.त्याचा मुलगा-मुलगी होती.गुंतून पडलो आपल्या कुटुंबाच्या जाळ्यात.शाळेच्या आसपास इकडेतिकडे भटकायचो.घरी मास्तर शिकवायला यायचे.बुट्टी मारायचो.जे काही पदरात पाडून घेतलं असेल ते माणसाच्या जवळिकेतून मिळालेलं.विलायतेचं हवापाणी चोहींकडून मनावर संस्कार करायला लागलं.

पालितसाहेबांनी घरच्या पाशातून मला

मोकळं केलं.मी डॉक्टरच्या घरात बिऱ्हाड केलं.त्यांनी मला परदेशात असल्याचा विसर पाडला.मिसेस स्कॉट अगदी माझ्याशी ज्या स्नेहानं वागायच्या तो अगदी निर्मळ होता. माझ्याविषयी त्यांच्या मनात नेहमीच आईसारखी माया होती.मी त्यावेळी लंडन युनिव्हर्सिटीत भरती झालो.

हेन्री मोर्ली इंग्रजी साहित्य शिकवायचे.तो म्हणजे पाठ्यपुस्तकांतून उचललेला शुष्क माल नव्हता.साहित्य त्यांच्या मनातून,त्यांच्या गळ्यातल्या सुरातून जिवंत होऊन यायचं.जिथं प्राण्यांना स्वत:चा असा खुराक हवा असतो, त्या आमच्या मर्मस्थानी जाऊन ते शिक्षण पोहोचायचं.वाटेत रसहानी व्हायची नाही.घरी आल्यावर क्लॅरेंडन प्रेसच्या पुस्तकांतून अभ्यासाचा विषय उलटूनपालटून समजून घ्यायचो.म्हणजे स्वत:ची मास्तरकी करायचं काम स्वत:वरच घेतलं होतं.

मधूनमधून मिसेस स्कॉटला उगीचच वाटायचं,की माझा चेहरा सुकत चाललाय.त्यांची तारांबळ उडायची.त्यांना ठाऊक नव्हतं.की लहानपणापासून माझ्या शरीराचं आजारी पडायचं दार बंद होतं.रोज पहाटे वितळवलेल्या बर्फाच्या पाण्यानं आंघोळ करायचो.तेव्हाच्या डॉक्टरी मताप्रमाणं अशा प्रकारे नियम मोडूनही जिवंत राहणं हे जणू शास्त्राला धुडकावून वागल्यासारखं होतं.



युनिव्हर्सिटीत मला अवघे तीन महिने शिकता आलं.पण माझं परदेशातलं जवळजवळ सगळंच शिक्षण झालं ते माणसामाणसांशी जडलेल्या संबंधातून.आमचा कारागीर संधी सापडली की आपल्या निर्मितीत मिसळून देतो नवा नवा मालमसाला.तीन महिने सहृदय इंग्रजांच्या सहवासामुळं हे असलंच मिसळणं होऊन गेलं होतं.माझ्यावर जबाबदारी येऊन पडली होती.रोज संध्याकाळी,रात्री अकरा वाजेपर्यंत आळीपाळीनं काव्य,नाटक,इतिहास वाचून दाखवायची.ह्या थोडक्यात मुदतीत खूप वाचन होऊन गेलंय. ते वाचन म्हणजे वर्गातला अभ्यास नाही.साहित्याच्या संगतीसंगतीनं झालेलं माणसांचं मनोमीलन.

विलायतेला गेलो,बॅरिस्टर झालो नाही.जीवनाचा मूळ पाया हादरावा असा धक्का बसला नाही.स्वत:मधे पूर्वपश्चिमेची हातमिळवणी करून घेतली.माझ्या नावाचा अर्थ मला मनोमन उमगला.

(पु.ल.देशपांडे फाउंडेशनच्या सौजन्याने)

***

**पु.ल.देशपांडे,** १रूपाली,कमला नेहरू पार्कजवळ,पुणे -४

*(पान क्र. ७८ वरून पुढे चालू)*

पेटी मी पाहात्येय तेव्हापासून अशीच आहे.''

संदीप ते चित्र न्याहाळीत होता आणि कोण जाणे! त्याने सहज म्हणून चित्रातील कालियाची जीभ ओढली आणि काय आश्चर्य!

चित्राचे झाकण बाजूला खाली पडले.त्याचप्रमाणे त्याच्या मागल्या बाजूला एका पेटीच्या आकाराचा कप्पा दिसला. सानेकाकूंही आश्चर्यचकित झाल्या.कारण पेटीमध्ये एका पाकिटात कागद होते त्यावर लिहिले होते–

''हे पाकीट माझ्या मृत्युनंतर उघडावे'' खाली सानेकाकांची सही होती.

सानेकाकूंनी पाकीट उघडले.काकांनी केलेले मृत्यूपत्र होते ते. सानेकाकू म्हणाल्या–

''कमाल झाली ह्यांची. त्यांनी मला हे सांगितलं कसं नाही?''

''अगं सांगणार असतील. पण ते अचानकच नाही का गेले? त्यामुळे राहून गेले असणार.''

संदीप पळत घरी गेला आईबाबांना घेऊन आला. त्यांनाही आश्चर्य वाटले. सानेकाकूंनी मृत्युपत्र वाचायला दिले.त्यामध्ये स्पष्टच लिहिले होते–

''माझा पुतण्या श्रीधर अत्यंत मतलबी आहे.माझ्या पत्नीची तो देखभाल करणार नाही.या दृष्टीनेच मी हे पत्र सुरक्षित ठेवले



आहे.ते फक्त कुठे आहे ते माझ्या पत्नीलाच माहीत असेल.

''मला कुठलं माहिती आहे?''

''याचाच अर्थ काकांना तुम्हाला ते सांगायचे असणारच ना? हं पुढे वाचतो–

''माझी ही छोटीशी इस्टेट. माझी पत्नी हयात असेपर्यत उपभोग घेईल.नंतर ही वास्तू शाळेला देत आहे.गावात शाळा नाही. मुलांची शाळेची सोय करण्यात मला आनंद आहे.''

मृत्युपत्र वाचून काकूंना हायसे वाटले. श्रीधर दर महिन्याला येऊन कटकट करायचा ते बंद होणार.संदीपच्या बाबांनी एक चाणाक्षपणा केला. त्यांनी मूळ पत्राची कॉपी काढून तालुक्याच्या रजिस्टर ऑफिसमध्ये नेऊन ठेवली.पुतण्याच्या कानी मृत्युपत्राची गोष्ट गेली. तो आला. तणतणून परत गेला. आता त्याचे काहीच चालणार नव्हते.

संदीपच्या उचापतीमधून खरं म्हणजे मृत्युपत्राचा शोध लागला होता. त्या पेटूकलीमध्ये काहीतरी गुपित असणार हे संदीपला जे वाटत होते ते खरे ठरले.संदीपला जवळ घेत काकू म्हणाल्या, ''खरंच संदीप तुझ्यामुळे माझी काळजी मिटली राजा.'' संदीप हसला आणि काकूंना बिलगला.

***

**लीला दीक्षित,** ४ अनुवी अपार्टमेंटस्
डहाणूकर कॉलनी. कोथरूड पुणे २९.

आधुनिक तंत्रज्ञान

# ‘इ’- मेल

**आनंद राव**

एक काळ असा होता आपला निरोप दूरच्या व्यक्तीला पाठविण्यासाठी निरोप्या किंवा दूत पाठवावा लागे. कुत्रा, घोडा किंवा कबुतर यांसारख्या पशुपक्ष्यांनी मानवाला या कामी मोलाची मदत केली आहे.आधुनिक काळात टपालखात्याचा जन्म झाला व आपली मोठी सोय झाली. प्रगत होणाऱ्या तंत्रज्ञानाबरोबर तार, दूरभाष, फॅक्स...इ. ‘एक से बढकर एक’ सेवा दूर-संपर्क क्षेत्रात उपलब्ध होत गेल्या. आजही या क्षेत्रात संशोधन सुरू आहे- माणसाच्या धडपडीला काही अंत नाही !

आजच्या या विज्ञानयुगात संगणक आपल्या जीवनातील विविध क्षेत्रांत आपला अविभाज्य घटक बनत आहे. सुसज्ज प्रयोगशाळा बँका व अनेक वाणिज्यसंस्था,

कारखाने,मुद्रणालये, रूग्णालये या सर्वच ठिकाणी संगणकाने आपल्या जीवनात मोठ्ठीच सोय निर्माण केली आहे,शिवाय मानवी जीवनात अचूकता, उत्तमता यांचे आदर्श निर्माण केले आहेत.संगणकाने पाद्राकांत केलेली बहुविध क्षेत्रे पाहून, ठायी ठायी भक्तांच्या सेवेशी तत्पर असणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाचीच आठवण येते ना?अशा संगणकाचा उपयोग दूरसंपर्क क्षेत्रात न होईल तरच नवलच!

दूर-संदेश साधनाच्या प्रदीर्घ प्रवासात संगणकाच्या मदतीने गाठलेला सध्याचा टप्पा म्हणजे इ-मेल. काय आहे ही सेवा?

इ-मेल म्हणजेच इलेक्ट्रॉनिक मेल. ही आज उपलब्ध असलेली बहुधा सर्वात गतिमान, खात्रीशीर व किफायतशीर संदेशवहन सेवा आहे. यामध्ये आपण संगणकाचा वापर करतो.

आपण पाठविलेले पत्र पोस्टखात्यामार्फत आपल्या मित्राच्या गावाला जाते व तेथील पोस्टमन ते पत्र मित्राच्या घरातील पत्रपेटीत टाकतो. मग जेव्हा आपला मित्र पेटी उघडतो तेव्हा आपले पत्र त्याला मिळते. याचप्रमाणे आपण योग्य तो इ-मेल पत्ता लिहून आपल्या संगणकात आपले पत्र तयार ठेवतो. त्यानंतर ही आधुनिक संदेशवहन यंत्रणा दिवसभरातील त्यांच्या सोयीच्या वेळेला आपले पत्र उचलून काही क्षणात आपल्या मित्राच्या संगणकात नेऊन ठेवते. मग आपला मित्र जेव्हा त्याचा संगणक चालू करेल तेव्हा त्याला पत्र आल्याचे कळेल व तो ते संगणकावरच वाचू शकेल. अर्थात या सर्व प्रक्रियेत प्रत्यक्ष कागदाचा वापर कोठेच करावा लागत नाही!

संगणक आपला संदेश एका सांकेतिक भाषेत परिवर्तित करतो व मग एका प्रक्षेपक केंद्रातून विद्युतचुंबकीय लहरींच्या रूपात तो पाठवला जातो. या लहरी मग संदेशग्राहक केंद्राकडून पकडल्या जातात व पुन्हा संगणकाच्या सांकेतिक भाषेत परिवर्तित करून दिल्या जातात.

याच संचारमाध्यांच्या उपयोग करून एका ठिकाणी संग्रहित केलेले माहितीचे साठे अन्य ठिकाणी वापरू शकतात. एकाच संस्थेत अशी सेवा वापरताना लॅन सिस्टीम (Local Area Network - LAN) चा उपयोग होतो.

आता भविष्यातील कार्यालये म्हणे कागदाशिवाय चालू शकतील! थोडक्यात सांगायचे तर कितीही लहान अथवा प्रचंड मोठा संदेश, कितीही लांब अंतरावर काही सेकंदात पाठवला जाऊ शकतो. यासाठी पोस्टमन तारवाला किंवा तत्सम कोणत्याही 'दूताची' व प्रत्यक्ष चिठ्ठीचपाटी एकीकडून उचलून दुसऱ्या जागी नेण्याची आता गरजच उरणार नाही.

आपल्या ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे कार्यालयात ही सेवा नुकतीच उपलब्ध झाली आहे. जसा प्रत्येक घराला एक पत्ता दिला जातो, तसाच इ मेल सेवा वापरणाऱ्याही इ मेल पत्ता दिला जातो उदा. प्रबोधिनीचा इ मेल पत्ता 'Jnana- J.P. Trust @ Access. net in' असा आहे या पत्त्यात तुम्ही तुमचं नाव किंवा आद्याक्षरे वापरू शकता व त्यामुळे हा लक्षात ठेवणेही सोपे जाते. या पत्त्यात @ या अक्षरापूर्वी येणारी अक्षरे ग्राहकाचे नाव दर्शवतात. @

नंतर येणारी अक्षरे इ-मेल संदेश त्याच्यापर्यंत कोणत्या मार्गाने पोहचणार हे दर्शवतात. आता तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही असा, प्रबोधिनीशी नेहमीच संपर्कात राहू शकाल!

ही इ-मेल सेवा तुम्ही कोणकोणत्या प्रकारे वापरू शकाल? जरा डोके चालवा, कल्पना रंगवा व आम्हाला जरूर कळवा.

✲✲✲

**श्रीज्ञानराज समाधी सप्तशताब्दी निमित्ताने**

# श्रीज्ञानराजांचे पसायदान

**डॉ. स्वर्णलता भिशीकर**



**तुम्ही आम्ही ज्ञानदेव– निवृत्तिनाथ यांचे वारस. अमृताची चव आणि गंध असलेल्या ज्ञानेश्वरीशी आणि तिचा कळस असलेल्या पसायदानाशी आपली ओळख झाली नाही तर मराठी बाणा सांगायचा कशाला?**


**ज्ञानेश्वरांनी समाधी घेऊन यंदा सातशे वर्षे होत आहेत. या निमित्त मुलांना पसायदानाचा परिचय करून देणारा लेख**

मित्रमैत्रिणींनो, आपण काही वेळा भाषणांना, कार्यक्रमांना जातो. त्या कार्यक्रमाचा शेवट पसायदानाने होतो. सहज आपल्या मनात येते की, कार्यक्रमाची सांगता पसायदाने का बरं करत असतील? पसायदान म्हणजे तरी काय? गीत रामायणात एक गीत असे आहे :

**'दशरथा घे हे पायसदान!'**

तुझ्या यज्ञिं मी प्रकट जाहलो हा माझा सन्मान!'

दशरथाच्या यज्ञाच्या सांगतेच्या वेळी यज्ञपुरूष प्रकट झाला. आणि त्याने दशरथाला पसायदान दिले, अशी गोष्ट



आहे. पायस आणि पसाय एकच. आपण केलेल्या चांगल्या कामामुळे भगवंत प्रसन्न होऊन आपल्याला प्रसाद, व आशीर्वाद देतो. ते चांगलं काम यज्ञासारखंच पवित्र असतं. एखाद्या मौलिक पुस्तकाचं लेखन हा यज्ञ असू शकतो. एखादी उत्तम वास्तू उभारणं हाही यज्ञ असू शकतो. व्याख्यानमाला, ज्ञानसत्र हा सुद्धा यज्ञ आहे. जे काम आपण सर्व शक्ती लावून, मनापासून आणि देवाला अर्पण करून करतो तो यज्ञच आहे ज्ञानराजांनी ज्ञानेश्वरी लिहिली तो यज्ञच होता. म्हणून ते पसायदानाच्या सुरूवातीला म्हणतात,

**आता विश्वात्मके देवे,**
**येणे वाग्यज्ञे तोषावे'**

माझ्या वाणीच्या यज्ञाने तो सर्वांच्या हृदयात भरून राहिलेला ईश्वर संतुष्ट होवो आणि मला पसायदान देवो.

पसाय किंवा पायस म्हणजे तांदुळाची स्वादिष्ट खीर.या खिरीचा नैवेद्य करण्याची पूर्वी पद्धत होती. ज्ञानेश्वरी पूर्ण करताना ज्ञानराजांनी पसायदान मागितले ते प्रतीक स्वरूप आहे. खरोखरच तो नैवेद्य नव्हे तर जगाच्या कल्याणासाठी ज्ञानराजांनी देवाचे जे आशीर्वाद मागितले ते 'पसाय' आहे. पसायदानाच्या निमित्ताने संपूर्ण मानव लोकांच्या कल्याणाचं एक अपूर्व सुंदर स्वप्न ज्ञानराजांनी पाहिलं. हे स्वप्न पाहणारा एक सोळा वर्षाचा युवक होता. ज्ञानदेवांच्या भिक्षेच्या झोळीत ज्या समाजाने कचरा फेकला, संन्याशाची पोरं म्हणून ज्यांचा उपहास समाजाने केला त्या निवृत्ती-ज्ञानदेव सोपान मुक्ताई या भावंडांपैकी ज्ञानदेवांनी हे पसायदान लिहिलं. देव -मानवांच्या एका थोर समाजाचं चित्र त्यांनी पसायदानात उभं केलं.येणाऱ्या शतकांनाही ते मार्गदर्शक आहे. ही ज्ञानदेवांची अलौकिकता.

**'नामा म्हणे ग्रंथ, श्रेष्ठ ज्ञानदेवी**
**एक तरी ओवी, अनुभवावी'**

असं नामदेव महाराजांनी म्हटलं आहे.

मित्रांनो, आपण बकुळफुलांच्या-प्राजक्ताच्या या दळदारी देशात, महाराष्ट्रात जन्मलो आणि अमृताची चव आणि गंध असलेल्या ज्ञानेश्वरीशी आणि तिचा कळस असलेल्या पसायदानाशी आपली ओळख झाली नाही तर मराठी बाणा सांगायचा कशाला?

ज्ञानियांचे राजे सांगतात.

**'अमृताच्या सागरी,**
**लाभे जे सामर्थ्याची थोरी**
**तेचि दे अमृतलहरी**
**चुळी घेतलिया।'**

अमृताच्या सागरातून जी अमरत्वाची शक्ती मिळेल ती त्या सागरातील ओंजळभर पाणी चाखल्याने मिळते.म्हणून या अमृतसागराची एक ओंजळ तरी चाखून पाहूया!

**ओंजळ अमृताची-**
**'आता विश्वात्मके देवे,**
**येणे वाग्यज्ञे तोषावे।**

**तोषोनि मज द्यावे,**
**पसायदान हे!'**

पसायदानाच्या पहिल्या ओवीत विश्वात्मक झालेल्या आपल्या सद्गुरूंना- निवृत्तीनाथांना- ज्ञानराज म्हणतात की ज्ञानेश्वरी सांगण्याचा हा यज्ञ मी केला त्याचं फल- पसाय मला द्यावं. असं म्हटलं तरी प्रत्यक्षातलं मागणं साऱ्या जगासाठी आहे. तेराव्या शतकात त्याची समाजाला गरज होती त्याहून जास्त गरज आज आहे. कारण सद्गुणांनी, नीतीने संपन्न असलेल्या एका समाजाचं चित्र त्यांनी रंगवलं आहे. आणि ते खरं होवो अशी प्रार्थना आपल्या सद्गुरूंना केली आहे.

पसायदानाच्या दुसऱ्या ओवीत ज्ञानदेव म्हणतात,

**'जे खळांची व्यंकटी सांडो,**
**तया सत्कर्मी रती वाढो।**
**भूता परस्परे जडो।**
मैत्र जीवाचे।'

जगात जे दुष्ट लोक आहेत, भष्टाचार करणारे आहेत, लुबाडणूक, फसवणूक करणारे आहेत त्यांचा वाकडेपणा दूर होवो. त्यांना चांगली कामं करण्यात रस वाटू लागो आणि सर्व प्राणीमात्रांमध्ये परस्परांविषयी गाढ जिव्हाळा निर्माण होवो. दुष्टबुद्धी कशाकशात आपल्याला दिसते? परीक्षकांना पैसे देऊन, दुसऱ्याची नक्कल करून पास होणं, जी वस्तू आपली नाही ती खुशाल वापरणं, चोरणं, दुसऱ्याला त्रास होईल असं वागणं ही दुष्टबुद्धी आहे. दुष्ट प्रवृत्तीच्या मित्रांमध्ये राहिलं की दुष्टबुद्धी तयार होते. पुढे जाऊन मग दारूच्या बाटल्यांसाठी देशाची महत्त्वाची गुपितं शत्रूराष्ट्राला फोडणं, देशद्रोह करणं, लाच घेणं,ही सर्वच दुष्टबुद्धी म्हणजे वक्रता, व्यंकटी आहे. एखाद्याच्या पाठीमागे त्याला नावं ठेवणं, कुत्सितपणे बोलणं ही व्यंकटी आहे. ती दूर होवो, इतरांच्या भल्यासाठी काम करण्याची बुद्धी ही सद्बुद्धी आहे. ती तेजस्वी होवो. लोकांच्यात प्रेमभाव वाढो. हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ, हा गरीब, हा श्रीमंत असा भाव आपल्या मनात न येणं, सर्वांविषयी सहज आस्था,जिव्हाळा वाटणंही ऋजुता आहे.व्यंकटी जाऊन ऋजुता यावी अशी या ओवीतील प्रार्थना आहे.

**'दुरितांचे तिमिर जावो,**
**विश्व स्वधर्मसूर्ये पाहो**
**जो जे वांछील तो ते लाहो,**
**प्राणिजात।'**

दुरित म्हणजे पाप. पापाची सोपी व्याख्या तुकाराम महाराजांनी केली आहे.

'पुण्यपरउपकार, पाप ते परपीडा' दुसऱ्याला त्रास होईलसं वागणं म्हणजे पाप. मांसाहारी माणसांच्या चवी पुरवता पुरवता काही प्राण्यांच्या जाती पृथ्वीवरून नाहीशा होत चालल्या आहेत. शिकारी लोकांनी आपलं वन्य पशूंचं वैभव संपवून टाकलं आहे. पैशाकरता माणूस माणसाला गुलाम

करतो, त्याचा छळ करतो आहे. ही सगळीच परपीडा म्हणजे पाप आहे.

**स्वधर्माचा सूर्य–**

देवाने आपल्याला काही बुद्धी, काही गुण देऊन पाठवलं. काही आपल्याला आईवडिलांनी, शिक्षकांनी शिकवलं. ही गुणसंपत्तीची एक रेषा समजू या. दुसरी रेषा आहे समाजाच्या गरजांची. आपली क्षमता आणि समाजाच्या गरजा जीवनाच्या आलेखात जेथे मिळतात तो आपला स्वधर्म असं विनोबांनी म्हटलं आहे. आणखी सोपेपणानं सांगायचं तर आापल्या शक्तीबुद्धी आपल्या भोवतालच्या समाजाच्या गरजा उपयोगी अशा प्रकारचं काम आपण करणं, ते नम्रतेने निरपेक्षपणे करणं याला स्वधर्म म्हणतात. ज्ञानराजांना वाटतं की जगातल्या सर्व लोकांना आपला स्वधर्म कळावा. त्यानुसार काम करता यावं. तसं करण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते त्याला मिळावं.

**ईश्वरनिष्ठांची मांदियाळी–**

मांदियाळी म्हणजे समूह किंवा मेळा. ईश्वरनिष्ठ लोकांची म्हणजे संतांची मांदियाळी, या जगात मंगलतेचा वर्षाव करत असावी.सतत या भूमीवर सर्वाचं कल्याण करीत ती वावरत असावी असं ज्ञानराज पुढच्या ओळीत म्हणतात.

**'वर्षत सकळ मंगळी,**
**ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।**
**अनवरत भूमंडळी,**
**भेटतु भूता !'**

लोकांनी आपला स्वधर्म जाणून वागावं, ईश्वराची आठवण मनात ठेवावी, माझ्याचमुळे सगळ्या गोष्टी घडतात असा खोटा अहंकार ठेवू नये असं ज्ञानराजांना वाटतं.पण तसं नसल्यामुळे स्वधर्म समजावून घ्यायला, ईश्वरनिष्ठा निराभिमानिता शिकवायला संतांच्या मांदियाळीची फार आवश्यकता असते. ते कोणाला न दुखवता युक्तीने, प्रेमाने सर्वांना शिकवीत. शहाणं करीत असतात.

**संत ते उदार, कृपेचे सागर–**

**'चला कल्पतरूचे आरव,**
**चेतना चिंतामणीचे गाव।**
**बोलले जे अर्णव,**
**पीयूषाचे ।।'**

सगळ्या जगाला सन्मार्गाला लावणारे संत कसे असतात? कल्पवृक्षासारखे! एक कल्पवृक्ष आपल्या सर्व इच्छा पूर्ण करू शकतो. मग इथे तर कल्पतरूंचं वनच आहे. इथे आलेला कोणी निराश होऊन जाईल का? संत चिंतामणीचे गाव आहेत. चिंतामणी देखील त्या वस्तूची इच्छा करावी ती वस्तू देतो. संत म्हणजे अशा चिन्तामणीचा गाव. ते इतके कृपावंत आहेत की इच्छा कसली करायची याचीही ते आपल्या बुद्धीला चेतनेला जाण देतात. आपल्या अमृतमधुर वाणीने ते सांगतात की इच्छा धरायची तर मला पैसाअडका मिळो, माझं घर मोठं होवो, मला हारतुरे, पदकं

मिळोत अशी आशा धरू नका. ही सगळी लक्ष्मी आहे हे खरं पण त्या लक्ष्मीचा पती जर तुम्ही मागितलात तर लक्ष्मी आपोआपच पाठीमागे येईल. 'देव पाहिजे' म्हणा, म्हणजे जगातलं सर्वात मोठं सुख- आनंद तुमच्या दिशेने चालत येईल.अशा गोडव्याने संत आपल्याला ईश्वराची उपासना शिकवतात म्हणून ते अमृताचे समुद्रच असतात.

**सोयरे सज्जन-**

**'चंद्रमे जे अलांछन,**
**मार्तंड जे तापहीन।**
**ते सर्वांही सदा सज्जन,**
**सोयरे हो तु।'**

संतांचं वर्णन करताना ज्ञानराजांच्या वाणीला मोठा बहर आला आहे.ते स्वत: सन्तशिरोमणी आहेत. हे वर्णन त्यांचं स्वत:च वर्णन आहे. चंद्र मोठा सुंदर दिसतो हे खरं. पण त्याला कलंक आहे. संत मात्र उज्जवल चरित्राचे असतात. अपवित्रता त्यांना स्पर्शच करू शकत नाही. स्वामी विवेकानंदांकडे एक रूपवान स्त्री गेली.ती त्यांना म्हणाली, 'मला तुमच्यासारखा मुलगा हवा. माझा स्वीकार करा.'स्वामी म्हणाले, 'आई,मी तुमचा मुलगाच आहे.'याला म्हणायचं निर्मळ चारित्र्य. संतांच्या जीवनात लपवाछपवी, आतबाहेर काही नसतं. म्हणून ते लांछन- कलंक नसलेले चंद्रमे आहेत. सूर्याला लांछन नसतं हे खरं, पण त्याचं तेज इतरांना दाहक वाटतं. त्याच्या जवळ जाण्याने लोकांना त्रास होतो. संतांच्या भोवती मात्र सदैव लोकांचा मेळा असतो. त्यांची कुणाला भीती वाटत नाही. त्यांच्या छायेत लोक स्वस्थप्रसन्न होतात. निर्भय होतात. असे संत सज्जन सर्वांचे सोयरे-जिवलग व्हावेत अशी प्रार्थना ज्ञानराज करतात.

**आनंदे तिन्ही लोकी-**

**'किंबहुना सर्वसुखी,**
**पूर्ण होऊन तिही लोकी।**
**भजिजो आदिपुरूखी,**
**अखंडित।'**

ज्ञानेश्वर महाराज सद्गुरू निवृत्तीनाथांना मागणं मागतात की जग संतांकडून या साऱ्या गोष्टी शिको. या गोष्टी शिकल्या तर आताची युद्धं संपतील. विश्व सुखाचं माहेर होईल. तिन्ही लोक आनंदानं भरून जातील. सारं विश्व विश्वकर्त्यांच्या उपासनेमध्ये मग्न होईल. अखंड भजन-भक्ती, कर्म-सेवा करील.

**कशा प्रकारचा विजय हवा?**

**'आणि ग्रंथोपजीविये,**
**विशेषी लोकी इये।**
**दृष्टादृष्ट विजयें,**
**होआवे की।'**

आणि शेवटी ज्ञानराज म्हणतात की या ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या आधाराने जे आयुष्याची वाटचाल करतात ते त्यांची आधीची कर्म, त्यांच्या भविष्यकाळात लिहिलेल्या गोष्टी या सगळ्यांवर विजय मिळवतात. म्हणजे

या कशामुळेच त्यांचा आनंद व प्रसन्नता कमी होत नाही. दृष्ट म्हणजे पाहिलेलं म्हणजे भूतकाळ आणि अदृष्ट म्हणजे न पाहिलेलं म्हणजे भविष्यकाळ. भूतकाळ-भविष्यकाळ या सर्वांवरच तो विजय मिळवतो. कशानंही त्याला धक्का बसत नाही. तो कोलमडून पडत नाही. आणि कशानंच हुरळून जात नाही. याला म्हणतात विजयी वृत्ती.

**ज्ञानदेवांना सुख कशामुळे होतं?**

**'तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो,**
**हा होईल दानपसावो।**
**येणे वरे ज्ञानदेवो,**
**सुखिया झाला।'**

सद्गुरू निवृत्तिनाथांनी आपल्या शिष्याचं-ज्ञानदेवाचं हे मागणं मोठ्या कौतुकाने ऐकलं. त्यांना खूप प्रसन्नता वाटली.ज्यांनी आपणच विश्व आहोत असा अनुभव घेतलेला होता त्या निवृत्तीदेवांनी सांगितलं, 'माझ्या ज्ञानदेवा, तू एवढं उदात्त मागणं मागितलंस, तर ते पुरं होईल असा आशीर्वाद मी का देणार नाही? तुझ्या या एकापेक्षा एक उत्तुंग कल्याण कामना जरूर पुऱ्या होतील!'

आपल्या गुरूदेवांचा हा वरप्रसाद ज्ञानदेवांनी ऐकला आणि त्यांच्या जीव सुखानंदाने तृप्त झाला.

ज्ञानदेवांना स्वतःचं असं वेगळं सुख काही नव्हतंच-

**'तुका म्हणे सुख,पराविया सुखे।**
**अमृत हे मुखे,स्त्रवतसे।'**

सर्व जगाच्या सुखातच त्यांचं सुख सामावलेलं होतं. म्हणून निवृत्तिनाथांनी दिलेल्या या पसायदानाने ते पूर्णकाम तृप्त झाले.

असं अलौकिक पसायदान ज्ञानराजांनी मागितलं अन् निवृत्तिनाथांनी दिलं. जागतिक वाङ्मयातही पसायदानाही तोड नाही. पण अजून तर जग अज्ञानाच्या अंधारात चाचपडतंय्.अजून अन्याय-अत्याचाराचं थैमान चालू आहे. दुरितांचं तिमिर आहेच. स्वधर्म न सापडलेली माणसं भांबावल्यागत फिरताहेत.मग तिन्ही लोक सुखी कसे व्हायचे? कोणी करायचे?

तुम्ही आम्ही ज्ञानदेव निवृत्तीनाथ यांचे वारस. दुःखी जगाचे सोयरे जिवलग आपण व्हावं अशी त्यांची अपेक्षा आहे.ते अलांछन चंद्रमे, ताप नसलेले,तेजस्वी पण शीतल सूर्य आपण व्हायचं आहे. खळांची व्यंकटी-वाकुडपण आपण मोडायचं आहे. त्यासाठी स्वतः प्रथम ऋजु-प्रसन्न शक्तिमान व्हायचं आहे कसं व्हायचं ते ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी आपल्याला मोठ्या गोडव्याने, रसिकपणाने, प्रसन्नतेने सांगितलं आहे. क्रमशः ते काय सांगतात ते समजावून घेऊ या. ***

**डॉ. स्वर्णलता भिशीकर**, द्वारा, ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर, डफरीन चौक सोलापूर

कविता

# पंख पसरुनी विहरे त्याला...



*रुळल्या वाटेवरती चाले भेदरलेला मठ्ठ गडी*
*पंख पसरूनी विहरे त्याला जाई तेथे पायघडी*

*गृहीत असता जुने पद्धती फार पुराणी ठरलेली*
*कितीही धावा चाकोऱ्यांनी चाके जखडुनि धरलेली*

*एक कल्पनालोलक हलता शब्दांना रोमांच फुले*
*भावसागरा भरती येता लीलासलिला लाख फुले*

*शब्दाश्मांच्या पलिकडेची दिसती अंकुर रोज नवे*
*तिमिरातूनही लख्ख दाखवी प्रतिभाचक्षू भावदिवे*

*प्रतिसृष्टी आकळते ज्याला प्रतिभास्कर तो भावकवी*
*लोकविलक्षण ज्याची दृष्टी त्याला सृष्टी रोज नवी*

*शब्दांची लय ल्यावी वलये अर्थकणांची उमटावी*
*पाताळाच्या तळास अलगद हिमशिखरेही जोडावी*

*कल्पक योजक सर्जक होता प्रश्नांमागे येई उत्तर*
*संवेदनशीलास भावते अकल्पिताचे अवघे अंतर*

*प्रत्येकाचे दैवी देणे खोडून लेणे मुक्त करी*
*अक्षरअक्षर मंत्रवैखरी योजक होता तूच हरी*

*प्रतिभाप्रांतांचा तू अतिथी सगळी दारे तुज उघडी*
*पंख पसरूनि विहरे त्याला जाई तेथे पायघडी*



**प्रा. राम डिंबळे**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे –३०

**छात्र प्रबोधन** ज्ञान प्रबोधिनी द्वारा कुमारांसाठी चालविले जाणारे अभिनव मासिक म्हणून छात्र प्रबोधन दिवसेंदिवस विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय होत आहे. पण हे निव्वळ मासिक नाही. किशोर वयातील मुलामुलींना शालेय अभ्यासापलीकडे सर्वांगीण विकासाची प्रेरणा व दिशा देणारा, सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणारा, सेवा आणि पराक्रम यांची उत्तुंग शिखरे दाखवणारा हा एक कृतिशील उपक्रम पुरवणारा स्रोत आहे. ही एक चळवळ व्हावी व हजारो – लाखो विद्यार्थ्यांपर्यंत ती पोहोचावी यासाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य आम्हाला लागणार आहे. या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपल्यापैकी अनेकजण आमच्याशी संपर्क साधतील व यथाशक्य या कार्यात आपले योगदान करतील असा विश्वास वाटतो.

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८०
**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर. ☎ २५७८२
**सातारा** : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ सातारा. ☎ ५०५०४
**सांगली** : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गाव भाग, खाडीलकर गल्ली, सांगली.
**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ २१५३४
**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रोड, नाशिक ☎ ५७४८३०
**मुंबई** : श्री. अनिल यशवंत दांडेकर, विश्वस्त: अवध्य चॅरिटिज्, ५२ए, सह्याद्री, बजाज हॉलसमोर, ५०, स्वामी विवेकानंद रस्ता, मालाड (प.), मुंबई – ६४. ☎ ८७२५३१९
**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी–२०, अहिल्या सोसा., घंटाळी रोड, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**पनवेल** : सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी. एल–६–१३–६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल.
**रत्नागिरी** : कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. ☎ २२४८७
**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे.
**चाळीसगाव** : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव.
**परभणी** : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.
**लातूर** : डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४
**औरंगाबाद** : कर्नल पी. एन्. मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७ सेक्टर नं. 'C' N-1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. ☎ ४८२६२६

***महाराष्ट्रातील इतर गावांमध्ये छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी पत्रव्यवहार करावा.***

या कार्यालयांमध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधनसाठी आपले लेखनसाहित्य या केंद्रावर आपण हस्ते देऊ शकाल. तेथून ते पुण्याला पाठविले जाईल. छात्र प्रबोधन द्वारा विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

छात्र प्रबोधनच्या लेखक, कवी, चित्रकार, जाहिरातदार, देणगीदार, प्रायोजक, हितचिंतक व वाचकांना दीपावली व नववर्षाच्या शुभेच्छा ! व त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद ! - संपादक मंडळ, छात्र प्रबोधन.

**हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेच्या मालकीचे असून सौर अश्विन १८, शके १९१७ १० ऑक्टोबर १९९५ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.**

नव आशांची, नव्या जगाची, नव्या युगाची, वाट रेखण्या, आली दिवाळी घरा।